सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | शुक्रवार, ३ जुलै २०२६ | वर्ष ४ थे अंक ११४ | पाने १२ | किंमत रु. ८/-
■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

### विचारपुष्प



विचार जितका गहन, तितकाच सूक्ष्म राहील. गहन विचारांच्या सूक्ष्मतेची कोणतीही मर्यादा नसते. शब्दांद्वारे व्यक्त होणाऱ्या अभिव्यक्तीसाठी सूक्ष्मतेच्या मर्यादा आहेत. शब्दांची अभिव्यक्ती शक्ती मर्यादित असते. याउलट, तत्त्वज्ञानाची सूक्ष्मता अमर्याद आहे. अशा सूक्ष्म विचारांना शब्दांद्वारे व्यक्त करण्याचे प्रयत्न केविलवाणे आणि क्लिष्ट वाटतात.

**- स्व. पं. दीनदयाल उपाध्याय**
पूर्व अध्यक्ष, भारतीय जनसंघ

# तत्कालीन ठाणेदारासह नऊ पोलिसांना जन्मठेप

**| वाशीम न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल**
**| पोलिस कोठडीत आरोपीचे मृत्यू प्रकरण**



**वाशीम, २ जुलै**

पोलिस कोठडीत आरोपी बेग्या पवार याच्या मृत्यूप्रकरणी वाशीम जिल्हा सत्र न्यायालयाने गुरुवारी ऐतिहासिक निकालात रिसोडचे तत्कालीन ठाणेदार माधव धांडे यांच्यासह ९ पोलिसांना जन्मठेपेची शिक्षा तसेच प्रत्येकी १० हजार रुपये दंड ठोठावला. दंड न भरल्यास ६ महिने साध्या कैदेची शिक्षा ठोठावली आहे. पंधरा वर्षांनंतर बेग्या पवार याच्या कुटुंबीयांना न्याय मिळाला.

तत्कालीन ठाणेदार माधव धांडे, पोलिस कर्मचारी शिवाजी खिल्लारी, नागोराव खंडके, वसंत जाधव यांना अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये विविध कलमांखाली कैदेची व दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. या सर्व शिक्षा एकत्र भोगायच्या आहेत. राज्याच्या इतिहासात एकाच वेळी एवढ्या मोठ्या संख्येने पोलिसांना



बेग्या पवार

जन्मठेप होण्याची पहिलीच घटना आहे. त्यामुळे राज्याच्या पोलिस दलात खळबळ उडाली आहे. रिसोड पोलिसांनी एका गुन्ह्याच्या तपासासाठी संशयावरून बेग्या पवारला घरातून व राजू पवारला वाढोणा शेतशिवारामधून ९ मे २०११ रोजी पहाटे ताब्यात घेतले होते. ठाण्यात आणल्यावर पोलिसांनी बेग्याला मारहाण केली. यात त्याच्या शरीरावर ४३ गंभीर जखमा झाल्या होत्या.

दुसऱ्या दिवशी सकाळी जखमी बेग्यास वाशीम येथे दवाखान्यात नेत असताना वाटेतच मृत्यू झाला. पोलिसांच्या अमानुष मारहाणीमुळे बेग्याचा कोठडीत मृत्यू झाल्याचा आरोप त्याच्या नातेवाईकांनी केला होता. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तपास सीआयडीकडे सोपविण्यात आला होता. सीआयडीचे उपअधीक्षक अन्वर शेख व त्यांच्या सहकाऱ्यांनी सखोल तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. न्यायालयात सादर केलेले परिस्थितीजन्य पुरावे, वैद्यकीय अहवाल आणि साक्षीदारांची साक्ष अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली.

येथील जिल्हा अतिरिक्त सत्र न्यायाधीश जे. पी. झपाटे यांनी या खटल्यातील तत्कालीन ठाणेदार माधव धांडे, पोलिस कर्मचारी मदन पवार, शिवाजी खिल्लारी, पंजाब पाटकर, रमेश पवार, प्रकाश ताराम, नागोराव खंडके, अशोक वैद्य आणि वसंत जाधव या नऊही आरोपींना दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा सुनावली. या खटल्यात सरकार पक्षातर्फे ४७ साक्षीदार तपासले. सरकारी वकील श्रीराम काळू यांनी बाजू मांडली. मुलाचा कोणताही गुन्हा नव्हता. त्याच्यावर खोटे गुन्हे दाखल केले होते, असे आई-वडिलांनी सांगितले. ◂ (तभा वृत्तसेवा)

### ३४ दिवस तपास अन् दीर्घकाळ सुनावणी

राज्यात खळबळ उडवून देणाऱ्या या घटनेचा तपास सीआयडीके सोपविण्यात आला होता. ३४ दिवस तपास केल्यानंतर पोलिसांविरोधात हत्येसह विशेष अट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले. आरोपपत्र दाखल झाल्यानंतर यावर दीर्घकाळ सुनावणी झाली. अखेर न्यायालयाने आरोपींना कठोर शिक्षा सुनावली आहे.

# भारत-जपान संबंध बळकट

## एआय, संरक्षण, ऊर्जाक्षेत्रात सामंजस्य करार

**नवी दिल्ली, २ जुलै**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जपानच्या पंतप्रधान सानाए ताकाइची यांनी आशियातील अत्यंत महत्त्वपूर्ण धोरणात्मक भागीदारी दृढ करण्याच्या दिशेने पावले उचलत गुरुवारी कृत्रिम बुद्धिमत्ता, आर्थिक सुरक्षा, महत्त्वपूर्ण खनिजे, संरक्षण, आरोग्यसेवा आणि ऊर्जा या क्षेत्रांशी संबंधित अनेक करारांची घोषणा केली.

नवी दिल्ली येथे झालेल्या १६ व्या भारत-जपान वार्षिक शिखर परिषदेनंतर जाहीर करण्यात आलेले करार, वाढत्या जागतिक अनिश्चिततेच्या पृष्ठभूमीवर तंत्रज्ञान पुरवठा साखळीची लवचीकता, आर्थिक सुरक्षा आणि प्रादेशिक स्थिरता याबाबत दोन्ही देशांमधील वाढते मतैक्य दाखवतात. पंतप्रधान म्हणून भारतात प्रथमच आलेल्या ताकाइची यांचे स्वागत करताना मोदींनी मुळाशी असलेल्या सांस्कृतिक व ऐतिहासिक संबंधांवर प्रकाश टाकला.

भारत-जपान वार्षिक शिखर परिषदेसाठी प्रथमच भारतात येत असलेल्या पंतप्रधान सानाए ताकाइची यांचे स्वागत करताना मला अत्यंत आनंद होत आहे. त्या जपानच्या पहिल्या महिला पंतप्रधान असून, एक दूरदर्शी आणि लोकप्रिय नेत्या आहेत. शिवाय, त्या जपानमधील नारा प्रांतातील आहेत. हा प्रांत भारत आणि जपान यांच्यातील सामायिक बौद्ध वारशाचे एक महत्त्वपूर्ण केंद्र आहे, असे मोदी म्हणाले. ◂ (वृत्तसंस्था)



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जपानच्या पंतप्रधान सानाए ताकाइची यांच्याशी नवी दिल्लीत झालेल्या भेटीदरम्यान संवाद साधला

### संरक्षण रेडिओ अँटेनाचा संयुक्त विकास

भारत आणि जपान यांनी युनिकॉर्न या नौदलाच्या रेडिओ अँटेनाशी संबंधित पहिल्या संयुक्त संरक्षण विकास प्रकल्पासाठी करार केल्याची घोषणा नरेंद्र मोदी यांनी केली. हा आमचा प्रकल्प संरक्षण तंत्रज्ञान भागीदारीत एक नवीन अध्याय सुरू करेल. आम्ही आता अशा प्रकारचे संरक्षण तंत्रज्ञान संयुक्तपणे विकसित करू, असे मोदी म्हणाले.

### महत्त्वाचे

#### बाजारपेठेत तेजीचे सत्र कायम

**मुंबई :** भारतीय शेअर बाजारातील तेजीचे सत्र गुरुवारीही कायम राहिले. कॅपिटल गुड्स, पॉवर आणि पीएसयू बँक क्षेत्र वगळता इतर सर्वच क्षेत्रांमध्ये झालेल्या चौफेर खरेदीमुळे दोन्ही प्रमुख निर्देशांकांनी सलग दुसऱ्या दिवशी वाढ नोंदवली. गुरुवारी बाजाराची सुरुवात मजबूत झाली. त्यानंतर संपूर्ण सत्रात दोन्ही निर्देशांकांनी आपली घोडदौड कायम ठेवली. आयटी, ऑटो आणि रियल्टी शेअर्समध्ये झालेल्या जोरदार खरेदीमुळे निफ्टी ५० निर्देशांक २४,२०० च्या पातळीच्या जवळ पोहोचला.

#### हिंदू विवाहाच्या वैधतेसाठी पारंपरिक विधी आवश्यक

**अहमदाबाद :** हिंदू विवाहासाठी केवळ विवाह नोंदणी पुरेशी नाही. आवश्यक पारंपरिक विधी केले गेले नाहीत, तर विवाह वैध मानला जाऊ शकत नाही असे निरीक्षण गुजरात उच्च न्यायालयाने एका प्रकरणाची सुनावणी करताना नोंदवले. विवाहादरम्यान सप्तपदी (सात व्रते) आणि इतर पारंपरिक विधी व समारंभ केले गेले नाहीत, तर केवळ विवाह नोंदणीच्या आधारावर विवाह वैध मानला जाऊ शकत नाही. विवाह हा केवळ नाचणे, गाणे, खाणेपिणे किंवा व्यावसायिक व्यवहाराचा प्रसंग नाही; ती एक पवित्र विधी असल्याची टिप्पणी न्या. इलेश वोरा आणि न्या. आर. टी. वचानी यांच्या खंडपीठाने केली.

#### विजेच्या शॉक लागून सेंट्रींग मजुराचा जागेवर मृत्यू

**सोलापूर :** जिन्यावर चढताना विजेचा शॉक बसल्याने एका ३९ वर्षीय सेंट्रींग मजुराचा जागीच मृत्यू झाल्याची घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील वडाळा येथे गुरुवारी दुपारी २.१५ वाजण्याच्या सुमारास घडली.



सोमनाथ चंद्रकांत कांबळे (रा.बाणेगाव, ता.उत्तर सोलापूर) असे मयत मजुराचे नाव आहे. सोमनाथ कांबळे हा गुरुवारी दुपारी वडाळा येथील सरकारी दवाखान्याच्या समोरील बोळात ते सेंट्रींग कामावर काम करीत होते. जिन्यावर चढताना एमएसईबीच्या विद्युत तारेचा त्यांच्या हाताला स्पर्श झाल्याने शॉक लागून बेशुद्ध झाले. वडाळा येथील आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन रवी तळभंडारे यांनी शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा, भाऊ असा परिवार आहे.

# मानाच्या दिंड्यांना प्रत्येकी २० हजारांचे अनुदान

## वारकऱ्यांना राज्य सरकारचे मोठे बळ



**पावसाळी अधिवेशन**



**मुंबई, २ जुलै**

महाराष्ट्राची सांस्कृतिक आणि सामाजिक समतेची महान ओळख असलेल्या आषाढी वारीसाठी राज्य शासनाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरकडे प्रस्थान ठेवलेल्या मानाच्या पालख्यांसोबत जाणाऱ्या तब्बल १ हजार ४०० दिंड्यांना प्रत्येकी २० हजार रुपयांचे विशेष अनुदान देण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे वारीत सहभागी होणाऱ्या लाखो वारकऱ्यांना मोठा आधार मिळणार असून, याबाबतचा अधिकृत शासन निर्णय गुरुवारी प्रसिद्ध करण्यात आला असल्याची माहिती सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिली.

वारकरी संप्रदायाची महान परंपरा अधिक जोपासली जावी आणि वारकऱ्यांना दर्जेदार सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने राज्य शासनाने २०२४ मध्ये 'मुख्यमंत्री वारकरी महामंडळा'ची स्थापना केली होती. याच महामंडळाच्या माध्यमातून आता सलग तिसऱ्या वर्षी मानाच्या दिंड्यांना हे आर्थिक बळ पुरवले जात आहे. यंदाच्या आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या मानाच्या दहा प्रमुख पालख्यांसोबत चालणाऱ्या १ हजार ४०० दिंड्यांना प्रत्येकी २० हजार रुपये थेट वितरित केले जाणार आहेत. यासाठी शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून तब्बल २ कोटी ८० लाख रुपयांचा भक्कम निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

### 'मुख्यमंत्री वारकरी'च्या माध्यमातून वितरण

या महत्त्वपूर्ण अनुदानाचे थेट वितरण मुख्यमंत्री वारकरी महामंडळाच्या माध्यमातून केले जाणार असून, या संपूर्ण प्रक्रियेची प्रशासकीय जबाबदारी पुणे विभागीय आयुक्तांवर सोपवण्यात आली आहे. शासनाच्या या निर्णयामुळे दिंडी प्रमुखांना आणि वारकऱ्यांना वारीच्या नियोजनात मोठी आर्थिक मदत होणार आहे.

# विशिष्ट दुकानातूनच शैक्षणिक साहित्य खरेदीची सक्ती केल्यास कारवाई

## राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांचा शाळांना इशारा



**मुंबई, २ जुलै**

विद्यार्थ्यांना विशिष्ट दुकानातूनच गणवेश, पुस्तके आणि इतर शैक्षणिक साहित्य खरेदी करण्याची सक्ती करणाऱ्या शाळांविरोधात राज्य सरकार आता आक्रमक झाले आहे. नियम मोडणाऱ्या राज्यातील खाजगी शाळांसह सीबीएसई आणि आयसीएसई बोर्डाच्या शाळांवरही कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिला.

विधानपरिषद सदस्य सुधाकर अडबाले यांनी शाळांकडून होणाऱ्या या सक्तीबाबत सभागृहात प्रश्न उपस्थित केला होता. शासनाचा अशा सक्तीला पूर्ण विरोध आहे, असे यावर उत्तर देताना राज्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. यापूर्वीही अशा तक्रारींवरून काही शाळांवर कारवाई करण्यात आली आहे. आता या प्रक्रियेवर अधिक प्रभावीपणे नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक विभागीय उपसंचालक कार्यालयांतर्गत, सहायक संचालकांच्या देखरेखीखाली नोडल अधिकारी नेमण्यात येणार आहेत. ◂ (तभा वृत्तसेवा)

### संशयास्पद शाळांची यादी करणार



नोडल अधिकारी अधिकारी शाळांमधील साहित्य खरेदी प्रक्रियेवर बारकाईने लक्ष ठेवतील आणि दोषी शाळांवर त्वरित कारवाई करतील. संशयास्पद शाळांची एक स्वतंत्र यादी तयार करण्याचे निर्देश देण्यात आले असून या यादीच्या आधारे संबंधित शाळांची कसून चौकशी केली जाईल आणि दोषी आढळणाऱ्या शाळांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असेही डॉ. पंकज भोयर यांनी शेवटी नमूद केले.



एडन सामुद्रधुनितील चाचेगिरीला आळा घालण्यासाठी भारताने त्रिकांड हे शक्तिशाली लढाऊ जहाज तैनात केले आहे. चाच्यांनी एमव्ही गोल्डन आर्सेनल आणि सेंट व्हिन्सेट या जहाजांना लुटण्याचा प्रयत्न केला होता

### 'आशा भोसले संगीत जीवन गौरव पुरस्कार' सुरू करणार

**मुंबई, २ जुलै**

महाराष्ट्रातील गायन व संगीत क्षेत्रात आयुष्यभर उल्लेखनीय आणि अमूल्य योगदान देणाऱ्या ज्येष्ठ तसेच ख्यातनाम कलावंतांचा सन्मान करण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभागामार्फत 'स्वरसम्राज्ञी आशा भोसले संगीत जीवन गौरव पुरस्कार' सुरू करण्यात येणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी विधानसभेत एका निवेदनाद्वारे केली. ◂ (तभा वृत्तसेवा)

# विहिरीत बुडुन आईसह मुलगी व मुलाचा मृत्यू



**सांगोला तालुक्यातील घेरडी येथील घटना**

**तभा वृत्तसेवा, सांगोला, दि. २ जुलै-**

घरातील तक्रारीच्या कारणावरुन विहिरीतील पाण्यात पडुन बुडून आईसह मुलगी व मुलाचा मृत्यू झाल्याची घटना घेरडी (ता.सांगोला, जि.सोलापूर) येथे घडली. वैष्णवी आशिष यमगर (वय-२८), तेजश्री आशिष यमगर (वय-३ वर्षे ६ महिने), रुद्राक्ष आशिष यमगर (वय-१५ महिने) अशी त्यांची नावे आहेत.

याबाबत बाळू बाबुराव थोरबोले (रा.शिरनांदगी, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) यांनी सांगोला पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, मुलगी वैष्णवी यमगर व जावई आशिष यमगर यांच्यात घरगुती कारणावरुन वाद झाला होता. यावरुन मुलगी वैष्णवी यमगर हिने आपल्या दोन मुलांसह बुधवार दि.१ जुलै रोजी सायंकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास त्यांच्या घरासमोर असलेल्या शेतातील विहिरीत बुडून मयत झाले.

### न्यायालयात तृणमूल नेत्यावर फेकली अंडी

**कोलकाता :** अटकेतील तृणमूल काँग्रेसचे नगरसेवक देबराज चक्रवर्तींना गुरुवारी बारासात न्यायालयात हजर करण्यात आले त्यावेळी नागरिकांनी त्यांच्यावर अंडी फेकून मारली.

# न्यायदानातील एआय 'मिथाईल आयसोसायनेट'सारखे

## सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरवला 'एनसीएलटी'चा निर्णय

**नवी दिल्ली, २ जुलै**

कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे तयार केलेल्या अस्तित्वात नसलेल्या खोट्या आणि भ्रमित न्यायालयीन दाखल्यांवर अवलंबून राहत घेतलेल्या निर्णयावर आक्षेप घेत सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाचा (एनसीएलटी) आणि राष्ट्रीय कंपनी कायदा अपील न्यायाधिकरणाचा (एनसीएलएटी) निकाल रद्दबातल ठरवला. 'एआय'निर्मित निकाल देण्याच्या विरोधात शून्य सहनशीलतेचे धोरण न्यायालयांनी अवलंबले पाहिजे, असे कठोर निरीक्षण नोंदवले.

अस्तित्वात नसलेली आणि केवळ कल्पनेतून निर्माण केलेली सामग्री तयार करणे व तिचा कायद्याच्या क्षेत्रात 'पूर्वदृष्टांत'म्हणून वापर करणे, हे कायदा आणि न्यायव्यवस्थेच्या प्रांतात 'मिथिल आयसोसायनेट' वायूची गळती होण्यासारखे आहे. हे अदृष्य आणि कपटी असते आणि जेव्हा कुणाच्या तरी लक्षात येते, तोपर्यंत त्याने विनाशकारी परिणाम साधलेले असतात. हे केवळ न्यायालयाचा निर्णय दूषित करीत नाही, तर न्यायालयीन निर्णयाचा मुख्य आधारच हिरावून घेते, असे स्पष्ट करीत न्या. पी. एस. नरसिंहा आणि न्या. आलोक आराधे यांच्या न्यायासनाने एनसीएलटीचा निर्णय रद्दबातल ठरवला.



एआय साधनांद्वारे तयार केलेल्या अस्तित्वात नसलेल्या, बनावट आणि भ्रमित करणाऱ्या न्यायनिर्णयांच्या पूर्व उदाहरणांवर न्यायाधिकरणाने अवलंबून राहिल्याचे आढळल्यानंतर एस्सेल इन्फ्राप्रोजेक्ट्सच्या दिवाळखोरीवरील निर्णय रद्द करण्यात आला. कायदेशीर कामकाजात एआयमुळे निर्माण होणाऱ्या वाढत्या आव्हानांची दखल घेत. न्या. पी. एस. नरसिंहा आणि न्या. आलोक आराधे यांनी बार कौन्सिल ऑफ इंडियाला तज्ज्ञांची समिती स्थापन करण्याचा निर्देश दिला. न्यायनिर्णयाच्या प्रक्रियेत एआयच्या वापरामुळे उद्‌भवणाऱ्या मुद्यांची तपासणी करणे, हा या समितीच्या स्थापनेमागचा उद्देश आहे. न्यायनिवाड्यास मदत करण्यासाठी एआयचा वापर केला जाऊ शकतो, परंतु ते मानवी तर्काची जागा कधीही घेऊ शकत नाही तसेच न्यायनिवाड्याची प्रक्रिया प्रत्येक टप्प्यात मानवांच्या संपूर्ण आणि निरपेक्ष नियंत्रणाखाली राहिली पाहिजे, यावर न्यायालयाने भर दिला. ◂ (वृत्तसंस्था)

### असा निर्णय मानला जाऊ शकत नाही

पडताळणी न करता एआयद्वारे तयार केलेले न्यायालयीन दाखले सादर करणे त्यांचा संदर्भ किंवा त्यांचा वापर करणे याबाबत न्यायालयाने शून्य सहनशीलतेचे धोरण स्वीकारणे आवश्यक आहे. पडताळणी न करता अशा निकालांचा संदर्भ देणे हे वकिलाच्या बाजूने केलेले गैरवर्तन आहे, असे न्यायालयाने म्हटले. असा निर्णय घेण्याच्या प्रक्रियेवर संबंधित माहितीचा थेट किंवा अप्रत्यक्ष परिणाम झाला असो वा नसो, कायद्याच्या दृष्टीने असा निर्णय हा निर्णयच मानला जाऊ शकत नाही, हे स्पष्ट करण्यास आम्हाला कोणताही संकोच वाटत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# प्रगत शेतीचा सन्मान; कर्तृत्ववान शेतकऱ्यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जुलै-**

कृषीदिन अर्थात माजी मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिनाचे औचित्य साधून भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा, सोलापूर पूर्व यांच्या वतीने कारंबा येथे कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या प्रगतिशील शेतकऱ्यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, उत्पादनवाढ, पीक वैविध्य आणि प्रयोगशीलतेला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला शेतकरी व ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य होते. तर जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा अर्थ व बांधकाम सभापती इंद्रजीत पवार, उत्तर सोलापूर पंचायत समितीचे उपसभापती सुनील भोसले, तालुका कृषी अधिकारी रामचंद्र माळी, भाजप जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, भाजप सरचिटणीस विकास वाघमारे, उत्तर सोलापूर भाजप अध्यक्ष संभाजी धडे, महेश पवार, कारंबा सरपंच तुकाराम चव्हाण, दत्तात्रय पवार, भाजप ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष विनायक सुतार तसेच कृषी सहाय्यक ज्ञानेश्वर गोडसे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुरस्कारप्राप्त शेतकऱ्यांनी आधुनिक शेती पद्धती, पाण्याचा कार्यक्षम वापर, पीक नियोजन आणि नव्या तंत्रज्ञानाचा अवलंब करून परिसरातील इतर शेतकऱ्यांसाठी आदर्श निर्माण केल्याचे मान्यवरांनी यावेळी सांगितले. प्रास्ताविक विनायक सुतार यांनी केले, तर सूत्रसंचालन सुवास भोसले यांनी केले. आभार प्रदर्शन अतुल रोकडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महेश पेंडपाले, अमोल सुतार, प्रशांत जगताप, मशाक शेख, संजय आदाटे, सत्तार शेख, बाळासाहेब माने, बाबुराव पाटील, जगदीश पाटील, प्रदीप पाटील आदींनी परिश्रम घेतले.



**यांचा झाला सन्मान**

कृषी क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विजय भोरे, ज्योतिष गुंड, गणेश गुट्टे, अशोक बहिर्जी, आकाश गव्हाणे, विशाल माने, श्रीधर गायकवाड, संजय बहिर्जी, हरीश जाधव, महानंदा गुढे आणि नागेश ननवरे या शेतकऱ्यांचा शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

## महत्वाचे...



### 'लोकमंगल'तर्फे दक्षिण आणि उत्तर तालुक्यात वह्यांचे वाटप

**सोलापूर, दि. १ जुलै-**

दक्षिणचे आमदार सुभाष देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली लोकमंगल फाउंडेशन अंतर्गत दक्षिण सोलापूर व उत्तर सोलापूर तालुक्यातील बोरुळ, सावतखेड, बंकलगी, निम्बर्गी, नंदुर, हिरज आणि डोणगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील सर्व विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास प्रत्येक शाळेतील शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, पालक, ग्रामस्थ उपस्थित होते.



### मुख्याध्यापक वसंत भिसे यांचा सन्मान

**सोलापूर, दि. २ जुलै-**

जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा सुलेरजवळगे (ता. अक्कलकोट) शाळेचे मुख्याध्यापक वसंत भिसे यांच्या सेवापूर्तीनिमित्त मुख्याध्यापक धोंडाप्पा रुपनुरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेकडून भिसे कुंटबीय यांचे गावचे माजी संरपच पिरोजी शिंगाडे यांच्या हस्ते व कल्मेश्वर प्रशालेच्या वतीने व ग्रामस्थाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी शिलवंत पुजारी, सिद्धाराम घोडके, दत्तात्रय माने, प्रेमलता देशमुख, आदेप्पा कापसे, राजकुमार जाधव, मलय्या स्वामी, म्हाळप्पा सोनटक्केले, चिदानंद गंगदे, संतोष बाके आदी उपस्थित होते.



### मिळकतकर विभागातील दोमल, म्हेत्रे, मस्के यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार

**सोलापूर, दि. २ जुलै-**

सोलापूर महानगरपालिकेच्या मालमत्ताकर विभागातील दीर्घकाळ प्रामाणिक व कर्तव्यनिष्ठ सेवा बजावलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित सत्कार समारंभ पार पडला. मिळकतकर विभागाचे अधीक्षक युवराज गाडेकर यांच्या हस्ते वमुले अरविंद दोमल, वमुले अंजनय्या म्हेत्रे आणि शिपाई राजाराम मस्के यांचा त्यांच्या प्रदीर्घ सेवेसाठी गौरव करण्यात आला. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. उपस्थितांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत निवृत्तीनंतरच्या आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. समारंभाचे आयोजन उमेश वाघमारे आणि वसंत झांबरे यांनी उत्कृष्टरीत्या केले होते. या कार्यक्रमात निरीक्षक कोकणे, कांबळे, देशमुख, फुले, स्वामी, विठ्ठल कस्तुरे उपस्थित होते.



### शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी घेतले मशृम गणपतीचे दर्शन

**सोलापूर, दि. २ जुलै-**

शिवसेना जिल्हाप्रमुख व सोलापूर महानगरपालिका गटनेता अमोल शिंदे यांनी घेतले श्री मशृम गणपतीचे दर्शन यावेळी त्यांच्या हस्ते श्रीची आरती व पूजा करण्यात आली. यावेळी श्री मशृम गणपती भक्त मंडळाच्या वतीने मंदिराचे पुजारी संजय पतंगे यांच्या हस्ते त्यांचा श्रींची प्रतिमा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी मंदिर परिसरातील पाहणी करून माहिती घेतली व मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांचे सोयीसुविधा शिस्त स्वच्छता तसेच मंदिरातील नियमावली पाहून त्यांनी मन प्रसन्न झाले असे विचार व्यक्त केले. यावेळी मंडळाचे अध्यक्ष राजू हौशेट्टी, राजकुमार शिंदे, विलास रेवजे, दत्ता काटे, कुमार धुमाळ, शरद काटे, मल्लू रेवजे, तसेच भक्त मंडळाचे भैया पतंगे, ईश्वर पतंगे, अमोल तांबे, विशाल सुरवसे, अप्पू रेवजे, गणेश हौशेट्टी, नागराज उपस्थित होते.



### महापालिकेच्या वतीने माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांना अभिवादन

**सोलापूर, दि. २ जुलै-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने हरितक्रांतीचे प्रणेते व माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृहनेते नरेंद्र काळे, नगरसेविका अश्विनी चव्हाण उपस्थित होते.

## जि.प.च्या समाजकल्याण विभागकडून दिव्यांगासाठी १.६० कोटींचा निधी

### पोलिस भरतीविषयक मोफत प्रशिक्षण, महिला कौशल्यविकासचा समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जुलै-**

ग्रामीण भागातील युवक-युवती, महिला आणि दिव्यांग घटकांना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जिल्हा परिषद समाजकल्याण समितीने महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. रोजगारनिर्मिती, कौशल्यविकास आणि स्वावलंबनाला चालना देणाऱ्या विविध योजनांच्या अंमलबजावणीवर भर देत समितीने बेरोजगारी कमी करण्याच्या दिशेने ठोस पावले उचलली आहेत. अशी माहिती समाजकल्याण समितीच्या सभापती संस्कृती सातपुते यांनी दिली.



ग्रामीण भागातील युवकांना पोलीस दलात भरती होण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत मोफत पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण दिले जाणार आहे. या प्रशिक्षणात मैदानी सरावासह लेखी परीक्षेची तयारी करून घेतली जाणार असल्याने स्पर्धा परीक्षांसाठी ग्रामीण विद्यार्थ्यांना मोठा आधार मिळणार आहे. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी व्यावसायिक कौशल्य प्रशिक्षणावर विशेष भर देण्यात आला आहे. ब्युटी पार्लर, संगणक प्रशिक्षण, डिजिटल कौशल्ये तसेच शिवणकाम यांसारख्या प्रशिक्षणांच्या माध्यमातून महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी मदत मिळणार असून कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नातही वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**१ कोटी ६० लाखांचा निधी मंजूर**

दिव्यांग बांधवांना स्वावलंबी बनविण्यासाठी ई-रिक्षा वाटप योजनेसाठी तब्बल १ कोटी ६० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. याशिवाय त्यांच्या शैक्षणिक पात्रता आणि कौशल्यांनुसार रोजगार मेळावे आयोजित करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

**आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण**

समाजातील मागासवर्गीय, महिला आणि दिव्यांग घटकांना शासनाच्या योजनांचा अधिकाधिक लाभ मिळावा, तसेच त्यांचे आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण व्हावे, या उद्देशाने या निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी केली जाणार असल्याचे सभापती सातपुते यांनी स्पष्ट केले.

## स्मार्ट मीटरची ग्राहकांना सक्ती करू नये

### कामटे संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २ जुलै-**

वीज ग्राहकांकडील व्यवस्थित, उचित पद्धतीने कार्यरत मीटर न बदलण्यासह असंवैधानिक सक्तीबाबत विरोध असल्याचे निवेदन उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी, सांगोला यांना देऊन मुख्यमंत्री, सचिव वीज मंत्रालय भारत सरकार दिल्ली, जिल्हाधिकारी व अधीक्षक अभियंता सोलापूर यांनाही पाठवण्यात आल्याची माहिती शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्या वतीने देण्यात आली.

वीज कायदा २००३ मधील कलम ५५ नुसार स्मार्ट मीटर बाबतीत सक्तीचा उल्लेख नसून अचूक मीटर अपेक्षित आहे व त्यामध्ये सुद्धा वीज ग्राहकांना मीटर निवडीचा अधिकार स्पष्ट दिलेला आहे. नुकत्याच कर्नाटक, तामिळनाडू हायकोर्टाचा स्मार्ट मीटर सक्तीच्या विरोधात एप्रिल २०२५ मधील स्थगिती निर्णय म्हणजे भारतीय संविधान व ग्राहक संरक्षण कायद्याचा सन्मान करत स्थगिती दिलेली आहे.

दि.२ एप्रिलला केंद्रीय वीज मंत्री मनोहरलालजी खट्टर यांनी लोकसभेत स्मार्ट प्रीपेड वीज मीटरची सक्ती नसून ते वीज ग्राहकास निवडीचा अधिकार आहे असे प्रतिपादन केले होते. तरी विद्युत कंपनीने वीज ग्राहकांना स्मार्ट मीटरची कोणतीही सक्ती करू नये अन्यथा याविरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा कामटे संघटनेने दिला आहे.



## सुरमई शाम कार्यक्रमाने रसिक मंत्रमुग्ध

**बार्शी, दि. २ जुलै-**

नुकताच येथील मायबोली सांस्कृतिक मंडळाच्यावतीने स्वरसंपदा म्युझिक अकॅडमी, पुणे यांचा सुरमई शाम हा हिंदी मराठी गाण्यांचा बहारदार कार्यक्रम संपन्न झाला. सुरमई शाम या शीर्षक गीतापासूनच सुरु झालेल्या या कार्यक्रमामध्ये ये जिंदगी गले लगा ले, सुनो सजना, तू जहां जहां चलेगा, हम तेरे प्यार मे सारा आलम,नैनो मे बदरा छाये, रेशमाच्या रेघांनी, पान खायो सैया हमारे, जानेमन जानेमन.... अशी अनेक गाणी डॉ. संतोष काळे, संपदा काळे, स्वरांजली काळे,शुभांगी काळे आणि सिद्धांत काळे या गायक गायिकांनी सादर केली. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे बार्शीच्या प्रसिद्ध गायिका शुभांगी काळे, त्यांची अमेरिकेत असलेली संतोष आणि स्वरांजली ही अपत्ये, पुण्यात असलेली संपदा ही मुलगी आणि सिद्धांत हा अमेरिकेतील नातू अशा काळे कुटुंबीयांच्या तीन पिढ्या यात सहभागी झाल्या होत्या. गायक कलाकारांना अपूर्व द्रविड, ऋतुराज कोरे, केदार परांजपे आणि अमृता ठाकूर देसाई या वादकानी उत्तम साथ सांगत केली. कार्यक्रमाचे निवेदन अभिजीत कुलकर्णी यांनी केले. प्रारंभी ज्ञानेश्वर माऊली आणि मायबोलीचे संस्थापक अध्यक्ष स्व. विजयकुमार माढेकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. अध्यक्ष मुकुंदराज कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. सचिव डॉ. प्रशांत मोहिरे यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. याप्रसंगी स्नेहभोजनाचे प्रायोजक जय भारत कन्स्ट्रक्शन कंपनीचे संचालक दिनेशसिंह परदेशी आणि माधुरी परदेशी यांचा सत्कार करण्यात आला. राजेंद्र श्रीश्रीमाळ यांनी आभार मानले. डॉ. वैशाली मोहिरे आणि पल्लवी माढेकर यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जवाहर माढेकर, अरुण शहा, व्यंकटेश कुलकर्णी सुनील आबा पाटील, जितेंद्र माढेकर, निलेश माढेकर यांनी परिश्रम घेतले.

## भर रस्त्यावर महिलेचे मंगळसूत्र लंपास

**माळशिरस, दि. २ जुलै-**

पुरंदावडे (ता.माळशिरस) येथील पुलावर दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी एका महिलेच्या गळ्यातील ८० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून नेल्याची घटना सोमवारी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास घडली आहे. या प्रकरणी माळशिरस पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार दीक्षा संदीप पांढरे (वय २३, रा. ४४ फाटा, पांढरे वस्ती, नातेपुते) या आपल्या पतीसोबत दुचाकीवरून (क्रमांक १२४२४१) नातेवाईकांकडे जात असताना पाठीमागून काळ्या रंगाच्या पल्सर दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी त्यांना गाठले. या चोरट्यांनी तक्रारदार महिलेच्या गळ्यातील १३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र आणि अर्धे मंगळसूत्र, असा एकूण ८० हजार रुपये किम तीचा ऐवज त्यांच्या संमतीशिवाय हिसकावून नेला. या घटनेनंतर पीडित महिलेने माळशिरस पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून, अज्ञात चोरट्यांविरुद्ध जबर चोरी व चोरीचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास एएसआय श्रीकांत निकम करत आहेत.

## बार्शी उपविभागीय पोलिस अधिकारीपदी जगताप

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ जुलै-**

बार्शी उपविभागीय पोलीस अधिकारी (डीवायएसपी) पदावर नागपूर शहरातील सहाय्यक पोलीस आयुक्त (एसीपी) सुहास जगताप यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांनी २९ जून रोजी पदभार स्वीकारला आहे. निवृत्त उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकर यांच्या सेवानिवृत्तीनंतर हे पद रिक्त होते. या कालावधीत बार्शी उपविभागाचा अतिरिक्त कार्यभार आयपीएस अधिकारी अंजना कृष्णा यांच्याकडे सोपविण्यात आला होता.



बार्शी उपविभागांतर्गत बार्शी शहर, बार्शी तालुका, वैराग, पांगरी आणि माढा या पाच पोलीस ठाण्यांचा कारभार अंजना कृष्णा यांनी जवळपास दोन ते तीन महिने प्रभावीपणे सांभाळला. त्यांच्या कार्यकाळात मटका, गुटखा विक्री, जुगार, अवैध दारू विक्री आदी बेकायदेशीर व्यवसायांवर धडक कारवाया करण्यात आल्या. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याबरोबरच कोणत्याही दबावाला अथवा वशिल्याला बळी न पडता काम करण्याची त्यांची शैली सर्वसामान्य नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करणारी ठरली. आता नव्याने नियुक्त झालेले सुहास जगताप यांच्यासमोर हा विश्वास अधिक दृढ करण्याबरोबरच अवैध व्यवसायांवर प्रभावी नियंत्रण कायम ठेवण्याचे मोठे आव्हान असणार आहे.

## श्री संत माणकोजी महाराज बोधले यांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त आज कीर्तनसेवा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ जुलै-**

संतश्रेष्ठ श्री माणकोजी महाराज बोधले हे संत तुकाराम महाराजांच्या समकालीन असलेले महान वारकरी संत होते. अखंड हरिनाम, कीर्तनसेवा, भक्ती आणि वैराग्याच्या माध्यमातून त्यांनी धामणगाव भूमीला धाकटी पंढरी म्हणून ओळख प्राप्त करुन दिली.

संत माणकोजी महाराजांच्या कीर्तनभक्तीची महती अशी होती की, त्यांच्या चरित्रातील दाखल्यानुसार त्यांच्या कीर्तनसेवेत साक्षात पांडुरंग परमात्मा स्वतः टाळ घेऊन त्यांच्या मागे उभे राहत असत, अशी संतपरंपरेतील श्रद्धा आहे. त्यांच्या संजीवन समाधीच्या वेळीही पांडुरंग परमात्मा धामणगाव येथे उपस्थित राहिल्याची भाविकांची अखंड श्रद्धा आहे. अशा या पावन संतभूमीत दरवर्षी संजीवन समाधी सोहळा भक्तिभावाने साजरा केला जातो. याच पुण्यप्रसंगी सद्गुरु श्री. प्रभाकरदादा बोधले महाराज (धामणगावकर-पंढरपूर) यांच्या अमृतवाणीतून संतचरित्र, नाममहिमा आणि पांडुरंगभक्तीचा लाभ शुक्रवार दि. ३ जुलै सकाळी १० ते १२ या वेळेत श्रीक्षेत्र धामणगाव (ता. बार्शी) येथे भाविकांना मिळणार आहे.

कीर्तनानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली असून तरी भाविकांनी या सोहळ्यास उपस्थित राहून संतचरणी सेवा अर्पण करावी, अशी विनंती समस्त बोधराज भक्त मंडळातर्फे करण्यात आली आहे.

## पंढरपुरात अतिक्रमण हटाव मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२ जुलै-**

आषाढी यात्रेसाठी येणाऱ्या वारकरी भाविकांना तसेच स्थानिक नागरिकांना पंढरपूर शहरात रहदारीचा कोणताही त्रास होऊ नये. यासाठी आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर नगरपालिका व पोलीस प्रशासनाच्यावतीने संयुक्तपणे अतिक्रमण हटाव मोहीम सुरू केली असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

आषाढी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी सुमारे १८ ते २० लाख भाविक दर्शनाला येतील असा अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर गर्दीच्या ठिकाणी तसेच मंदिर व परिसरातील अतिक्रमणे काढण्यास प्रशासनाने अतिक्रमण मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेत मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्यासह २५ पोलीस व नगरपालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांचा पथकात समावेश असून दि. ३० जूनपासून छत्रपती शिवाजी चौक ते अर्बन बँक, अर्बन बँक ते इंदिरा गांधी चौक, इंदिरा गांधी चौक ते सावरकर चौक तसेच भाई राऊळ पुतळा चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक (स्टेशन रोड) येथील अतिक्रमणे काढली आहेत. पंढरपूर शहरात अतिक्रमण केलेल्या व्यापाऱ्यांना व विक्रेत्यांना अतिक्रमण काढण्याबाबतच्या सूचना नगरपालिका प्रशासनाने दिल्या होत्या, मात्र सदर अतिक्रमण संबंधितांनी काढले नाही. त्यामुळे कारवाई करावी लागत आहे. शहरातील सर्वच भागात अतिक्रमणाची कारवाई पोलिस प्रशासन व नगरपालिका प्रशासनाच्या वतीने करणार असल्याचेही, प्रांताधिकारी सचिन इथापे, सहाय्यक पोलिस अधीक्षक प्रशांत ढगळे यांनी सांगितले.



## अकलूज शहरात पाणीटंचाईच्या झळा

### पाणीपुरवठा तळ्यामध्ये मर्यादित साठा; टँकरद्वारे पाणीपुरवठाचा निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २ जुलै-**

अकलूजशहरातपाणीटंचाईच्या झळा जाणवू लागल्या आहेत, पाणीपुरवठा तळ्यामध्ये मर्यादित साठा असल्याने टँकरद्वारे पाणीपुरवठाचा निर्णय नगरपरिषदेने घेतला आहे. सध्या शहरात १० टँकरद्वारे अकलुज शहराच्या दोन भागातुन पाणी पुरवठा करण्यात येणार आहे.

पाच दिवसाआड टँकरने पाणी पुरवठा होणार आहे. अकलूज शहरास पिण्याच्या पाणी पुरवठ्याचे स्तोत्र असलेल्या वीरभाटघर धरणाची पाणी पातळी घटली असल्यामुळे जलसंपदा खात्याच्या पाणी कपात धोरण व सुचनेनुसार शहरास चार दिवसाआड पाणी पुरवठा करणाऱ्या अकलुज नगरपरिषदेने शहराला २१ दिवसाआड पिण्याचे पाणी पुरवठ्याचे नियोजन केले आहे. वापरावयाच्या पाण्यासाठी पाच दिवसाआड १० टँकरने पाणी पुरवठा करण्याचे धोरण आखले आहे. यंदाच्या पावसाळ्यात एल निलमुळे मान्सुन लांबल्याने व पाऊस कमी होणार आहे. राज्यातील सर्व धरणांच्या पाण्याची पातळी खालवल्यामुळे महाराष्ट्र राज्य शासनाच्या जलसंपदा विभागाने पाणी कपात व काटकसरीने वापरण्या चे पाणी पुरवठा करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांना निर्देश व सुचना दिल्यामुळे पाणी पुरवठा लाबला आहे.

अकलूज नगरपरिषदेस पाणी पुरवठा करणाऱ्या वीरभाटघर धरण प्रशासनाने आषाढी वारीच्या पार्श्वभुमीवर १२ जुलैला ४५ दिवसांनी निरा उजवा व डाव्या कालव्यातून पाणी आवर्तन सोडणार असल्याचे जाहीर केल्याप्रमाणे अकलुज नगरपरिषदेने २७ व २८ जुन रोजी पाणीपुरवठा केल्यानंतर आता आषाढी वारीत जगद्गुरु संत श्री.तुकाराम महाराज पालखी सोहळा आगमनापुर्वी २१ दिवसांनी पाणी पुरवठा करण्याचे नियोजन केले आहे. वापरावयाच्या पाण्यासाठी अकलुज शहराला दर पाच दिवसा आड १० टँकरने पाणी पुरवठा करण्यात येणार आहे. तसेच पावसाळ्यात धरण प्रशासन व जलसंपदा विभाग सुचने व निर्देशानुसार पाणी पुरवठा करण्यात येणार असल्याचे पाणी पुरवठा विभाग प्रमुख शेख यांनी सांगितले.

# रशियाचा युक्रेनवर ड्रोन-क्षेपणास्त्रांचा मारा

## १८ नागरिकांचा मृत्यू, ८० जखमी, अनेक इमारती-पायाभूत सुविधा उद्ध्वस्त

**कीव्ह, २ जुलै**

युक्रेनियन सैन्याने मॉस्कोच्या पूर्वेकडील निझनी नोव्हगोरोड प्रदेशातील रशियाच्या तेल शुद्धीकरण प्रकल्पावर बुधवारी हल्ला केला. यात या प्रकल्पाचे मोठे नुकसान झाले, याशिवाय रशियाच्या ताब्यातील लुहान्स्क प्रदेशातील सिव्हरस्की डोनेट्स नदीवरील एका रेल्वे पूलही पूर्णपणे नष्ट झाला. युक्रेनच्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून गुरुवारी रात्री रशियाने युक्रेनची राजधानी कीव्ह आणि आसपासच्या भागावर ड्रोन-क्षेपणास्त्रांचा मारा केला. यात १८ नागरिकांचा मृत्यू झाला, तर ८० पेक्षा अधिक जखमी आहे.

हल्ल्यात अनेक निवासी उद्ध्वस्त झाल्या. इमारतीच्या ढिगाऱ्यातुन नागरिकांना बाहेर काढण्यासाठी बचाव पथकाकडून युद्धपातळीवर मोहीम सुरू आहे. क्षेपणास्त्र आणि ड्रोनच्या माऱ्यामुळे झालेल्या प्रचंड स्फोटांनी कीव्ह शहरात विध्वंस झाला. लष्करी प्रशासनाचे प्रमुख तिमूर टकाचेंको यांनी सांगितले की, या हल्ल्यांमध्ये निवासी इमारतींचे आणि पायाभूत सुविधांचे नुकसान झाले. निवासी भागावर हल्ला करणे दहशतवादी कृत्य असून, रशियाला जोरदार प्रत्युत्तर दिले जाईल. बॅलिस्टिक आणि क्रूझ क्षेपणास्त्रे तसेच, ड्रोनचा वापर करून केलेल्या हल्ल्यामुळे डनिप्रो नदीच्या दोन्ही काठांवर वसलेल्या शहराच्या सर्व १० जिल्ह्यांत आणिबाणी घोषित करण्यात आली. हजारो नागरिकांना मेट्रो स्थानकांत स्थलांतरित करण्यात आले. ◂ (वृत्तसंस्था)


रशियाच्या हल्ल्यात नुकसान झालेल्या परिसरात बचावपथकाकडून युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू आहे

### शासकीय इमारतीही लक्ष्य

टकाचेंको यांनी सांगितले की, या हल्ल्यात देस्नियान्स्की जिल्ह्यातील एक निवासी इमारत उद्ध्वस्त झाली, पेचेर्स्की जिल्ह्यातील दोन ठिकाणी निवासी इमारतींजवळ आणि सोलोमियान्स्की जिल्ह्यातील एका प्रशासकीय इमारतीजवळ आग लागली. रशियन वायुदलाने शासकीय इमारतींना लक्ष्य करत क्षेपणास्त्रांचा मारा केला. हवाई संरक्षण प्रणालीने अनेक क्षेपणास्त्र हवेतच नष्ट केले. ■

### पुरवठा साखळी विस्कळीत

रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले की, युक्रेनने त्यांच्या नागरी पायाभूत सुविधांवर केलेल्या दूर पल्ल्याच्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून हा प्राणघातक बॉम्बहल्ला करण्यात आला. युक्रेनी सैन्य तेल शुद्धीकरण प्रकल्पाला सातत्याने लक्ष्य करत आहे. यामुळे पुरवठा साखळी विस्कळीत होत आहे. युक्रेनच्या प्रत्येक हल्ल्याचा सूड घेण्यासाठी आमचे सैन्य सज्ज आहे. ■

### कीव्ह शहरात ३० ठिकाणी हल्ले

कीव्ह शहरात काही तासातच ३० ठिकाणी हल्ले झाले. ज्यात प्रामुख्याने निवासी इमारती आणि नागरी पायाभूत सुविधांना लक्ष्य करण्यात आले. देशाचे गृहमंत्री इहोर क्लिमेन्को यांनी सांगितले की, हल्ल्यात २० निवासी इमारतींचे नुकसान झाले असून, अनेक नागरिक अजूनही ढिगाऱ्यात अडकले आहे. कीव्हच्या देस्नियान्स्की जिल्ह्यात, नऊ मजली निवासी इमारत कोसळली असून, ढिगाऱ्यात अनेक जण अडकले आहे. ■

# आंदोलन चिघळले; के. कवितांना अटक

## धक्काबुक्की, ओढणीवरून तेलंगणात गोंधळ

**हैदराबाद, २ जुलै**

तेलंगणा काँग्रेस सरकारविरोधात बोडुप्पल येथे सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान तेलंगणा रक्षा सेनेच्या (टीआरएस) प्रमुख के. कविता यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. तसेच पक्षाचे शेकडो नेते, कार्यकर्ते आणि तेलंगणा आंदोलनाच्या समर्थकांनाही अटक करण्यात आली. अटकेदरम्यान तेलंगणा पोलिसांनी कविता यांना केवळ ढकललेच नाही, तर त्यांना जबरदस्तीने उचलून एका वाहनात नेले, असा आरोप आहे.



टीआरएस प्रमुख के. कविता यांनी काँग्रेस सरकारने आपली आश्वासने पूर्ण करावीत, या मागणीसाठी गुरुवारी शेकडो समर्थकांसह आंदोलन केले. उप्पल मतदारसंघातील बोडुप्पल येथे भू-पोटारम आंदोलनादरम्यान त्यांना अटक करण्यात आली. भू-पोटारम आंदोलन म्हणजे जमिनीसाठीचा निषेध. पोलिसांनी कविता आणि शेकडो आंदोलकांना ताब्यात घेतले. नंतर, कविता यांना बोलाराम पोलिस ठाण्यात नेण्यात आले. टीआरएस नेत्याच्या अटकेदरम्यान अनेक महिला पोलिस अधिकाऱ्यांनी कविता यांना ताब्यात घेण्यासाठी त्यांच्याशी गैरवर्तन केल्यामुळे वातावरण तणावपूर्ण झाले. त्यांचे हात पिरगळण्यात आले आणि त्यांना जमिनीवर फरफटत नेल्याचा आरोप आहे.

### महिलांवर लाठीचार्ज अस्वीकार्ह

कविता यांनी आरोप केला की, पोलिसांनी महिलांसह आंदोलकांवर अतिरिक्त बळाचा वापर केला. उप्पलमध्ये तेलंगणा कार्यकर्ते आणि महिलांचे रक्त सांडले आहे. पोलिसांनी महिलांनाही सोडले नाही. त्यांच्यावर लाठीचार्ज केला. ही बाब अस्वीकार्य आहे. आंदोलक केवळ काँग्रेस सरकारने तेलंगणा आंदोलनाच्या कार्यकर्त्यांना २५० चौरस यार्ड जमीन देण्याचे निवडणुकीचे आश्वासन पूर्ण करावे, अशी मागणी करत होते. ◂ (वृत्तसंस्था)

# इस्त्रोच्या मुख्यालयात बॉम्ब ठेवल्याची धमकी अफवा

**बंगळुरू, २ जुलै**

इस्त्रोच्या येथील मुख्यालयाला बॉम्बची धमकी देणारा ई-मेल पाठवण्यात आल्यानंतर व्यापक शोधमोहीम राबवण्यात आली, अशी माहिती पोलिसांनी दिली. धमकी मिळाल्यानंतर पोलिस कर्मचारी, श्वान पथक आणि बॉम्ब शोधक व नाशक पथक घटनास्थळी तातडीने दाखल झाले, असे त्यांनी सांगितले.

खबरदारीचा उपाय म्हणून सर्व कर्मचाऱ्यांना बाहेर काढण्यात आले आणि त्याच वेळी इमारतीची कसून तपासणी करण्यात आली. या मोहिमेदरम्यान काहीही संशयास्पद आढळले नाही आणि नंतर ती धमकी अफवा असल्याचे जाहीर करण्यात आले, असे एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. संजयनगर पोलिस ठाणे या ई-मेलचा स्रोत आणि इतर तपशीलांची पडताळणी करीत आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# विजय सरकार पाडण्याचा कट ?

## घोडेबाजाराच्या आरोपांमुळे तामिळनाडूत खळबळ; तिघांना अटक



**चेन्नई, २ जुलै**

तामिळनाडूत सी. जोसेफ विजय यांच्या नेतृत्वात दोन महिन्यांपूर्वी टीव्हीके सरकारला सत्तेवर आले. परंतु, विजय यांचे सरकार पाडण्यासाठी घोडेबाजार होत असल्याच्या आरोपांमुळे राज्यात एक नवीन राजकीय वाद निर्माण झाला आहे. या प्रकरणी बुधवारी तिघांना अटक करण्यात आली.

तामिळनाडू वेत्री कळघम (टीव्हीके) पक्षाच्या एका मंत्र्याने दावा केला की, द्रविड मुन्नेत्र कळघम (द्रमुक) पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांशी संबंधित लोकांनी टीव्हीकेच्या आमदारांना पक्ष बदलण्यासाठी ५० कोटी रुपयांपर्यंतची ऑफर दिली होती. यानंतर, मुख्यमंत्री विजय यांनी बुधवारी चेन्नईमध्ये आपल्या आघाडीतील घटक पक्षांची बैठक बोलावली. या बैठकीत, द्रमुकने घोडेबाजाराच्या या आरोपांची चौकशी करण्याची मागणी केली.

### ३५ कोटींची 'ऑफर' दिल्याचा आरोप

विधानसभेत अविश्वास ठराव आणला जाईल असे सांगत आरोपीने मला विशिष्ट पद्धतीने मतदान करण्याच्या बदल्यात ३५ कोटी रुपये देऊ केले होते, असा आरोप टीव्हीकेचे आमदार एन. एलैयाराजा यांनी केला. त्यानंतर हा वाद सुरू झाला. त्यांनी सांगितले की, थिरुनावुक्करसू नावाच्या एका व्यक्तीने 'इंडियन पॉलिटिकल डेमोक्रॅटिक स्ट्रॅटेजीज' नावाच्या राजकीय फर्मचा प्रतिनिधी असल्याचा दावा करीत माझ्याशी संपर्क साधला. नंतर त्याने निवडणूक प्रक्रियेत पाठिंब्याच्या बदल्यात पैशांची ऑफर दिली. मी ही ऑफर नाकारली. त्यानंतर मला आणि माझ्या कुटुंबाला धमक्या मिळत असल्याचा आरोप करीत आमदाराने पोलिसांत तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी थिरुनावुक्करसूसह त्याचे दोन साथीदार, नरेश आणि थियागराजनला अटक केली. ◂ (वृत्तसंस्था)

### आरोपींचा बालाजींच्या भावाशी संबंध

पोलिसांनुसार, आरोपींपैकी एक नरेश हा सेंथिल बालाजींचा भाऊ अशोक कुमारच्या संपर्कात होता. नरेश हा अशोक कुमार यांच्याशी नियमितपणे किती रक्कम द्यायची आणि कोणत्या आमदारांशी संपर्क साधायचा याबद्दल बोलत असे. ■

# अमरनाथ यात्रेची पहिली तुकडी जम्मूतून रवाना

**श्रीनगर, २ जुलै**

जम्मूतील भगवती नगर यात्री निवास येथून गुरुवारी सकाळी ४ वाजता अमरनाथ यात्रेची पहिली तुकडी रवाना झाली. उपराज्यपाल मनोज सिन्हा यांनी भाविकांना रवाना केले.

भाविकांनी 'बम-बम भोले'च्या जयघोषात बाबा बर्फानींच्या दर्शनासाठी प्रस्थान केले. ५७ दिवसांची यात्रा ३ जुलैपासून पहलगाम आणि बालटाल दोन्ही मार्गांनी सुरू होऊन २८ ऑगस्टपर्यंत चालेल.

पहिल्या तुकडीत केवळ ज्यांनी आधीच नोंदणी केली होती त्या भाविकांना समाविष्ट करण्यात आले. तसेच ज्यांनी आरएफआयडी कार्ड बनवले होते आणि ई-केवायसी पूर्ण केली होती, त्यांचा समावेश आहे. चारधाम यात्रेत भाविकांची संख्या सातत्याने वाढत आहे. ३० जूनपर्यंत बद्रीनाथमध्ये १३.९२ लाख आणि केदारनाथमध्ये १३.६८ लाख भाविकांनी दर्शन घेतले. यावर्षी अमरनाथ यात्रेसाठी आतापर्यंत सुमारे चार लाख भाविकांनी नोंदणी केली आहे. प्रशासनाने सुरक्षा, वैद्यकीय, वाहतूक आणि इतर आवश्यक व्यवस्था आधीच पूर्ण केल्या आहेत, जेणेकरून यात्रा सुरक्षित आणि सुरळीतपणे पार पडू शकेल. ◂ (वृत्तसंस्था)


जम्मूमधून निघालेला पहिला जत्था रामबन येथे दाखल झाला.

## चित्रपट वार्ता

### सामंथाने शेअर केला 'बेबी बंप'चा फोटो

**मुंबई :** अभिनेत्री सामंथा रुथ प्रभूने समाज माध्यमावर तिच्या 'बेबी बंप'चा फोटो शेअर केला आहे. तिने तिच्या गरोदरपणाच्या बातम्यांची पुष्टी करत, विनोदी शैलीत या फोटोसोबत 'माय सिक्स पॅक' असे लिहिले आहे. सामंथा आणि तिचा पती, चित्रपट निर्माता राज निदिमोरू त्यांच्या पहिल्या बाळाचे स्वागत करणार आहेत. सामंथाने तिच्या अधिकृत इंस्टाग्राम अकाउंटवरून हा फोटो पोस्ट केला आहे. फोटोमध्ये ती तिचा 'बेबी बंप' दाखवताना दिसत आहे. फोटोच्या कॅप्शनमध्ये तिने 'माय सिक्स पॅक. आय विल सी यू व्हेन आय सी यू', असे लिहिले. तिच्या या पोस्टनंतर समज माध्यमावर लोक तिला शुभेच्छा देत आहेत. ■



### 'लॉक अप'ला मिळणार नवे वळण



**मुंबई :** 'लॉक अप : सच या सजा' या कथाबाह्य कार्यक्रमाच्या पुढील काही भागांमध्ये आता नवे वळण पाहायला मिळणार आहे. सोबतच, धक्कादायक खुलासे आणि गरमागरम वादविवादाचा प्रसंगही अनुभवास येणार आहे. यात शिवांगी जोशीसोबतच्या एका भावनिक संवादात सुनीता आहुजा हर्षद चोपडाचे कौतुक करते. फक्त हर्षद आणि शिवांगीच नाही, तर श्रेया कलरा आणि सुफी मोतीवाला यांनीही एका संवादात सुनीताच्या काळजीवाहू स्वभावाचे कौतुक केले. हा कथाबाह्य कार्यक्रम आता दररोज नेटफ्लिक्सवर रात्री ८ वाजता पाहता येणार आहे. ■

### 'एक होतं माळीण' चित्रपटाचा टीझर प्रदर्शित

**मुंबई :** पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यात अतिवृष्टीमुळे संपूर्ण गाव ढिगाऱ्याखाली गाडले गेले. या घटनेवर आधारित 'एक होतं माळीण' या चित्रपटाचा थरारक टीझर नुकताच प्रदर्शित झाला आहे. हा चित्रपट २४ जुलैला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. ड्रीम डॉट क्रिएशन प्रोडक्शनच्या संतोष जगन्नाथ म्हात्रे यांनी या चित्रपटाची निर्मिती केली असून दत्तात्रेय गायकर आणि राजू राणे यांनी लेखन व दिग्दर्शन केले आहे. चित्रपटात प्रशांत मोहिते, अश्विनी कासार, अभिजित श्वेतचंद्र, सिद्धी पाटणे आणि अनिल नगरकर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. तसेच, अजय गोगावले, जावेद अली, आनंदी जोशी आणि हरिदास शिंदे यांच्या आवाजातील गाणी प्रेक्षकांना भावणार आहेत. ■




### मॅनहोलमध्ये पडून एकाचा मृत्यू

**मुंबई, २ जुलै**

कुर्ला-साकीनाका परिसरातील खैराणी रोडवर मोबाईलवर बोलत चाललेल्या एका व्यक्तीचा मॅनहोलमध्ये पडून मृत्यू झाला. असलम अन्सारी असे या मृत व्यक्तीचे नाव आहे. साकीनाका येथील खैराणी रोडवरील सन्मान हॉटेलजवळ एका खाजगी कंत्राटदाराकडून देखभाल-दुरुस्तीचे काम सुरू होते. या कामासाठी रस्त्यावरील २५ फूट खोल मॅनहोलचे झाकण उघडे ठेवण्यात आले होते; मात्र आजूबाजूला कोणतेही सुरक्षेचे बॅरिकेड्स लावण्यात आले नव्हते. मोबाईलवर बोलत जाताना अंसारी थेट मॅनहोलमध्ये पडले. ◂ (वृत्तसंस्था)


पूर्वोत्तर भारतात पाऊस आणि पुराने धुमाकूळ घातला आहे. आसामातील अनेक जिल्ह्यांमध्ये पुराने थैमान घातले. . मोरिगाव जिल्ह्यातील हजारो गावांमध्ये पुराचे पाणी घुसले आहे.

# महुआ मोईत्रांना दाखवले काळे झेंडे

### प्रचंड विरोध, अंडीही फेकली

**नादिया, २ जुलै**

तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा यांना नागरिकांच्या विरोधाचा सामना करावा लागला. ही घटना पलाशी येथे घडली. त्यावेळी त्या हुतात्मा दिनाच्या कार्यक्रमाच्या तयारीशी संबंधित एका बैठकीला उपस्थित होत्या. यावेळी, भाजपाचे कार्यकर्ते एका रेस्टॉरंटबाहेर जमले. त्यांनी प्रचंड विरोध केला तसेच काळे झेंडे दाखवत त्यांच्यावर अंडी फेकली.



मोईत्रा यांनी आरोप केला की, भाजपाच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या कृष्णनगर येथील कार्यालयावर अंडी फेकून हल्ला केला. त्यांनी 'एक्स'वर एक व्हिडीओ देखील शेअर केला आहे. त्यात जमाव त्यांच्यावर अंडी फेकताना दिसत आहे. माझ्यावर भाजपाचे कार्यकर्ते हल्ला करीत असताना पश्चिम बंगाल पोलिस मूकदर्शक बनली होती, असा आरोप त्यांनी केला. ◂ (वृत्तसंस्था)

# सावधान! सूर्यावर प्रचंड स्फोट

## पृथ्वीच्या दिशेने घोंगावतेय भीषण सौर वादळ



**वॉशिंग्टन, २ जुलै**

सूर्याच्या आत झालेल्या एका प्रचंड स्फोटानंतर अमेरिकेतील शास्त्रज्ञ सतर्क झाले आहेत. शास्त्रज्ञांच्या मते, या स्फोटामुळे सूर्यावरील द्रव्याचा उद्रेक झाला आहे. (कोरोनल मास इजेक्शन-सीएमई) सुरू झाले आहे. हा विद्युतभारित कणांचा एक प्रचंड ढग आहे जो पृथ्वीच्या दिशेने येत आहे. अमेरिकेच्या 'नॅशनल ओशनिक अँड ॲटमॉस्फेरिक ॲडमिनिस्ट्रेशन'च्या 'स्पेस वेदर प्रेडिक्शन सेंटर'ने ३ जुलै (भारतीय वेळेनुसार ४ जुलै) साठी भूचुंबकीय वादळाचा इशारा जारी केला आहे.

सेंटरने त्यात म्हटले आहे की, सीएमईचा किमान काही भाग प्रचंड शक्तीने पृथ्वीवर आदळू शकतो. स्पेस डॉट कॉमच्या एका अहवालानुसार, जेव्हा विद्युतभारित सीएमई पृथ्वीच्या जवळ येतात, तेव्हा ते आपल्या ग्रहाच्या चुंबकीय क्षेत्राशी आंतरक्रिया करून भूचुंबकीय वादळ निर्माण करू शकतात. यामुळे नेत्रदीपक 'नॉर्दर्न लाइट्स' (उत्तर ध्रुवीय ज्योती) दिसू शकतात.

**नेमके काय घडले ?**

३० जूनला सूर्याने 'रिजन ४४७९' नावाच्या एका सक्रिय भागातून एक शक्तिशाली एक्स १.१ श्रेणीचा सौर भडका बाहेर टाकला. रिजन ४४७९ मध्ये असलेला हा भडका पृथ्वीच्या दिशेने होता. या स्फोटातून उत्सर्जित झालेले तीव्र एक्स-किरण आठ मिनिटांपेक्षा थोड्या जास्त कालावधीत पृथ्वीवर पोहोचले. यामुळे उत्तर अमेरिकेत दिवसा रेडिओ प्रसारणात तीव्र खंड पडला. याचा प्रामुख्याने उच्च-फ्रिक्वेन्सी रेडिओ वापरकर्त्यांवर परिणाम झाला. ज्यांना सिग्नलमध्ये तात्पुरता व्यत्यय किंवा खंड जाणवला. ◂ (वृत्तसंस्था)

### सीएमई पृथ्वीवर आदळू शकतात

शास्त्रज्ञांनी वर्तवलेल्या अंदाजानुसार, सीएमई पृथ्वीवर आदळू शकतात. तथापि, बहुतेक सीएमई पृथ्वीच्या उत्तरेकडून जातील. यामुळे वातावरणाशी आंतरक्रिया करून अमेरिकेच्या उत्तरेकडील भागांवर 'नॉर्दर्न लाइट्स' तयार करण्यासाठी पुरेसे विद्युतभारित कण निर्माण होऊ शकतात. तथापि, हे वादळाच्या नेमक्या मार्गावर आणि तीव्रतेवर अवलंबून असेल. ■

# परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्रींचा कार्यकाळ वाढला

**नवी दिल्ली, २ जुलै**

केंद्र सरकारने परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांचा कार्यकाळ एका वर्षासाठी वाढवला आहे. मंत्रिमंडळ नियुक्ती समितीने बुधवारी त्यांच्या कार्यकाळवाढीला मंजुरी देणारा आदेश जारी केला.

मिस्त्री यांचा कार्यकाळ १४ जुलैला संपणार होता. समितीने दिलेल्या माहितीनुसार १९८९ च्या तुकडीतील भारतीय परराष्ट्र सेवेचे अधिकारी विक्रम मिस्त्री यांचा कार्यकाळ १४ जुलैनंतर १४ जुलै २०२७ पर्यंत वाढवण्यात आला आहे. पुढील आदेश येईपर्यंत हा आदेश अंमलात राहील. समितीने एफआर ५६(डी) नियमाच्या तरतुदींनुसार हा निर्णय घेतला आहे. ◂ (वृत्तसंस्था)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख

# चावडीवरच्या रिकाम्या खुर्च्या...

भारतीय लोकशाहीबद्दल चर्चा करताना संसद, राज्यांची विधिमंडळे आणि झालेच तर महापालिकांच्या आमसभा यावरच बोलले जाते. त्यांच्याच बातम्या होतात आणि त्यावरच चर्वणही. लोकतांत्रिक व्यवस्थेच्या अधिष्ठानी असलेल्या ग्रामसभा या अत्यंत महत्त्वाच्या घटकाबद्दल कधीच बोलले जात नाही. क्वचित ग्रामसभेत काही गडबड झाली तर त्याची बातमी येते एवढेच. बाकी आपल्या व्यवस्थेला ग्रामसभांशी देणेघेणे नाही आणि आता तर ग्रामसभेतील चर्चेशी ज्यांच्या जगण्याचा संबंध आहे, त्या ग्रामस्थांकडूनही त्याकडे बऱ्यापैकी दुर्लक्ष केले जाते. भारत सरकारच्या ताज्या अहवालाने हा विषय चव्हाट्यावर आणला आहे. महात्मा गांधींच्या ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेला घटनात्मक अधिष्ठान देण्याचे महत्त्वाचे पाऊल म्हणजे ७३ वी घटनादुरुस्ती. या दुरुस्तीद्वारे पंचायती राज संस्थांना घटनात्मक दर्जा मिळाला आणि ग्रामसभेला स्थानिक स्वराज्य व्यवस्थेचा मूलाधार म्हणून राज्यघटनेत स्थान देण्यात आले. संसद किंवा राज्याचे विधिमंडळ पाच वर्षांतून एकदा मत मागते. ग्रामसभा मात्र वर्षातून अनेक वेळा थेट नागरिकांना निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी देते, हे याचे खरे वैशिष्ट्य. उपजीविकेची चिंता, व्यवसाय व नोकरीचा ताण, सहभागाचा कंटाळा, पारदर्शकतेचा व विश्वासार्हतेचा अभाव, राजकीय हस्तक्षेप आणि तक्रार निवारण व्यवस्थेतील त्रुटी या कारणांमुळे ग्रामीण भारतातील मोठा वर्ग ग्रामसभेपासून दूर जात असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. ४५ टक्के नागरिकांनी पारदर्शकतेचा अभाव हा प्रमुख मुद्दा असल्याचे स्पष्ट केले आहे. लोकशाहीच्या दृष्टीने हे सारे चिंताजनकच म्हटले पाहिजे.

भारतीय ग्रामीण समाजात गेल्या तीन दशकांत प्रचंड बदल झाले आहेत. पूर्वी गाव हीच गावातल्या माणसांची दुनिया होती. आज परिस्थिती बदलली आहे. रोजगाराचे स्वरूप बदलले आहे. हजारो-लाखो तरुण दररोज तालुक्याला, जिल्ह्याला किंवा शहरात कामासाठी जातात. अशा परिस्थितीत कामाच्या वेळेत बोलावलेल्या ग्रामसभेला उपस्थित राहणे त्यांच्या दृष्टीने व्यवहार्य नसतेच. मजुरांचेही तेच. दिवसाची मजुरी गमावणे म्हणजे एका दिवसाचे उत्पन्न गमावणे. पोट आणि लोकशाही यांच्यापैकी एकाची निवड करावी लागते, तेव्हा बहुतांश लोक पोटाची निवड करतात, हे वास्तव नाकारता येत नाही. लोकतांत्रिक यंत्रणेतील नियमित सहभागासाठी वेळ, माहिती, विश्वास आणि उपयोगिता या गोष्टी आवश्यक असतात. यातले काहीच होत नसेल तर कोण कशाला जाईल? 'सहभागाचा कंटाळा' हे वर्णन वरकरणी साधे वाटते. पण त्यामागे मोठे सामाजिक मानसशास्त्र आहे. लोक ग्रामसभेला का येत नाहीत?... कारण त्यांना असे वाटते की त्यांच्या उपस्थितीने काहीही बदलणार नाही. निर्णय आधीच ठरलेले असतात. चर्चा ही औपचारिकता असते. प्रश्न विचारले तर उत्तरे मिळत नाहीत. सूचनांची नोंद होत नाही. अशा अनुभवांची पुनरावृत्ती होते तेव्हा नागरिकांच्या मनात उदासीनता निर्माण होते. पुढे ही उदासीनता सवय बनते आणि शेवटी मानसिक दुरावा निर्माण होतो. राजकीय हस्तक्षेप हा आणखी एक गंभीर मुद्दा आहे. ग्रामसभा ही पक्षनिरपेक्ष लोकशाहीचे व्यासपीठ असावे. पण अनेक ठिकाणी ती स्थानिक गटबाजीचे रणांगण बनते. त्यामुळे सामान्य नागरिक या वातावरणापासून दूर राहणे पसंत करतो. आणखी एक समस्या म्हणजे तक्रार निवारणाची अपुरी व्यवस्था. ग्रामसभेत प्रश्न उपस्थित केला तरी त्यावर कोणती कारवाई झाली, याचा मागोवा घेण्याची परिणामकारक यंत्रणा बहुसंख्य ठिकाणी नाही. आपल्या मताचा काहीच परिणाम होत नसेल तर दूर राहिलेले बरे, असे नागरिकांना वाटत असेल तर ते चुकीचे म्हणता येणार नाही.

ग्रामसभा ही कायद्याने निर्माण केलेली संस्था. पण तिचे यश कायद्यावर नव्हे, तर लोकांच्या सहभागावर आणि विश्वासावर अवलंबून असते. कायद्याने प्रत्येक ग्रामपंचायतीला ग्रामसभा घेणे बंधनकारक करता येते, उपस्थितीची सूचना देता येते, कार्यसूची निश्चित करता येते; परंतु लोकांच्या मनात ग्रामसभेबद्दल आदर, आपलेपणा आणि परिणामकारकतेची भावना निर्माण करता येत नाही. ती निर्माण करण्यासाठी वेगळे प्रयत्न करावे लागतात. ते प्रयत्न होत नसतील तर असेच होणार. ग्रामीण प्रशासनात कोणतीही माहिती काही मोजक्या लोकांपुरती मर्यादित राहते. नोटीस वेळेवर दिली जात नाही. अजेंडा आधी उपलब्ध नसतो. त्यामुळे नागरिक तयारी करू शकत नाहीत. आर्थिक हिशेब सामान्यांना कळत नाहीत. लोकांना व्यवस्थित माहिती मिळाली, तर ते प्रश्न विचारतात आणि प्रश्न विचारले, तर उत्तरदायित्व वाढते. म्हणूनच माहिती लपविली जाते. पण, या लपवाछपवीतून देशाच्या लोकतांत्रिक व्यवस्थेलाच नख लागत असते. गेल्या काही दशकांत स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आलेल्या आरक्षणामुळे मोठी क्रांती घडली. हजारो महिला सरपंच झाल्या, सदस्य झाल्या. परंतु प्रतिनिधित्व आणि प्रभाव यांत मोठी दरी कायम आहे. काही ठिकाणी महिला फक्त सही करण्यापुरत्या उपस्थित राहतात. भारत हा तरुणांचा देश आहे. पण ग्रामसभेतील उपस्थिती पाहिली, तर तरुण सर्वांत कमी दिसतात. आजचा युवक डिजिटल जगात जगतो. त्याला वेग हवा असतो, त्वरित प्रतिसाद हवा असतो, ऑनलाईन माहिती हवी असते. त्याच्या अपेक्षांच्या तुलनेत ग्रामसभा संथ आणि औपचारिक असते. त्यामुळे भविष्यात ग्रामसभेची संकल्पना बदलावी लागेल. बैठकीचे थेट प्रक्षेपण, मोबाईलवर अजेंडा, ऑनलाईन सूचना, निर्णयांचा डिजिटल मागोवा, विकासकामांची जिओ-टॅग माहिती, सामाजिक लेखापरीक्षणाचे खुले डॅशबोर्ड यांसारख्या उपायांनी युवकांचा सहभाग वाढू शकतो. ग्रामसभा सक्रिय असेल तरच खरे लोकाभिमुख परिवर्तन शक्य असते. ज्या गावांमध्ये ग्रामसभा नियमित, पारदर्शक आणि सर्वसमावेशक पद्धतीने होतात, तेथे मोठा विकास झाला. तेथे निधीचा वापर अधिक परिणामकारक होतो. भ्रष्टाचारावर सामाजिक नियंत्रण राहते. याउलट ग्रामसभा निष्क्रिय असलेल्या गावांत निर्णय काही मोजक्या व्यक्तींच्या हातात केंद्रित राहतात. जगातील अनेक देशांनी सहभागी लोकशाहीचे यशस्वी प्रयोग केले आहेत. काही शहरांमध्ये नागरिक थेट अर्थसंकल्पातील काही भागाच्या वापराबद्दल निर्णय घेतात. काही देशांत प्रत्येक निर्णयाचे डिजिटल प्रकटन अनिवार्य आहे. भारतातही ही क्षमता आहे. आपल्या गावांत ज्ञान आहे, अनुभव आहे, सामाजिक भांडवल आहे. कमतरता आहे ती संवादाच्या गुणवत्तेची आणि संस्थात्मक विश्वासाची. ग्रामसभा जिवंत झाली तर पंचायत सक्षम होईल. पंचायत सक्षम झाली, तर जिल्हा मजबूत होईल. जिल्हे मजबूत झाले, तर देशाची लोकशाही अधिक सुदृढ होईल. त्यामुळेच ग्रामसभेतील रिकाम्या खुर्च्यांकडे केवळ उपस्थितीचा प्रश्न म्हणून नव्हे तर लोकशाहीच्या तब्येतीचा निर्देशांक म्हणून पाहिले पाहिजे. आपण विकसित भारताचे स्वप्न पाहत आहोत. पण या विकासाचा पाया शेवटी गावातच आहे. गावातील नागरिक निर्णय प्रक्रियेतून दूर गेला तर विकासाची इमारत उभी राहील; पण तिचा पाया कमकुवत राहील. ग्रामसभेतील सहभाग हा लोकशाहीच्या संस्कृतीचा आणि मूळ आत्मभानाचा विषय आहे. भारतीय राज्यघटनेने नागरिकाला मतदानाचा अधिकार दिला; परंतु ग्रामसभेने त्याला शासनात प्रत्यक्ष सहभागी होण्याचा अधिकार दिला आहे. मतदार हा पाच वर्षांतून एकदा जागा होतो; नागरिक मात्र दररोज जागा असतो. लोकशाहीला मतदारांपेक्षा सजग नागरिकांची जास्त गरज असते. गाव बदलायचे असेल तर ग्रामसभा बदलावी लागेल. लोकशाहीचा खरा प्रवास संसदेच्या पायऱ्यांवर सुरू होत नाही; तो गावाच्या चावडीपासून सुरू होतो. त्या चावडीवरच्या रिकाम्या खुर्च्या भरल्या तर भारतीय लोकशाहीच्या भविष्याचे अनेक प्रश्न आपोआप सुटू लागतील. अन्यथा निवडणुका नियमित होतील, सरकारे बदलतील, योजना येतील-जातील; पण लोकशाहीचा आत्मा हळूहळू संकुचित होत राहील. ■

## अर्थविशेष

### हितेश पारसे

# रोख व्यवहार करताना सावधान!

आयकर कायद्यातील मर्यादा जाणून घ्या; अन्यथा व्यवहाराइतकाच दंड भरावा लागू शकतो. भारताची अर्थव्यवस्था झपाट्याने डिजिटल होत आहे. तरीही अनेक व्यापारी, व्यावसायिक, बिल्डर, डॉक्टर, शेतकरी, संस्था तसेच सामान्य नागरिक मोठ्या प्रमाणात रोख व्यवहारास प्राधान्य देतात. आयकर कायद्यानुसार रोख व्यवहारांवर संपूर्ण बंदी नाही, परंतु ठरावीक मर्यादेपेक्षा जास्त रकमेचे रोख व्यवहार केल्यास केवळ करसवलत नाकारली जात नाही, तर काही प्रकरणांत व्यवहाराच्या संपूर्ण रकमेइतका दंडही आकारला जाऊ शकतो. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने या नियमांची माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे. पूर्वी बेहिशेबी रोख व्यवहार, मालमत्तेच्या खरेदी-विक्रीतील काळा पैसा, खोटे खर्च दाखवून करचुकवेगिरी तसेच कर्ज आणि ठेवींमधील अनधिकृत व्यवहार होत होते. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी आयकर कायद्यात विविध निर्बंध घालण्यात आले. बँकिंग माध्यमातून व्यवहार केल्यास प्रत्येक व्यवहाराची नोंद राहते. यामुळे व्यवहारांची सत्यता पडताळणे, कराची योग्य आकारणी करणे आणि आर्थिक शिस्त राखणे सुलभ होते.

२ लाख रुपयांपेक्षा जास्त रोख रक्कम स्वीकारणे धोकादायक आयकर कायद्यातील कलम २६९ एसटी हे सर्वाधिक महत्त्वाचे मानले जाते. समजा, एखाद्या बिल्डरने फ्लॅट बुकिंगसाठी ३ लाख रोख स्वीकारले किंवा एखाद्या व्यापाऱ्याने ग्राहकाकडून २.५० लाख रोख घेतले, तर हा व्यवहार कायद्याचे उल्लंघन ठरू शकतो. विशेष म्हणजे, व्यवहाराची रक्कम वेगवेगळ्या हप्त्यांमध्ये घेतली असली तरी जर ती एकाच व्यवहाराशी संबंधित असेल, तर आयकर विभाग त्या सर्व रकमा एकत्रितपणे पाहतो.

**मालमत्तेचे व्यवहार** - रिअल इस्टेट क्षेत्रात अनेक व्यवहारांमध्ये रोख रकमेचा वापर केला जातो. प्लॉट, फ्लॅट, दुकान, गाळा किंवा शेतजमीन खरेदी करताना 'थोडी रक्कम रोख आणि उर्वरित धनादेशाने' अशी पद्धत अनेक ठिकाणी पाहायला मिळते. मात्र, अशा व्यवहारांमध्ये केवळ आयकरच नव्हे तर स्टॅम्प ड्युटी, भांडवली नफा, टीडीएस, बेनामी व्यवहार कायदा आणि अवैध सावकारीशी संबंधित कायद्यांचेही परिणाम उद्भवू शकतात. त्यामुळे मालमत्तेच्या व्यवहारात रोख रकमेचा वापर शक्यतो पूर्णपणे टाळणे हेच हिताचे ठरते.

**२० हजारांपेक्षा जास्त रोख कर्ज स्वीकारू नका :** अनेकदा मित्र, नातेवाईक किंवा ओळखीच्या व्यक्तीकडून तात्पुरत्या स्वरूपात रोख पैसे घेतले जातात. 'आपल्याच माणसाचे पैसे आहेत' असा विचार करून अनेक जण हा व्यवहार सुरक्षित समजतात. परंतु आयकर कायद्यातील कलम २६९एसएस नुसार २० हजार रुपये किंवा त्यापेक्षा जास्त रक्कम रोख स्वरूपात कर्ज, ठेव किंवा मालमत्ता खरेदीसाठी अ‍ॅडव्हान्स म्हणून स्वीकारण्यास मनाई आहे. याचप्रमाणे कलम २६९टी नुसार अशा कर्जाची रोख स्वरूपात परतफेड करणेही प्रतिबंधित आहे. या नियमांचे उल्लंघन झाल्यास दंड हा काही टक्के नसून व्यवहाराच्या रकमेइतका असू शकतो.

**व्यापाऱ्यांनी विशेष काळजी घ्यावी :** व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींनी कलम ४०ए (३) कडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. जर एखाद्या पुरवठादाराला एका दिवसात १०,००० रुपयांपेक्षा जास्त रक्कम रोख दिली, तर तो खर्च आयकरात ग्राह्य धरला जाणार नाही. परिणामी व्यवसायाचा नफा वाढल्याचे गृहीत धरले जाईल आणि कराचा भारही वाढेल. उदाहरणार्थ, एखाद्या व्यापाऱ्याने माल खरेदीसाठी ५ लाख रोख दिले आणि तो खर्च नाकारला गेला, तर त्याला त्या रकमेवर अतिरिक्त आयकर भरावा लागू शकतो.

**रोख देणगी दिल्यास करसवलत मिळेलच असे नाही :** धार्मिक, सामाजिक किंवा शैक्षणिक संस्थांना देणगी देताना अनेक नागरिक रोख रक्कम देतात. मात्र, २,००० रुपयांपेक्षा जास्त रोख देणगीवर कलम ८०जी अंतर्गत करसवलत मिळत नाही. जर करसवलतीचा लाभ घ्यायचा असेल, तर देणगी धनादेश, यूपीआय, एनईएफटी, किंवा इतर बँकिंग माध्यमातून देणे आवश्यक आहे.

**बँकेतून मोठी रोख रक्कम काढणे चुकीचे आहे का? :** हा प्रश्न अनेकदा विचारला जातो. उत्तर आहे - नाही. स्वतःच्या खात्यातून पैसे काढण्यावर कोणतीही सर्वसाधारण बंदी नाही. परंतु मोठ्या प्रमाणावर रोख पैसे वारंवार काढले जात असल्यास त्याची माहिती आयकर विभागाकडे जाते. आवश्यक असल्यास विभाग त्या व्यवहारामागील कारणांची चौकशी करू शकतो. अनेक व्यापारी असा विचार करतात की, २ लाख एकाच वेळी न घेता ५०,००० चे चार हप्ते घेतले तर नियम लागू होणार नाही. हा अत्यंत धोकादायक गैरसमज आहे. जर सर्व रक्कम एकाच व्यवहाराशी संबंधित असेल, तर आयकर विभाग ती एकत्रित रक्कम मानतो.

**दंड किती होऊ शकतो? :** आयकर कायद्यातील काही तरतुदींमध्ये दंड हा व्यवहाराच्या रकमेइतका असू शकतो. याचा अर्थ - २ लाखांचा चुकीचा व्यवहार - २ लाख दंड. १० लाखांचा चुकीचा व्यवहार - १० लाख दंड. याशिवाय कर तपासणी, नोटीस, अपील, न्यायालयीन प्रक्रिया आणि व्यावसायिक प्रतिष्ठेवर होणारा परिणाम हा वेगळाच.

**सुरक्षित व्यवहारासाठी काही सोप्या सवयी :** शक्यतो सर्व मोठे व्यवहार बँकिंग माध्यमातून करा. प्रत्येक व्यवहाराची पावती आणि पुरावा जतन करा. मालमत्तेच्या व्यवहारात रोख रक्कम टाळा. व्यवसायाचे कॅश बुक नियमित लिहा. नातेवाईकांशी आर्थिक व्यवहार करतानाही कायद्याचे पालन करा. मोठा व्यवहार करण्यापूर्वी कर सल्लागाराचा सल्ला घ्या.

**सामान्य गैरसमज विरुद्ध वास्तव :** गैरसमज १ : '२ लाख चार हप्त्यांत घेतले तर नियम लागू होत नाही.', वास्तव : लागू होतो. गैरसमज २ : 'नातेवाईकांकडून पैसे घेतले तर नियम लागू होत नाही.' वास्तव : अनेक परिस्थितींमध्ये लागू होतो. गैरसमज ३ : 'कॅशमध्ये व्यवहार केला म्हणजे कर भरावा लागत नाही.' वास्तव : कर तर लागू होतोच; शिवाय दंडाचीही शक्यता असते. गैरसमज ४ : 'बँकेतून पैसे काढणे बेकायदेशीर आहे.' वास्तव : पूर्णपणे चुकीचे.

**वारंवार विचारले जाणारे प्रश्न** (एफएक्यू) :

प्रश्न : लग्नात ३ लाख रुपये रोख भेट मिळाली तर? उत्तर : परिस्थितीनुसार कलम २६९एसटी लागू होऊ शकते.

प्रश्न : प्लॉट बुकिंगसाठी ५ लाख रोख घेऊ शकतो का? उत्तर : नाही. अत्यंत धोकादायक.

**निष्कर्ष :** रोख व्यवहार हा गुन्हा नाही; परंतु नियमांकडे दुर्लक्ष करून केलेला मोठा रोख व्यवहार आर्थिकदृष्ट्या अत्यंत महाग ठरू शकतो. आजच्या डिजिटल युगात बँकिंग माध्यमातून व्यवहार करणे ही केवळ सोय नसून कायदेशीर सुरक्षितताही आहे. एक छोटीशी चूक लाखो रुपयांच्या दंडाचे कारण बनू शकते. त्यामुळे प्रत्येक नागरिक, व्यापारी, व्यावसायिक, बिल्डर आणि उद्योगपती यांनी आयकर कायद्यातील रोख व्यवहारांच्या मर्यादा समजून घेऊनच आर्थिक व्यवहार करावेत. कायद्याचे पालन हे केवळ दंड टाळण्यासाठी नाही, तर पारदर्शक आणि विश्वासार्ह आर्थिक व्यवस्थेचा भाग होण्यासाठीही आवश्यक आहे. ■

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## वेध

### प्रफुल्ल व्यास

# किल्ला बदनाम झाला!

प्रश्न किल्ल्याचा नाही, समाजाच्या ढासळत्या मूल्यांचा आहे. लोहगड बदनाम झाला कशासाठी आणि कोणासाठी तर तो तुमच्या-आमच्या ढासळत्या मानसिकतेपोटी! सह्याद्रीच्या कुशीत शतकानुशतके ताठ उभा असलेला लोहगड कित्येक राजवटी पाहून गेला. युद्धं पाहिली, पराक्रम पाहिले, विश्वासघातही पाहिले. हजारो पर्यटक त्याच्या पायऱ्या चढले, इतिहास अनुभवला, निसर्गात रमले. पण, तोच लोहगड एका धक्कादायक घटनेमुळे, विकृत मानसिकतेमुळे चर्चेत आला. समाजमाध्यमांवर काही तासांत लाखो प्रतिक्रिया उमटल्या. तरुण पिढी मीम्स तयार करण्यात दंग झाली. शौर्यासाठी प्रसिद्ध ठरलेला लोहगड आता खुनाच्या क्रौर्यासाठी ओळखला जातो आहे. ज्या ठिकाणी एका तरुणीने तिच्या प्रियकराच्या मदतीने होणाऱ्या नवऱ्याचा खून केला, ते ठिकाण आता प्रेक्षणीय स्थळ होते आहे. ज्या लोहगडावर दिवसाला ७०० ते ८०० पर्यटक येत होते, त्या ठिकाणी आता दोन-अडीच हजार पर्यटक भेट देऊ लागले. इतकंच काय, त्या दुर्दैवी जागेचे बारसेही करण्यापर्यंत आपली मजल गेली आहे. कुठे जात आहोत आपण? गेल्या दोन दशकांत आपल्या विवाह संस्कृतीत मोठा बदल झाला आहे. पूर्वी विवाह म्हणजे दोन व्यक्तींसोबत दोन कुटुंबांचे, दोन संस्कारांचे आणि दोन परंपरांचे मिलन मानले जायचे. आज अनेक ठिकाणी विवाह 'इव्हेंट' झाला आहे. त्यातून संस्कार कधीचेच उडून गेले आहेत. आजचा तरुण आणि तरुणी अधिक शिक्षित आहेत, आर्थिक सक्षम आहेत. निर्णय घेण्याचे स्वातंत्र्यही त्यांच्याकडे आहे. ते स्वागतार्ह असले तरी आपण आपली जबाबदारी विसरत आहोत. माझे आयुष्य, माझी मर्जी इथपर्यंतच आपण मर्यादित झालो आहोत. प्रत्येक निर्णयाचा परिणाम कुटुंबावर, मुलांवर, समाजावर आणि शेवटी स्वतःवरही होतो, हे समजावून सांगणारी पिढीही आता वृद्धावस्थेकडे सरकते आहे. दुसरीकडे समाजमाध्यमांच्या वेगात वैयक्तिक आयुष्य सार्वजनिक होऊ लागले आहे. नातेसंबंधांचे प्रदर्शन वाढले. पण, नात्यांचा गाभा कमी झाला. प्रेम व्यक्त करण्याची साधने वाढली. आज अनेक तरुण-तरुणी भावनिकदृष्ट्या एकाकी आहेत. मन मोकळे करण्यासाठी कोणीच नाही. संयुक्त कुटुंब पद्धती हळूहळू कमी झाली. घरात रागावणारे, समजावणारे, सांभाळणारे नाहीत. आई-वडील दोघेही नोकरीत, मुलांना वेळ कमी दिला जात असल्याने संवाद कमी झाला. घरात कोंडून असलेल्या मुलांच्या संस्कारांची जागा मोबाईलने घेतली. पालकांनी मुलांना उत्तम शिक्षण दिले. पण, आयुष्य जगण्याचे शिक्षण कितपत दिले? अपयश स्वीकारायला शिकवले का? नाती टिकवायला शिकवले का? तर, या प्रश्नांचे उत्तर नकारार्थीच मिळते. शिक्षण व्यवस्थेत मूल्यांऐवजी गुणांना महत्त्व. न्याय व्यवस्थेकडे समाज मोठ्या अपेक्षेने पाहतो. गुन्हा घडल्यानंतर कठोर शिक्षा व्हावी, ही अपेक्षा योग्यच आहे. पण, न्याय केवळ शिक्षेपुरता मर्यादित नसतो. गुन्हे घडू नयेत, अशी सामाजिक परिस्थिती निर्माण करणे हीदेखील तितकीच महत्त्वाची जबाबदारी आहे. कायद्याची भीती आणि समाजाचे भान या दोन्ही गोष्टी एकत्र असल्या तरच गुन्हे कमी होतील आणि लोहगडावर घडलेल्या घटना आपोआप कमी झालेल्या दिसतील. आज लोहगडवर झालेल्या घटनेत आणि त्यानंतर त्याचे जे कवित्व सुरू आहे त्यातून आपण आपल्या पुढच्या पिढीला नेमके काय देतो आहोत? कालची घटना नजरेआड करून नक्कीच चालणार नाही. त्या घटनेने एक संदेश दिला आहे. या घटनेने लोहगडाचे महत्त्व किंचितही कमी होणार नाही. लोहगड इतिहासासाठीच ओळखला जात होता आणि जाईलही. त्याच्या तटबंदीवर पुन्हा पर्यटक जातील, फोटो काढतील, इतिहास आठवतील. पण, काल-परवा झालेल्या घटनेतून आपण काही शिकलो नाही, तर उद्या दुसरा एखादा किल्ला, दुसरे एखादे शहर, दुसरे एखादे गाव अशाच कारणाने बदनाम होईल. एका मुलीने होणाऱ्या नवऱ्याला धकलून दिल्याने लोहगड नव्हे तर आपली मानसिकता बदनाम झाली. सामाजिक मूल्य पायदळी तुडवली जात आहेत. त्या किल्ल्याचे दगड अजूनही मजबूत आहेत. कमकुवत आपण झालो. घटनेचे गांभीर्य विसरून त्यावर विनोद सुचत आहेत. आज प्रश्न लोहगडचा नाही, आपल्या मुलांचा आहे, आपल्या संस्कारांचा आहे आणि उद्याच्या पिढीचा आहे. समाज बदलण्याची पहिली शाळा अजूनही कुटुंबच आहे, हे विसरून चालणार आहे. लोहगडाला बदनाम करणे थांबवा; त्याचा इतिहास कायम ठेवा. पर्यटकांना लोहगडावर इतिहास जाणून घ्यायला येऊ द्या... इतिहासात शत्रूला टकमकच्या टोकाहून कडेलोट करून शिक्षा दिली जात होती. पण, तो आमचा इतिहास होता. तसाच इतिहास कायम ठेवा. त्याला एका घटनेने विकृत करू नका... लोहगडाला प्रेम प्रकरणातील खुनाच्या जोखडात अडकून ठेवू नका. ■

९८८१९०३७६५

## तंत्रवेध

### डॉ. दीपक शिकारपूर

# जलसंवर्धनासाठी एआय!

भारतात या वर्षी कमी पावसाचा अंदाज व्यक्त केला जात आहे. हवामान बदल, वाढते तापमान, भूजलाची घटती पातळी आणि वाढती लोकसंख्या यामुळे पाण्याचे संकट दिवसेंदिवस गंभीर होत आहे. अनेक भागांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागते. शेती, उद्योग आणि घरगुती वापरासाठी पाण्याची मागणी वाढत असताना उपलब्ध जलस्रोत मात्र मर्यादित होत आहेत. अशा परिस्थितीत केवळ जलसंधारण पुरेसे नाही, तर उपलब्ध पाण्याचा अत्यंत कार्यक्षम वापर करणे आवश्यक झाले आहे. येथेच कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेटशी जोडलेली उपकरणे, सूक्ष्म संगणकीय चिप्स आणि डिजिटल तंत्रज्ञान महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. आज आपण ज्या पद्धतीने पाणी वापरतो, त्यात मोठ्या प्रमाणावर अपव्यय होतो. अनेक शेतकरी मोटार सुरू करून बंद करायला विसरतात. टाक्या भरल्यानंतरही पाणी वाहत राहते. गळतीमुळे हजारो लिटर पाणी वाया जाते. अनेक ठिकाणी पाण्याचे वितरण नियोजनशून्य असते. या सर्व समस्यांवर डिजिटल तंत्रज्ञान प्रभावी उपाय देऊ शकते. शेती हे भारतातील सर्वाधिक पाणी वापरणारे क्षेत्र आहे. अनेकदा पिकांना आवश्यकतेपेक्षा जास्त पाणी दिले जाते. यामुळे पाण्याचा अपव्यय होतोच. आधुनिक मृदा आर्द्रता मापक संवेदक जमिनीतील ओलावा सतत मोजतात. हे संवेदक सूक्ष्म चिप्सद्वारे माहिती संकलित करून संगणक किंवा भ्रमणध्वनीवर पाठवतात. कृत्रिम बुद्धिमत्ता या माहितीचे विश्लेषण करून पिकाला नेमके किती पाणी आवश्यक आहे हे ठरवते. त्यामुळे आवश्यक तेवढेच सिंचन होते आणि पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होते. अशा प्रकारच्या यंत्रणा आधुनिक तंत्रज्ञान पारापर्यंत आणत असून जलसंवर्धनाच्या कामी महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.

स्वयंचलित पंप नियंत्रण ही आणखी एक क्रांतिकारी संकल्पना आहे. पाण्याच्या टाकीत किंवा विहिरीत बसवलेले संवेदक पाण्याची पातळी सतत मोजतात. टाकी रिकामी झाल्यास पंप आपोआप सुरू होतो आणि टाकी भरल्यावर बंद होतो. त्यामुळे पाणी ओसंडून वाहण्याची समस्या संपते.



आधुनिक संवेदक आणि कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली पाईपलाईनमधील दाबातील बदलांचे विश्लेषण करून गळतीचे अचूक ठिकाण शोधू शकतात. यामुळे लाखो लिटर पाण्याची बचत होते. जगातील अनेक शहरांमध्ये अशा स्मार्ट जलव्यवस्थापन प्रणाली यशस्वीपणे वापरल्या जात आहेत. पर्जन्यमानाचा अचूक अंदाज घेण्यासाठी देखील आज कृत्रिम बुद्धिमत्ता उपयुक्त ठरत आहे.

शहरे आणि महानगरांमध्ये स्मार्ट जलमीटर मोलाची भूमिका बजावू शकतात. हे मीटर प्रत्येक घरातील पाणीवापराचे अचूक मोजमाप करतात. अचानक वापर वाढल्यास किंवा गळती आढळल्यास तत्काळ सूचना मिळते. नागरिकांना त्यांच्या वापराचे विश्लेषण पाहता येते आणि बचतीसाठी उपाय करता येतात. भविष्यात प्रत्येक घरात असे स्मार्ट जलमीटर बसवले गेल्यास शहरी भागातील पाण्याचा अपव्यय लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतो. कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित डिजिटल सहायक गावागावांमध्ये जलजागृतीसाठी उपयुक्त ठरू शकतात. धरणे, तलाव आणि जलाशयांच्या व्यवस्थापनातदेखील डिजिटल तंत्रज्ञान अत्यंत उपयुक्त भूमिका बजावू शकते. विविध ठिकाणी बसवलेले संवेदक पाण्याची पातळी, गुणवत्ता आणि साठ्याची माहिती सतत गोळा करतात. भूजल पातळीचा अभ्यास करण्यासाठीही आधुनिक चिप्स आणि संवेदक वापरले जाऊ शकतात. विविध विहिरींमधील पाण्याची पातळी मोजून कृत्रिम बुद्धिमत्ता भूजलाचा नकाशा तयार करू शकते.

पाणी गुणवत्तेचे परीक्षणदेखील अत्यंत महत्त्वाचे काम आहे. अनेक गावांमध्ये दूषित पाण्यामुळे आरोग्य समस्या निर्माण होतात. अशा वेळी तांत्रिक करामतीतून उभे राहणारे आधुनिक संवेदक पाण्यातील अशुद्धता, रासायनिक घटक आणि प्रदूषणाचे प्रमाण तपासू शकतात. पाण्याची गुणवत्ता खराब झाल्यास त्वरित सूचना मिळते. त्यामुळे नागरिकांना पिण्याचे सुरक्षित पाणी उपलब्ध करून देता येते. भारतातील स्टार्टअप उद्योग आणि तरुण अभियंत्यांसाठी हे क्षेत्र मोठी संधी निर्माण करत आहे. कमी खर्चातील संवेदक, स्वदेशी चिप्स, स्मार्ट सिंचन प्रणाली, जलविश्लेषण सॉफ्टवेअर आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित उपाय विकसित करून जागतिक बाजारपेठेत प्रवेश करता येऊ शकतो. ग्रामीण भारतासाठी परवडणारे आणि स्थानिक गरजांनुसार तयार केलेले उपाय या कामी विशेषतः महत्त्वाचे ठरणार आहेत. असे असले तरी यासंदर्भात तंत्रज्ञान हे प्रश्नांवरील एकमेव उत्तर नाही. नागरिकांमध्ये पाणीबचतीची जाणीव निर्माण करणे तेवढेच आवश्यक आहे. गळणारे नळ दुरुस्त करणे, पावसाचे पाणी साठवणे, पुनर्वापर वाढवणे, वाहन धुण्यासाठी कमी पाणी वापरणे आणि शेतीत सूक्ष्म सिंचनाचा अवलंब करणे या सवयी तितक्याच महत्त्वाच्या आहेत. तंत्रज्ञान आणि जबाबदार नागरिकत्व यांचा संगम झाल्यासच खरे जलसंवर्धन साध्य होईल.

हल्ली पावसाचे भाकीत वर्तवणे विशेष कौशल्याचे काम बनत आहे. त्यातल्या त्यात काही वेळात अचानक मोठा पाऊस पडून जात असल्यामुळे आणि नंतर तो अचानक गायब होत असल्याने पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे नियोजन आवश्यक बनत आहे. आजघडीला तर या वर्षी पाऊस काहीसा रुसलेला राहील, असेही आवर्जून सांगितले जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांबरोबरच धोरणकर्त्यांच्या मनात आधीच शंकेची पाल चुकचुकत आहे. कमी पावसाच्या शक्यतेमुळे येणारी वर्षे आव्हानात्मक ठरू शकतात. परंतु योग्य नियोजन, डिजिटल तंत्रज्ञानाचा व्यापक वापर आणि कृत्रिम बुद्धिमत्तेची साथ यामुळे प्रत्येक थेंबाचे व्यवस्थापन शक्य आहे. भविष्यातील भारताला पाणीसुरक्षित बनवायचे असेल तर जलसंधारणाबरोबरच स्मार्ट जलव्यवस्थापन स्वीकारावे लागेल. प्रत्येक थेंब मोलाचा आहे आणि त्या प्रत्येक थेंबाचे संरक्षण करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता, संवेदक, चिप्स आणि डिजिटल तंत्रज्ञान ही आजची नव्हे तर उद्याची अपरिहार्य गरज बनली आहे. ■

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वाचक पत्रे

### नराधमाला त्वरित फासावर लटकवा

नसरापूर प्रकरणातील साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार करून तिचा खून करणाऱ्या नराधम भीमराव कांबळेला भारतीय न्याय संहिता आणि पोक्सो कायद्यातील विविध कलमांखाली दोषी ठरवून विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी मरेपर्यंत फाशीची शिक्षा दिल्याबद्दल सर्वसामान्य नागरिकांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. नराधम भीमराव कांबळेला फाशीची शिक्षा मिळावी यासाठी राज्यभर संतापाची लाट निर्माण झाली होती. राज्य सरकारची तत्परता व पुणे ग्रामीण पोलिस तसेच पोलिस विशेष पथकाने गुन्हा घडल्यानंतर अवघ्या दोन महिन्यांत आवश्यक ते पुरावे गोळा करून तत्परता दाखवल्याने खटल्याची सुनावणी पूर्ण होऊन निकाल लागल्याबद्दल खूप अभिनंदन! अत्याचार आणि खून खटल्यातला सर्वांत जलदगतीने निकाल लागलेला हा राज्यातील पहिलाच खटला ठरला आहे. यामुळे अत्याचाराला बळी पडलेल्या चिमुकलीला व पालकांना न्याय मिळाला आहे. असा अत्याचार करणाऱ्या नराधमांना या निकालाने वचक बसणार आहे. विशेष न्यायालयात राज्य सरकारने पक्षपात न करता अत्याचार होणाऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून खटले चालविल्यास अत्याचार करणाऱ्या नराधमांना जन्माची अद्दल घडेल.

**शशिकांत जाधव**/पुणे. ९६५७७५२६६५

* * *

### नाट्यसृष्टीतील दीपस्तंभ विजया मेहता

मराठी रंगभूमीवर ज्यांना आदराने सारे जण 'बाई' म्हणून ओळखत, त्या ज्येष्ठ दिग्दर्शिका विजया मेहता यांच्या निधनाने मराठी नाट्यविश्वावर दुःखाची गडद छाया पसरली आहे. त्यांच्या जाण्याने केवळ एक व्यक्तिमत्त्व हरपले नाही, तर मराठी रंगभूमीचे एक वैभवशाली पर्वच संपुष्टात आले. विजयाबाईंनी केवळ नाटके दिग्दर्शित केली नाहीत, तर मराठी रंगभूमीला नवी दृष्टी, नवे विचार आणि नवे सौंदर्यशास्त्र दिले. नाटक ही केवळ करमणुकीची कला नसून ते समाजाशी संवाद साधणारे प्रभावी माध्यम आहे, हे त्यांनी आपल्या प्रत्येक कलाकृतीतून सिद्ध केले. त्यांच्या दिग्दर्शनात कलात्मकता, वास्तवदर्शन आणि मानवी भावविश्वाचा सूक्ष्म वेध यांचा अप्रतिम संगम दिसून येत असे.

हमिदाबाईची कोठी, वाडा चिरेबंदी, पुरुष, बॅरिस्टर, महासागर, शितू अशा अनेक गाजलेल्या नाटकांना त्यांनी आपल्या दिग्दर्शनाचा सुवर्णस्पर्श दिला. त्यांच्या कल्पक दिग्दर्शनामुळे या नाट्यकृती केवळ यशस्वी ठरल्या नाहीत, तर मराठी रंगभूमीच्या इतिहासात अजरामर झाल्या. अनेक दिग्गज लेखकांच्या साहित्यकृती त्यांनी रंगमंचावर नव्या उंचीवर नेल्या. विजयाबाईंचे आणखी एक मोठे योगदान म्हणजे त्यांनी घडविलेली कलाकारांची पिढी. अनेक नामवंत अभिनेते-अभिनेत्री आणि रंगकर्मी त्यांच्या मार्गदर्शनातून घडले. कलाकाराच्या अभिनयातील सूक्ष्म छटा ओळखून त्याला सर्वोत्तम सादरीकरणासाठी प्रेरित करण्याची विलक्षण क्षमता त्यांच्यात होती. प्रेक्षकांना नाटकाच्या गाभ्यापर्यंत कसे पोहोचवायचे, याचे जिवंत विद्यापीठ म्हणजे विजयाबाई होत्या.

विजयाबाईंची शारीरिक अनुपस्थिती आज जाणवत असली, तरी त्यांनी उभे केलेले नाट्यविश्व, त्यांनी घडविलेले कलाकार आणि त्यांनी रुजविलेली कलादृष्टी हीच त्यांची चिरंतन स्मृती आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून काढणे अशक्य आहे. त्यांच्या कार्याला विनम्र अभिवादन आणि भावपूर्ण श्रद्धांजली.

**विश्वनाथ पंडित**/ठाणे

* * *

### वर्क फ्रॉम होम; सोय आणि गैरसोय

कोरोना काळात घरून काम सुरू होते. सरकारी कामे पण घरून सुरू होती. अजूनही काही कंपन्यामध्ये घरूनच कामे सुरू आहेत. काही ठिकाणी आठवड्यांतून एकदा कामाच्या ठिकाणी जावे लागते. खरेच घरून काम करणे अनेक जणांना खूप सोयीचे झाले आहे. घरात पूर्ण वेळ राहिल्यामुळे घरात लक्ष राहते. लहान मुले, ज्येष्ठ व्यक्ती असल्यास काम करणारा असेल तर लक्ष राहते. कधीकधी काम करणारे ठेवायची गरज भासत नाही. दुसरे असे की कार्यालयात जाण्याचे टेन्शन नाही. वेळेवर लॉगइन केले की काम सुरू होते. इंधन बचतही होते. हे सर्व खरे असले तरी काही ठिकाणी गैरसोयीचे आहे.

मोठे घर असेल तर स्वतंत्र खोली असते. टेबल-खुर्ची असते. घरांतील इतरांना त्रास होत नाही. पण लहान घरात गैरसोयीचे होते. स्वतंत्र खोलीचा वापर करताना घरातील इतरांची गैरसोय होते. ज्येष्ठांना तर खूप त्रासदायक होते. सतत हॉलमध्येच वापर करायचा. आवाज नको. आणखी एक, घराच्या बाहेर कंपनीत चार जणांबरोबर काम करताना खूपच छान वातावरण असते. एकमेकांशी बरेच काही तेव्हाच शेअर केले जाते. तुम्हाला वेळेवर पोहोचायचे तर दिनचर्या चांगली राहते. वर्क फ्रॉम होम सोय-गैरसोय दोन्हीही आहे. ■

**अंजली पळणीटकर**/नागपूर

* * *

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अ‍ॅड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स अ‍ॅप क्रमांकावर पाठवावा.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



जा.क्र/पंपप/न.अ./ ३१६८ /२०२६
पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर
दिनांक- ०२/०७/२०२६

**पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर**
**बांधकाम विभाग**

### वार्षिक ई-निविदा सूचना क्र. १४ /२०२६-२७

पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर आषाढी यात्रा २०२६ कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील योग्य त्या वर्गात नोंदणीकृत असलेल्या व अशा प्रकारच्या कामाचे अनुभव असणारे ठेकेदाराकडून कामांसाठी ई-निविदा मागवित आहेत. ई-निविदा व संच :- Main Portal :- http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ०३/०७/२०२६ ते दि. ०८/०७/२०२६ पर्यंत उपलब्ध आहेत.

सही/-
नगर अभियंता
नगरपरिषद पंढरपूर

शिक्का

सही/-
मुख्याधिकारी
नगरपरिषद पंढरपूर

---

ॲड. विजय अ. हर्डीकर
ॲड. अजय दि. माढेकर
अक्कलकोट

## जाहीर प्रसिद्धीकरण

सिव्हील एम. ए. नं. १२/२०२६

### अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ञ ज्यु.डी. यांचे कोर्टात

**१) रुक्मिणी यशवंत यादव**
रा. शिरवळ, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर -- **अर्जदार**
**२) पांडूरंग यशवंत यादव**
रा. शिरवळ, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**विरुद्ध**
**कोणीही नाही** -- **सामनेवाले**

ज्या अर्थी वरील अर्जदाराने या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज नं. १२/२०२६ हा दि. बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे दाखल केला असून अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ चे वडील यशवंत पांडूरंग यादव यांचे दि. १९/११/२०२५ रोजी शिरवळ, ता. अक्कलकोट येथे त्यांचे राहते घरी निधन झाले आहे. अर्जदारांना शासकीय कामाकरीता अर्जदार हे यशवंत पांडूरंग यादव यांचे वारस असलेले अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र मिळावे याकरीता अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत अथवा यातील अर्जदार हे मयत कै. यशवंत पांडूरंग यादव यांचे वारस असलेबाबत कोणाचे काही म्हणणे अगर हरकत असल्यास त्यांनी हा जाहीर प्रसिद्धीकरण प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दिनांक ०६/०८/२०२६ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे अर्जदारांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल.

हा जाहीर प्रसिद्धीकरण केले. ता. ०२/०७/२०२६
आज रोजी मे. कोर्टाच्या हुकुमाप्रमाणे माझ्या सहीने प्रसिद्ध केले.

शिक्का

**सही**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय**
**अक्कलकोट**

---

## भावाचे भांडण सोडविताना लोखंडी रॉड व हातोडीने मारहाण

**सोलापूर, दि. २ जुलै-**
भावाचे भांडण सोडविताना एका भावाला अज्ञात दोघाजणांनी लोखंडी वाढ व हातोडीने मारहाण करून जखमी केल्याची घटना मुळेगाव रोड सरवदे नगर येथे बुधवारी मध्यरात्री घडली. वसीम मुसा बागवान ( वय २८ वर्ष , रा . सरवदे नगर सोलापूर) असे त्या मारहाण झालेल्या तरुणाचे नाव असून बुधवारी मध्यरात्री साडेअकरा वाजता घराजवळ त्याच्या भावासोबत एकाची तक्रार सुरू होती . तेव्हा तो ती भांडण सोडविण्यासाठी गेला असताना त्याला अज्ञात दोन जणांनी मिळून मारहाण केली . यात डोक्याला जखम व सर्व अंगाला मुका मार लागल्याने त्याला उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात भाऊ तोहीद याने आज गुरुवारी पहाटे दाखल केले .

## प्लॅटफॉर्मवरून रेल्वे रुळावर पडल्याने मंद्रूपचा तरुण गंभीर जखमी

**सोलापूर, दि. २ जुलै-**
प्लॅटफॉर्मवरून तोल जाऊन रेल्वे रुळावर पडल्याने मंद्रूप येथील एक तरुण गंभीर जखमी झाला. शैलेश सिद्धप्पा खांडेकर (वय २४ वर्ष, रा. मंद्रूप) असे जखमी तरुणाचे नाव असून तो १९ जून रोजी सकाळी कामशेत (पुणे) येथील रेल्वे प्लॅटफॉर्मवर थांबला असताना तोल जाऊन खाली रेल्वे रुळावर पडला. त्यात मार लागून गंभीर जखमी झाल्याने त्याला एका खाजगी दवाखान्यात उपचार करून पुढील उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात बहीण संगीता चुंगीवडियार यांनी गुरुवारी सकाळी दाखल केले.

## ट्रक थांबविल्याच्या कारणावरून मारहाण

**सोलापूर, दि. २ जुलै-**
तू ट्रक का थांबवलास असे म्हणून अज्ञात सात ते आठ जणांनी मिळून लाकडाने, दगडाने व लोखंडी पाईपने मारहाण करून तिघा जणांना जखमी केल्याची घटना हैदराबाद महामार्गावरील कत्तल खाण्याच्या समोरील इंडियन ऑइल पेट्रोल पंपाजवळ गुरुवारी सकाळी ११ वाजता घडली.जरीना सलीम पटवेघर (वर ४९ वर्ष ), सलीम बाबूमिया पटवेघर (वय ५४ वर्षे) आणि समीर सलीम पटवेघर (वय २७ वर्ष, सर्व राहणार अंबिकानगर, नई जिंदगी सोलापूर ) अशी जखमी झालेल्या पती-पत्नी व मुलाचे नाव असून आज गुरुवारी सकाळी हैदराबाद रोडवरील कत्तलखान्यासमोर सात ते आठ जणांनी मिळून त्यांना मारहाण केली .यात तिघेजण मार लागून जखमी झाल्याने त्यांना उपचाराकरिता मुलगी सानिया पटवेघर याने दुपारी बारा वाजता येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले .

---

## करिअर मार्गदर्शन व मोफत कॉम्प्युटर कोर्सेस रविवारपासून

**सोलापूर :** डिबो एज्युकेशन, ॲमेझिन लेडीज ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार ५ जुलै रोजी सकाळी १० ते १ वा पर्यंत पुलगम शोरुम पाठीमागे दाजी पेठ येथे करिअर मार्गदर्शन व दहा दिवस कॉम्प्युटर कोर्सेस मोफत घेण्यात येत आहे. संपर्क : माधवी अंधे (मो ८७८८९७०८१४) अथवा विद्या यल्ला (७४९९८३२४७३) यांच्याकडे संपर्क साधावे

---

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**
**सात रस्ता, कारीगर पेट्रोल पंपासमोर, सोलापूर ४१३ ००३**
**ई-निविदा सूचना क्रमांक ०१ सन २०२६-२७ (ऑनलाईन)**
**"बी-१ निविदा"**

**संदर्भः- महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रं.संकीर्ण २०२२/प्र.क्र.१०४/इमा-२/मंत्रालय मुंबई-०३२ दि.१४/०२/२०२५**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर-४१३००३ निविदा पत्रात नमूद केलेले पात्रतेचे निकष पूर्ण करीत व या विभागाकडून नोंदणीकृत कंत्राटदार असलेल्या खालील कामा करिता "बी-१" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहोत. निविदा कागदोपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर ४१३००३ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदेचा प्रकार | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. | ठेकेदाराचा अधिकृत वर्ग |
|---|---|---|---|---|
| १. | प्र.जि.मा.१५३ (कुरनुर ते मोट्याळ) रस्ता कुरनुर धरणाला जोडणारा रस्ता मध्ये सुधारणा करणे. | बी-१ निविदा | ७६,६९,७१५/- | वर्ग ४ (अ) व त्यावरील |

| | | |
|---|---|---|
| निविदा उपलब्ध कालावधी | :- | दि. ०३/०७/२०२६ (वेळ सकाळी १०.०० वा. पासून) ते १०/०७/२०२६ (सायं. १८.१५ पर्यंत) |
| तांत्रिक व आर्थिक निविदा सादर करण्याचा अखेरचा दिनांक. | :- | दि. १०/०७/२०२६ (सायं. १८.१५ पर्यंत) |
| मूळ दस्तऐवज सादर करण्याचा अंतिम दिनांक (निविदा अटी ८.१) | :- | ई-निविदा पोर्टलवर "बीड लॉक" झाल्यानंतर ७२ तासात हार्ड कॉपी १ प्रतीत कंत्राटदारानी खालील कार्यालयामध्ये सादर करणे अनिवार्य आहे. १. मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर |
| निविदा उघडण्याचा कालावधी ठिकाण व वेळ | :- | दि. १३/०७/२०२६ मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांचे कार्यालयात सकाळी ११.०० वाजता. |

१. निविदा सूचनाबाबतची सविस्तर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
२) 1) www.mahapwd.gov.in 2) www.mahatenders.gov.in
(सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर ४१३००३ कार्यालयात सूचना फलक

**सही/-**
**(मनोज जी ठाकरे)**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**

---

## जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १८/२०२६

### अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

**१) सौ. रईसा लाडलेमशाक अत्तार** नि. ७
वय वर्षे-४८ धंदा-घरकाम,
रा. नाविंदगी, ता. अक्कलकोट
**२) एजाज गुलामकादर मणियार** -- **अर्जदार**
वय-५३ वर्ष, धंदा-नोकरी,
रा. घुले नगर, मांजरी बु. पुणे,जि. पुणे
**३) अल्ताफ गुलामकादर मणियार**
वय-५० वर्ष, धंदा-व्यवसाय,
रा. कपनूर, पो. जी. बी. गुंज,
ता. अफजलपूर, जि. कलबुर्गी
**विरुद्ध**
**कोणीही नाही** -- **सामनेवाला**

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी अक्कलकोट येथील दिवाणी कोर्टात मयत अर्जदाराचे वडील गुलाम अ. गफूर मणियार यांचे वारस म्हणून त्यांच्या नावे थकबाकी हे दि. ०१/०१/२०१६ ते मृत्यूपर्यंतची सातवा वेतन आयोगाची हयातकालीन रक्कम रुपये ११,१९२/- सातव्या वेतन आयोगाची थकीत रक्कम पंचायत समिती, अक्कलकोट येथे जमा आहे. वरील रक्कम व त्यावरील होणारे व्याज मयत गुलाम अ. गफूर मणियार यांचे कायदेशीर वारसदार म्हणून या मे. कोर्टाकडे वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे.त्याअर्थी याबाबत कोणाची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत अथवा नेमलेल्या दिनांक २७/०७/२०२६ रोजी अक्कलकोट येथील मे. दिवाणी कोर्टात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहून लेखी हरकत दाखल करावी, अन्यथा मे. कोर्ट कोणाचीही हरकत नाही, म्हणून अर्जदाराच्या मागणीप्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर प्रसिध्दीकरण करणे दिनांक २५/०६/२०२६

**सही/-**
**लिपिक**

शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, अक्कलकोट**

---

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः कासारवाडी व बार्शी, ता बार्शी, जि. सोलापूर येथील आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते कि, मिळकतीचे वर्णन - डि. सोलापूर, सब. डि. व ता. बार्शी पैकी मौजे कासारवाडी येथील शेतजमीन याचा तपशील:- गट नं १९४ याचे एकूण क्षेत्रफळ ०३ हे २० आर आहे याचा आकार १३ रु ०८ पैसे आहे यापैकी बागायत शेतजमीन याचे क्षेत्र ०१ हे ६० आर आहे यापैकी श्री संपत बाबू उर्फ बाबुराव अनभुले (खाते नं. १४२९) यांचे पश्चिम बाजूची बागायत शेतजमीन याचे क्षेत्र ०० हे ४० आर यासी आकार ०१ रु ६४ पैसे आहे. यासी चतुः सीमा पूर्वेस :- सदर गट नंबर पैकी रतन नागनाथ अनभुले यांची शेतजमीन, दक्षिणेस :- ओढा, पश्चिमेस :- सदर गट नंबर पैकी गुंड यांची शेतजमीन, उत्तरेस :- सदर गट नंबर मधील गुंड यांची शेतजमीन. अशी बागायत शेतजमीन.

सदर शेतजमीन श्री संपत बाबू उर्फ बाबुराव अनभुले यांच्या वडीलोपार्जीत मालकीची असून ७/१२ हक्कपत्रकी त्यांच्या नावाची नोंद असून सदर शेतजमीन प्रत्यक्ष कब्जे वाहिवाटीस आहे. सदरची शेतजमीन ते विक्री करू इच्छितात, शेतजमीन विक्री निघाले बाबत आमचे अशिलास समजलेले आमच्या अशिलाने योग्य ती किंमत देऊ केलेने श्री संपत बाबू उर्फ बाबुराव अनभुले (खाते नं. १४२९) यांनी सदरची शेतजमीन विक्री करणेबाबतचा करार आमच्या अशीलाशी केला. त्या व्यवहारापोटी आमच्या अशिलाकडून साक्षीदारासमक्ष इसार रक्कम स्वीकारली आहे, व खरेदीखत करून देण्याचा व्यवहार आमच्या अशीला बरोबर ठरविला आहे.

सदर शेतजमीनीवर कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०८ दिवसाचे आत अशिलातर्फे वकिल यांना खाली दिलेल्या पत्त्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही असे गृहीत धरून शेतजमीन बिनबोजाची, क्लिअर टायटल आहे असे गृहीत धरून सदर शेतजमीन खरेदी करतील. खरेदीनंतर कोणाची कसलेही हरकत आलेस आमचे अशीलाच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये या करिता खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली.
दि. ०२/०७/२०२६.

शिक्का

**सही**
**ॲड. अमरदिप राजीव क्षीरसागर**
**ऑफिस पत्ता :-** गाळा नं. २७, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉम्प्लेक्स सुलाखे हायस्कूल रोड, बार्शी.
रा. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर.
(अशिला तर्फे ॲडव्होकेट)

---

# प्रिसिजन कॅमशाफ्टस् लिमिटेड

PRECISION

सी आय एन : L24231PN1992PLC067126
नोंदणीकृत कार्यालय : डी– ५, एम.आय.डी.सी., चिंचोळी, सोलापूर–४१३ २५५, महाराष्ट्र, भारत
फोन – +९१ ९१६८६४६५३६ / ३७, फॅक्स : ०२१७ – २३५७६४५
ई–मेल : cs@pclindia.in संकेतस्थळ : www.pclindia.in

## सूचना – ३४ वी वार्षिक सर्व साधारण सभा

यानुसार सूचना देण्यात येते की प्रिसिजन कॅमशाफ्टस् लिमिटेड ('दि कंपनी') ची **३४ वी वार्षिक सर्व साधारण सभा (एजीएम) गुरुवार दिनांक ३० जुलै २०२६ रोजी (भारतीय प्रमाण वेळ) दुपारी ३.०० वाजता** व्हीडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) किंवा अन्य दृकश्राव्य (ओएव्हीएम) सुविधेद्वारे कंपनीज ॲक्ट, २०१३ (दि ॲक्ट) मधील तरतुदी आणि त्याअंतर्गत करण्यात आलेल्या सुधारणा आणि आणि सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन आणि डिस्क्लोजर आवश्यकता) २०१५ च्या तरतुदींचे पालन करून आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय आणि सिक्युरिटीज आणि एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया **(SEBI)** द्वारे जारी केलेली विविध परिपत्रके आणि अधिसूचना नियमन (एकत्रितपणे 'MCA/ SEBI परिपत्रक' म्हणून संदर्भित), एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या व्यवसायाचे व्यवहार करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे.

वर नमूद करण्यात आल्याप्रमाणे एमसीए परिपत्रके आणि सेबी परिपत्रकानुसार ३४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि कंपनीचा आर्थिक वर्ष २०२५–२६ साठीचा अहवाल सभसदांना फक्त ईमेलद्वारेच पाठविण्यात येईल ज्यांचा / ज्यांचे ईमेल आयडी कंपनीकडे किंवा रजिस्ट्रार ॲण्ड शेअरट्रान्सफर एजंट (आर ॲण्ड टीएजंट) म्हणजे एमयुएफजी इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड किंवा त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पाटीसिपंट यांच्याकडे नोंदविण्यात आलेला / आलेले आहेत. ही कागदपत्रे कंपनीचे संकेतस्थळ्.लिश्रळपवळर.ळप किंवा ज्या स्टॉक एक्स्चेंजवर कंपनीचे शेअर्स लिस्टेड आहेत त्यांच्या म्हणजे बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड यांच्या अनुक्रमे्.लीशळपवळर.लो आणि्.पीशळपवळर.लो यासंकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

सभासदांना रिमोट ई–मतदानाद्वारे किंवा एजीएमच्यावेळी ईवोटिंगद्वारे मतदान करता येईल. ज्या सभासदांकडे समभाग डिमटेरिअलाईज्ड मोड, फिजिकल मोड आणि ज्यांनी आपले ईमेल आयडी नोंदविलेले नाहीत अशा सभासदांकडे समभाग आहेत त्यांना रिमोट ई–मतदान एजीएमच्यावेळी ई–मतदान करण्याबाबतच्या सूचना आणि व्हीसी / ओ एव्हीएमद्वारा एजीएमला उपस्थित राहण्याच्या सूचना एजीएमच्या सूचनेद्वारा उपलब्ध करून देण्यात येतील.

वर नमूद केल्या नुसार सभासदांना विनंती करण्यात येते की त्यांनी वरील प्रमाणे सूचना त्यांना प्राप्त व्हावी या दृष्टीने तसेच वार्षिक अहवाल आणि ईमतदानासाठी लॉग इन आयडी आणि पासवर्ड प्राप्त व्हावा यादृष्टीने त्याचा / त्यांचे ईमेल आयडी किंवा त्यात काही बदल असल्यास नोंदणी कृत करावेत.

| | |
|---|---|
| फॉर शेअर्स हेल्डइन फिजिकल फॉर्म | **https://web.in.mpms.mufg.com/EmailReg/EmailšRegister.html** लिंकला भेट द्या – कंपनीचे नांव सिलेक्ट करा – प्रिसिजन कॅमशाफ्टस् लिमिटेड आणि त्यात केलेल्या मार्गदर्शनानुसार प्रक्रियेची पूर्तता करा.<br>https://web.in.mpms.mufg.com/EmailReg/EmailšRegister.html लिंकला भेट द्या – कंपनीचे नांव सिलेक्ट करा – प्रिसिजन कॅमशाफ्टस् लिमिटेड आणि त्यात केलेल्या मार्गदर्शनानुसार प्रक्रियेची पूर्तता करा. सभासदांना विनंती करण्यात येते की त्यांना त्यांचा तपशिल जसेकी नाव, फोलिओ नंबर, शेअर प्रमाणपत्र, पॅन, मोबाईल नंबर आणि ईमेलआयडी ही माहिती द्यावी आणि त्याचप्रमाणे त्यांचे शेअर सर्टिफिकेट / आधार / वैध पासपोर्ट हे सर्व पीडीएफ फॉर्ममध्ये किंवा जेपीईजी फॉर्ममध्ये (१ एमबी पर्यंत) आवश्यक असलेल्या कागदपत्रासह अपलोड करावी. कोणत्याही प्रकारची शंका असल्या सदस्यांनी ठढ– एजंट यांच्याकडे फोन नं. ९१ (०२०) ४६०१४४७३/ २६१६१६२९ वर किंवा punein.mpms.mufg.com या मेल वर संपर्क साधावा. सर्व तपशिल दाखल केल्यानंतर सभासदांना वनटाईम पासवर्ड (ओटीपी) मिळेल जो पडताळणी करीता लिंकमध्ये दाखल करावा लागेल. |
| फॉर शेअर्स हेल्डइन डिमॅट फॉर्म | ईमेल आयडी नोंदविणे / अद्ययावत करणे यासाठी आपल्या डिपॉझिटरी पार्टीसिपंटस् (डीपी) यांच्याशी संपर्क साधावा. |

ज्या सभासदांनी (फॉर शेअर्स हेल्ड इन फिजिकल फॉर्म) लाभांश त्यांच्या बँकखात्यात इलेक्ट्रॉनिक पध्दतीने प्राप्त करण्यासाठी त्यांच्या बँकखात्याचा तपशिल अद्यायवत केला नसल्यास त्यांना आवश्यक ती कागदपत्रे वरील लिंकमार्फत अपलोड करून तो अद्ययावत करता येईल. सभासदांनी (फॉर शेअर्स हेल्ड इन डिमॅट फॉर्म) त्यांच्या बँक खात्याचा तपशिल अद्ययावत करण्यासाठी आपल्या डीपी / डीपीज् यांच्याशी संपर्क साधावा.

सेबी परिपत्रक क्र. सेबी / एचओ / एमआयआरएसडी / एमआयआरएसरओआरटीएएमबी / पी / सीआयआर / २०२१/६५५ दिनांक ३ नोव्हेंबर २०२१ आणि सेबी / एचओ / एमआयआरएसडी / एमआयआरडीआरडीएएमबी /पी/सीआयआर/२०२१/६८७ दिनांक १४ डिसेंबर २०२१ नुसार सर्व सूचीबध्द कंपन्यांना सर्व भागधारकांचे पॅन, नामांकन केवायसी तपशिल आणि पहिल्या धारकांचे बँक खाते तपशिल या सर्वांची नोंद ठेवणे अनिवार्य आहे.

तरी आपल्याला विनंती आहे की वर नमूदकेल्याप्रमाणे आपले गुंतवणूकदार सेवा विनंती फॉर्म पूर्ण पणे भरून आवश्यक सहाय्यक कागदपत्रासह लवकरात लवकर आमच्याकडे सुपूर्त करावीत. नामांकन आणि केवायसी तपशिल अद्ययावत ठेवण्यासाठी लागणारे सर्व फॉर्म्स जसे की ISR-1, ISR-2, ISR-3, ISR-4, SH-13, SH-14 हे सर्व RTA च्या https://in.mpms.mufg.com/ संकेतस्थळावरून डाउनलोड करावीत. तसेच कंपनीच्या संकेत स्थळावर जाऊन www.pclindia.in या ठिकाणी देखील ती उपलब्ध आहेत.

**स्थळ : पुणे**
**दिनांक : ०२ जूलै २०२६**

**प्रिसिजन कॅमशाफ्टस् लिमिटेड** करीता
सही/–
**हर्षल ज. खेर**
कंपनी सचिव

---

# अ.भा. मुस्लीम मराठी साहित्य परिषदेचा साहित्य सोहळा रविवारी




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जुलै-**
अखिल भारतीय मुस्लीम मराठी साहित्य परिषद,सोलापूरच्या वतीने ''पुस्तकांवर बोलू काही''या उपक्रमा अंतर्गत तीन पुस्तकांचे चिकित्सक विवेचन व राज्य स्तरीय कवी संमेलन रविवार, ५ जुलै सकाळी ११ ते सायंकाळी ४ पर्यंत किडवाई चौक येथील सोशल महाविद्यालय येथे आयोजित केले आहे.

प्रा. डॉ. इ. जा. तांबोळी लिखित कादंबरी 'श्यामचा बाप' कवी मुबारक शेख लिखित काव्यसंग्रह 'अज़ान आणि चालिसा' आणि प्रा. डॉ. शकील शेख लिखित कादंबरी 'ज़ुबा' या वर प्रा डॉ. सुरैरया परवीन जहागीरदार, कवि खाजा भाई बशीर बागाबान व प्रा. बी. एच. करजगीकर हे विवेचन करतील.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. दस्तगीर जमादार हे असतील. दुपारच्या दुसऱ्या सत्रात प्रा. अनिसा सिकंदर शेख यांच्या काव्य संग्रह 'काव्य सप्तक'चे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते संपन्न होईल. त्यानंतर राज्यस्तरीय काव्य संमेलन कवियत्रि अनिसा शेख यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून यात राज्यातले ४० कवी, कवियत्रीचा सहभागी होणार आहे. मराठी भाषा, साहित्य आणि वाचन संस्कृतीच्या संवर्धनासाठी आयोजित या आगळ्यावेगळ्या साहित्य सोहळ्यास आपण उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन अध्यक्ष प्रा डॉ. अजीज नदाफ, सचिव अय्यूब अहमद नल्लामंदू यांनी केले आहे.

---

### मा. ॲड. अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बार्शी, ता. बार्शी जि. सोलापूर यांचे समोर लवाद न्यायाधिकरण कार्यालय

श्री. भगवंत मल्टिस्टेट क्रेडिट को. ऑप. सोसायटी लि. बार्शी, के. टी. ट्रॅक्टर्स शोरूम, (कुबाटा), दुसरा मजला, लातुर रोड, बार्शी ता बार्शी जि. सोलापूर
**(मल्टीस्टेट को ऑप. सोसायटीज ॲक्ट २००२ आणि अब्रिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)**

## जाहीर नोटीस/समन्स

**अर्जदार : श्री भगवंत मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर**
**विरूद्ध : गैरअर्जदार**

१. लवाद अर्ज क्र. २३/२०२६ १) आदेश भारत शिंदे २) भारत शेकु शिंदे दोघे रा. लक्ष्मी नगर, साई होंडा शोरूम जवळ, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर ३) अमोल सुधाकर डिसले रा. सिद्धेश्वर नगर, कासारवाडी रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर ४) अभयराज दिलीप ओव्हळ रा. ३८८, सिद्धार्थ नगर, सुलाखे हायस्कूल जवळ, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर
२. लवाद अर्ज क्र. २४/२०२६ १) नागनाथ भास्कर डमरे २) प्रविण नागनाथ डमरे ३) सुधाकर भास्कर डमरे ४) राजेंद्र भिमराव नाईक रा. आगळगाव ता. बार्शी जि. सोलापूर ५) महादेव विठ्ठल शिनगारे रा. घारी ता. बार्शी जि. सोलापूर
३. अर्ज क्र. २६/२०२६ १) सुहास बापुराव कांदे २) अनंत लिंबराज बाराते ३) संजय सोपान डोंगरे सर्व रा. सापनाई ता. कळंब जि. धाराशिव
४. अर्ज क्र. २९/२०२६ १) हरिश्चंद्र नारायण जगदाळे २) दत्तात्रय नवनाथ जगदाळे ३) सुधीर माणिक जगदाळे रा. चारे ता. बार्शी जि. सोलापूर
५. अर्ज क्र. ३०/२०२६ १) निलेश चंद्रकांत माळी २) शेख पैगंबर शहानुर ३) सहदेव महादेव शिंदे सर्व रा. नारी ता. बार्शी जि. सोलापूर
६. अर्ज क्र. ३४/२०२६ १) अक्षय तानाजी नाईकनवरे २) धिरज शिवाजी राजगुरु दोघे रा. आगळगाव ता. बार्शी जि. सोलापूर
७. अर्ज क्र. ३६/२०२६ १) अप्पासाहेब विनायक चौधरी रा. शिराळा ता. बार्शी जि. सोलापूर २) सचिन किसन ननवरे रा. कुसळंब ता. बार्शी जि. सोलापूर ३) हनुमान विठ्ठल झिंगे रा. तांदळवाडी ता. बार्शी जि. सोलापूर
८. क्र. ३८/२०२६ १) संतोष अनंत महामुनी २) विनायक ज्ञानोबा बोंदर ३) शुभम भारत घोडके रा. रत्नापूर पो. येरमाळा ता. कळंब जि. धाराशिव
९. क्र. ४०/२०२६ १) बालाजी उत्तेश्वर पाटोळे रा. कुसळंब ता. बार्शी जि. सोलापूर २) दिपक सुमंत गोरे रा. धानोरे ता. बार्शी जि. सोलापूर ३) प्रविण भाऊसाहेब दिडवळ रा. पुरी ता. बार्शी जि. सोलापूर
१०. क्र. ४१/२०२६ १) डोंगरे सागर संजय २) डोंगरे संजय सोपान ३) अगरचंद पोपट डोंगरे ४) अनंता लिंबराज बाराते सर्व रा. सापनाई ता. कळंब जि. धाराशिव
११. क्र. ४३/२०२६ १) गणेश हनुमंत अंधारे २) नितीन भास्कर गाढवे दोघे रा. काटेगाव ता. बार्शी जि. सोलापूर ३) नागनाथ रामा कांदे रा. बोरगाव ता. बार्शी जि. सोलापूर
१२. क्र. ४५/२०२६ १) बालाजी बाळासाहेब चौधरी २) सुरेश मारुती चौधरी ३) दत्ता महादेव वाघमारे सर्व रा. शिराळा ता. बार्शी जि. सोलापूर
१३. क्र. ४६/२०२६ १) रोहन महादेव पाटील २) सोमनाथ रामचंद्र पाटील ३) धनाजी सुभाष गोरे (मयत) वारस - माधवी धनाजी गोरे सर्व रा. धोतरे ता. बार्शी जि. सोलापूर
१४. क्र. ५१/२०२६ १) संतोष लक्ष्मण शिंदे २) लक्ष्मण विनायक शिंदे ३) विकास शहाजी पाटील सर्व रा. चिंचोली ता. बार्शी जि. सोलापूर
१५. ५३/२०२६ १) रेखा संतोष महामुनी २) नागनाथ भुजंग अवधूत ३) विनायक ज्ञानोबा बोंदर रा. रत्नापूर पो. येरमाळा ता. कळंब जि. धाराशिव
१६. क्र. ५७/२०२६ १) रवि मोहन पौळ २) पंढरीनाथ धर्मराज ढगारे ३) बालाजी मुरलीधर पौळ सर्व रा. सापनाई ता. कळंब जि. धाराशिव
१७. क्र. ६८/२०२६ १) महादेव भानुदास तोगे २) मोहन दास घोळवे ३) कल्यान बाबु तोगे सर्व रा. घोळवेवाडी ता. बार्शी जि. सोलापूर
१८. क्र. ७०/२०२६ १) ज्ञानेश्वर श्रीमंत गुरव २) योगेश हरि बेदरे ३) कैलास गोकुळ बेदरे सर्व रा. येरमाळा ता. कळंब जि. धाराशिव
१९. क्र. ७१/२०२६ १) सुरज प्रशांत जगदाळे २) रणजीत अंगद पाटील ३) आबासाहेब तानाजी कवडे सर्व रा. चारे ता. बार्शी जि. सोलापूर
२०. क्र. ७२/२०२६ १) ओंकार दिगंबर भंडारे २) बळीराम देवीदास भंडारे ३) सौदागर ज्ञानदेव जगदाळे तिघे रा. घारी ता. बार्शी जि. सोलापूर ४) शेख जहांगीर बशिर रा. कडकनाथवाडी ता. बार्शी जि. सोलापूर
२१. क्र. ७३/२०२६ १) दिगंबर भिकाजी वाघमारे २) महावीर विश्वनाथ वाघमारे दोघे रा. रत्नापूर पो. येरमाळा ता. कळंब जि. धाराशिव ३) दत्तात्रय कल्याणराव शिंदे रा. तेरखेडा ता. वाशी जि. धाराशिव
२२. क्र. ७४/२०२६ १) अभिमान अण्णा रिकीबे २) विशाल नागेश आखाडे ३) महेश लक्ष्मण कदम सर्व रा. लोकमान्य चाळ, जामगाव रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर
२३. क्र. ७५/२०२६ १) कल्यान रावसाहेब बगाडे २) शशिकांत कल्यान बगाडे दोघे रा. नेटके प्लॉट, ज्ञानेश्वर मठ, अलिपुर रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर ३) गणेश अभिमन्यु कसबे, (मयत) वारस - १. शुभम गणेश कसबे, वय - सज्ञान, धंदा - व्यापार रा. जय शंकर मिल समोर, लहुजी नगर, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर २. प्रदिप गणेश कसबे, वय - सज्ञान, धंदा - नोकरी रा. जय शंकर मिल समोर, नगर सेवक अमोल चव्हाण यांच्या घराच्या शेजारी, लहुजी नगर, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर ४) संदिप संजय अवघडे रा. वाणी प्लॉट, कॅन्सर हॉस्पिटल जवळ, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर
२४. क्र. ७६/२०२६ १) दिनेश कैलास धस २) कैलास भिकाजी धस, (मयत - वगळले) वारस - गैरअर्जदार क्र. १. दिनेश कैलास धस ३) राहुल भाऊसाहेब धस रा. पिंपळगाव (धस) ता. बार्शी जि. सोलापूर ४) निलेश जनार्धन काटे रा. देवगाव ता. बार्शी जि. सोलापूर
२५. क्र. ७७/२०२६ १) गंगाप्पा मारूती भोसले २) सागर गंगाप्पा भोसले ३) अजय गंगाप्पा भोसले ४) छाया गंगाप्पा भोसले ५) विठ्ठल मारुती भोसले ६) सचिन तुळशीदास गंगाधर ७) विशाल रामचंद्र टोणगे सर्व रा. कोरेफळे ता. बार्शी जि. सोलापूर
२६. क्र. ७८/२०२६ १) प्रताप भुजाबा लोखंडे २) नंदा प्रताप लोखंडे रा. कपूरवा प्लॉट, शिवशक्ती मैदान, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर ३) सुरज मोहन वाघमारे रा. झाडबुके मैदान, सुभाष नगर, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर ४) विशाल सुनील भडकवाड रा. ११०७ बारांगुळे प्लॉट, गाडेगाव रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर ५) नाना खंडू कांबळे (मयत - वगळले) वारसदार - १. उषा नाना कांबळे, २. अनिल नाना कांबळे रा. झाडबुके मैदान, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर ६) रोहिणी शहाजी खोसे रा. अध्यापक कॉलनी, स्वागत नगर, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर दुसरा पत्ता : शिशु संस्कार केंद्र, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर
२७. क्र. ९१/२०२६ १) उत्तरेश्वर प्रल्हाद पायघन रा. मांडेगाव, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर २) दत्तात्रय सुबराव गुंजाळ रा. इनाम वस्ती, वांगी (बु) ता. जि. धाराशिव ३) काकासाहेब छत्रभुज पवार रा. घाटपिंपरी ता. भुम जि. धाराशिव
२८. क्र. ९२/२०२६ १) भाऊराव नानासाहेब कऱ्हाडे २) राधाबाई नाना कऱ्हाडे दोघे रा. गव्हाणवाडी, (हिंगणी दुमाळा) ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर ३) मुरलीधर भगवान चव्हाण रा. ३८९१, भाग्यकांता, बालाजी कॉलनी, सोलापूर रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर ४) विजय भाऊसाहेब शिखरे रा. कैकाडी चाळ, सोलापूर रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर
२९. क्र. ९३/२०२६ १) विष्णू वसंत क्षिरसागर रा. खांडवी ता. बार्शी जि. सोलापूर २) शशिकांत वामन धोत्रे रा. शिरापूर ता. मोहोळ जि. सोलापूर ३) विजय भाऊसाहेब शिखरे रा. बालाजी कॉलनी, सोलापूर रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर ४) भरत वामन धोत्रे रा. शिरापूर ता. मोहोळ जि. सोलापूर
३०. क्र. ९६/२०२६ १) लहु नागनाथ मासाळ २) युवराज रामचंद्र खाडे दोघे रा. जनार्धन नगर, शिक्षक कॉलनी, परांडा रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर ३) बाळासाहेब देवीदास भंडारे रा. ८४२, उपळाई रोड, पवार प्लॉट, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर
३१. क्र. ९८/२०२६ १) सुहास विलास आदमाने रा. शिरापूर, ता. मोहोळ जि. सोलापूर २) अभिजीत भिमराव चोबे रा. कपूरवा प्लॉट, शिवशक्ती मैदान, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर ३) अमित राजु कांबळे रा. बुद्ध विहार समोर, २४, सिद्धार्थ नगर, उत्तर सदर बाजार, सोलापूर ता. जि. सोलापूर
३२. क्र. ९९/२०२६ १) राजेश दत्तात्रय पवार रा. १२०/२, सावळे गल्ली, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर २) सतिष सोपान पवार रा. सौंदरे ता. बार्शी जि. सोलापूर ३) विशाल अविनाश ठोंबरे रा. कासारवाडी रोड, मुळे पिठाच्या गिरणीच्या पाठीमागे, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर दुसरा पत्ता : गाळा नं. ४६, ४७, डॉ. बाबासाहेब आंबेडकर शॉपींग सेंटर, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर
३३. क्र. १००/२०२६ १) पृथ्वीराज बापु जाधव २) स्वप्निल प्रकाश अंधारे दोघे रा. धर्माधिकारी प्लॉट, गाडेगाव रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर ३) दिनेश कमलाकर अंधारे रा. अलिपूर रोड, अहिल्याबाई व्होळकर बागे जवळ, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर
३४. क्र. १०२/२०२६ १) सावनकुमार तानाजी मंडलिक २) तानाजी मार्तंड मंडलिक दोघे रा. कासारवाडी, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर ३) श्रीधर उत्तम शिंदे रा. ढोराळे ता. बार्शी जि. सोलापूर ४) राजीव लक्ष्मण खांबसवाडकर रा. गुळपोळी ता. बार्शी जि. सोलापूर
३५. क्र. १०३/२०२६ १) सुदर्शन प्रभाकर वेदपाठक रा. १५९३/१अ/१, सनगर गल्ली, सोन्या मारूती चौक, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर २) आरीफ इलाही सय्यद रा. गट नं. १५६१, सनगर गल्ली, सोन्या मारूती चौक, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर ३) सौरभ प्रफुल शिंदे रा. सोन्या मारुती चौक, मनगिरे व्यायाम शाळा समोर, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर
३६. क्र. १०७/२०२६ १) सागर सुधाकर गुंड २) अनंत उत्तरेश्वर पाटील दोघे रा. लाडोळे ता. बार्शी जि. सोलापूर ३) विशाल दगडु आवारे रा. सासुरे ता. बार्शी जि. सोलापूर
३७. १०८/२०२६ १) श्रीकांत पंडित जगदाळे २) संतोष शिवाजी माने ३) दत्तात्रय चंद्रहार गोसावी सर्व रा. कौठाळी ता. उ. सोलापूर जि. सोलापूर
३८. क्र. ११०/२०२६ १) गोरोबा नामदेव कदम रा. निंबाळकर गल्ली, वैराग ता. बार्शी जि. सोलापूर २) सैफन गालीफ शेख रा. इंदिरानगर, वैराग ता. बार्शी जि. सोलापूर ३) अमजदअली महमूदअली सय्यद रा. गाडेगाव रोड, अंबिका हाउसिंग सोसायटी, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर ४) रामेश्वर चंद्रकांत खांडेकर रा. बंगले गल्ली, वैराग ता. बार्शी जि. सोलापूर
३९. क्र. १११/२०२६ १) वंदना गणेश वडतिले २) गणेश दिलीप वडतिले दोघे रा. इंदिरानगर, वैराग ता. बार्शी जि. सोलापूर ३) बिरमल शिवाजी काळे रा. बंगले गल्ली, वैराग ता. बार्शी जि. सोलापूर ४) अविनाश चंद्रकांत पौळ रा. खेडाड गल्ली, वैराग ता. बार्शी जि. सोलापूर
४०. क्र. ११२/२०२६ १) सुरज सुनील सवार रा. गणेशरीप्लॉट, वैराग ता. बार्शी जि. सोलापूर २) अभिजित खंडू जाधव रा. कौठाळी ता. उ. सोलापूर जि. सोलापूर ३) संतोष बालाजी रामपुरे रा. ९२/९३, दक्षिण कसबा, सोलापूर ता. उ. सोलापूर जि. सोलापूर
४१. क्र. ११३/२०२६ १) विशाल सुनील तपासे २) सुवर्णा सुनील तपासे ३) वैभव शशिकांत पोतदार तिघे रा. गणेशरीप्लॉट, वैराग ता. बार्शी जि. सोलापूर ४) संतोष ज्ञानदेव राजगुरू रा. अंबिकानगर, वैराग ता. बार्शी जि. सोलापूर
४२. क्र. ११४/२०२६ १) संतोष बालाजी रामपुरे रा. ९२/९३, दक्षिण कसबा, सोलापूर ता. उ. सोलापूर जि. सोलापूर २) गणेश सुनील धोकटे रा. इंदिरानगर, वैराग ता. बार्शी जि. सोलापूर ३) सुरज सुनील सवार रा. गणेशरी प्लॉट, वैराग ता. बार्शी जि. सोलापूर
४३. क्र. ११५/२०२६ १) नसरीन काशीम मुजावर २) काशीम रज्जाक मुजावर दोघे रा. सावंत गल्ली, वैराग ता. बार्शी जि.सोलापूर ३) महादेव शिवाजी डिसले रा. जळगाव नं. २ (जोतीबाची वाडी) ता. बार्शी जि. सोलापूर ४) शैला शिवाजी मोरे रा. संजयनगर, वैराग ता. बार्शी जि. सोलापूर
४४. क्र. ११६/२०२६ १) वासिम गालीफ शेख रा. इंदिरानगर, वैराग ता. बार्शी जि. सोलापूर २) रविकिरण राजकुमार क्षीरसागर रा. घोंगडे प्लॉट, वैराग ता. बार्शी जि. सोलापूर
४५. क्र. ११८/२०२६ १) पद्मावती विश्वासराव निंबाळकर रा. शाहूनगर, माढा रोड, वैराग ता. बार्शी जि. सोलापूर २) तात्यासाहेब वैजीनाथ कापसे ३) प्रशांत मारुती धावणे दोघे रा. तुळशीदासनगर, माढा रोड, वैराग ता. बार्शी जि. सोलापूर

(प्रत्येक प्रकरणात वर नमुद क्र. १ हे कर्जदार तर अन्य जामीनदार आहेत.)

सदर नोटीसव्दारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूद्ध वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावणी नोटीस आपणापैकी काहींनी घेवून गैरहजर राहिलात, काहींनी नोटीस घेण्यास नकार दिला तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत. तसेच काहींच्या नोटीसा तामिल होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशी कामी आपण दि. २१/०७/२०२६ रोजी सकाळी ११ वा. तुम्ही अथवा तुमच्या वकिलांमार्फत लवाद न्यायाधिकरण कार्यालयास न चुकता हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास, या बाबतीत तुमचे काहींही म्हणणे नाही, असे समजून तुमच्या विरूद्ध लवाद अर्जाचा एकतर्फी हुकुम / आदेश करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. सबब, ही नोटीस माझी सही व शिक्यानिशी दिली आहे.

**सही/-**
**ॲड. अजित एम. देशमुख**
**लवाद अधिकारी, बार्शी**



# हॅरी केनने दिग्गज पेलेला मागे टाकले

**अटलांटा, २ जुलै**

अनुभवी कर्णधार हॅरी केनने आपल्या लौकीकास साजेशी कामगिरी करत इंग्लंडला पिछाडीवरून जोरदार मुसंडी मारून देत डीआर काँगोवर २-१ असा विजय मिळवून दिला आणि आपल्या संघाची सह-यजमान मेक्सिकोविरुद्धच्या विश्वचषकातील अंतिम-१६ फेरीतील लढत निश्चित केली.



डीआर काँगोने थॉमस टुचेल यांच्या संघाला जोरदार धक्का दिला होता; आपल्या इतिहासातील पहिल्या विश्वचषक नॉकआउट सामन्यात ब्रायन सिपेंगाच्या गोलमुळे त्यांनी आघाडी घेतली होती, परंतु हॅरी केनने संघाला सावरले. या दोन गोलांमुळे विश्वचषकातील एकूण गोलांची संख्या १३ वर नेत केनने ब्राझिलियन दिग्गज पेले यांची फिफा विश्वचषकातील गोलची संख्या ओलांडली.

हॅरी केनच्या नावावर नवनवीन विक्रम नोंदवले जात असून या महत्त्वपूर्ण सामन्यातील दोन गोलमुळे फिफा विश्वचषक आणि युरो चॅम्पियनशिप अशा दोन्ही स्पर्धा मिळून २० किंवा त्यापेक्षा जास्त गोल करणारा तो केवळ दुसरा खेळाडू ठरला आहे. हॅरीचे फिफा विश्वचषक आणि युरो स्पर्धेतील एकूण गोल २० झाले आहेत; यात विश्वचषकातील १३ आणि युरो चॅम्पियनशिपमधील ७ गोलांचा समावेश आहे. केवळ पोर्तुगालचा दिग्गज खेळाडू ख्रिस्तियानो रोनाल्डो (फिफा विश्वचषकात १० आणि युरो स्पर्धेत १४ गोल) याने २४ गोलांसह यापेक्षा चांगली कामगिरी केली आहे.

हॅरी केनच्या कामगिरीमुळे उप-उपांत्यपूर्व फेरीत इंग्लंडची गाठ मेक्सिकोशी पडणे निश्चित झाले आहे; हा सामना सोमवारी पहाटे १ वाजता अ‍ॅझ्टेका स्टेडियमवर खेळविला जाईल.

सामना संपायला १५ मिनिटे शिल्लक असताना बदली खेळाडू अँथनी गॉर्डनच्या क्रॉसवर हेडरद्वारे गोल करून केनने इंग्लंडला बरोबरी साधून दिली. त्यानंतर, ८६ व्या मिनिटाला त्याने एक जबरदस्त गोल करत संघाला विजय मिळवून दिला. ◂ (वृत्तसंस्था)

# बेल्जियमचे अविस्मरणीय पुनरागमन

**सिएटल, २ जुलै**

सिएटल स्टेडियम येथे झालेल्या फिफा फुटबॉल विश्वचषकाच्या 'अंतिम-३२' फेरीच्या सामन्यात, बेल्जियमने सेनेगलविरुद्ध २-० अशी पिछाडी भरून काढत ३-२ असा विजय मिळविला आणि एका अविश्वसनीय पुनरागमनाची नोंद केली. हा विजय त्यांनी अतिरिक्त वेळेच्याही समाप्तीनंतरच्या अतिरिक्त मिनिटांत (स्टॉपेज टाइममध्ये) मिळालेल्या पेनॉल्टीवर गोल करून साकारला. अतिरिक्त वेळेचा ३० मिनिटांचा खेळ संपण्यापूर्वीच युरी टिलेमन्सला 'फाऊल'चा सामना करावा लागला आणि 'व्हिडिओ रिव्ह्यू'नंतर पंचांनी पेनॉल्टी दिली. त्याने १२५ व्या मिनिटाला ही पेनॉल्टी गोलमध्ये रूपांतरित केली; विश्वचषकाच्या इतिहासातील हा सर्वात उशिरा झालेला गोल ठरला. त्यानंतर काहीच वेळात पंचांनी अंतिम शिट्टी वाजविली आणि बेल्जियमने 'अंतिम-१६' मधील आपले स्थान निश्चित केले. त्या निर्णयाचा अर्थ लावायचा नाही. मी यावर भाष्य करणार नाही किंवा पंचांच्या निर्णयाचा अर्थही लावणार नाही. पेनॉल्टी देण्याबाबत प्रत्येकाचा दृष्टिकोन वेगळा असू शकतो, असे सेनेगलचे प्रशिक्षक पापे थियाव म्हणाले. ◂ (वृत्तसंस्था)



**अतिरिक्त वेळेत गोल नोंदविल्यानंतर आनंद साजरा करताना युली टिन्लेमन्स**

## ऑस्ट्रेलियन चाहत्यांचा उत्साह वाढला



**डॅलस, २ जुलै**

फिफा विश्वचषक २०२६ च्या 'अंतिम-३२' फेरी मधील महत्त्वपूर्ण सामन्यात इजिप्तविरुद्ध खेळताना, आपला पहिलाच 'नॉकआउट' सामना जिंकून इतिहास घडवण्याचा ऑस्ट्रेलियाचा प्रयत्न असेल. आपल्या खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी ऑस्ट्रेलियाचे फुटबॉलप्रेमी डॅलसमध्ये दाखल झाले आहेत. इजिप्तचा सामना अशा ऑस्ट्रेलियन संघाशी होणार आहे. ◂ (वृत्तसंस्था)

## आजचे सामने

**स्वित्झर्लंड वि. अल्जेरिया**
**वेळ :** गुरुवारी सकाळी ८.३० वाजतापासून
**स्थळ :** बीसी प्लेस व्हँक्युवर

**ऑस्ट्रेलिया वि. इजिप्त**
**वेळ :** शुक्रवारी रात्री ११.३० वाजतापासून
**स्थळ :** एटी अ‍ॅन्ड टी स्टेडियम, डॅलस

**अर्जेंटिना वि. केप वर्दे**
**वेळ :** पहाटे ३.३० वाजतापासून
**स्थळ :** हार्ड रॉक स्टेडियम, मियामी

**कोलंबिया वि. घाना**
**वेळ :** शनिवारी सकाळी ७.०० वाजतापासून
**स्थळ :**ॲरोहेड स्टेडियम, कॅन्सस सिटी

**थेट प्रसारण :** युनाईट८ (झी५) वर

## बालोगुन नकोशा विक्रमात



**सॅन फ्रान्सिस्को, २ जुलै**

फिफा विश्वचषक बाद फेरीत गोल करणारा आणि 'रेड कार्ड' मिळवणारा अमेरिकेचा बालोगन चौथा खेळाडू ठरला. अंतिम-३२ फेरीच्या सामन्यात अमेरिकेने बोस्निया अँड हर्झेगोव्हिनाचा २-० असा पराभव केला. या सामन्या आक्रमक खेळाडू फोलारिन बालोगुनसाठी संमिश्र अनुभव ठरला. बालोगनने स्पर्धेतील आपला तिसरा गोल नोंदविला, परंतु नंतर त्याला लाल कार्ड दाखवून मैदानाबाहेर पाठवण्यात आले. फिफा विश्वचषकाच्या बाद फेरीतील सामन्यात गोल करणे आणि त्याच वेळी रेड कार्ड मिळवणे, अशी कामगिरी करणारा तो केवळ चौथा खेळाडू ठरला आहे.

बालोगुनने आपली प्रभावी कामगिरी कायम राखत गोलची संख्या तीनवर नेली. एकाच विश्वचषक स्पर्धेत तीन किंवा त्यापेक्षा जास्त गोल करणाऱ्या अमेरिकेच्या खेळाडूंच्या यादीत आता तो बर्ट पॅटेनॉड व लँडन डोनोव्हन यांच्या पंक्तीत सामील झाला आहे. मात्र, बालोगुनचे नाव एका नकोशा यादीतही समाविष्ट झाले आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# सह-यजमान अमेरिका उप-उपांत्यपूर्व फेरीत

### बोस्निया अँड हर्जेगोव्हिनावर २-० ने मातबाद फेरीतील २४ वर्षांचा दुष्काळ संपविला

**सॅन फ्रान्सिस्को, २ जुलै**

फिफा फुटबॉल विश्वचषकाच्या अंतिम-३२ फेरीच्या सामन्यात अमेरिकेने बोस्निया अँड हर्जेगोव्हिनाचा २-० ने पराभव करून विश्वचषकाच्या अंतिम-१६ च्या फेरीत धडक मारली.

फोलारीन बालोगुनने ४५ व्या मिनिटाला, तर मलिक टिलमनने ८२ व्या मिनिटाला गोल नोंदवून अमेरिकेचा विजय निश्चित केला. या सामन्यात गोल करणाऱ्या फोलारिन बालोगुनला मात्र मैदानाबाहेर (लाल कार्ड) जावे लागले.

सह-यजमान असलेल्या अमेरिकेचा विश्वचषकातील बाद फेरीतील हा २४ वर्षांतील पहिला आणि इतिहासातील केवळ दुसराच विजय ठरला. आता सोमवारी सिएटल येथे त्यांचा सामना बेल्जियमशी होणार आहे. मध्यंतराच्या अगदी आधी बालोगुनने केलेल्या गोलमुळे कॅलिफोर्नियातील प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्साह संचारला होता. मात्र, बोस्नियाच्या तारिक मुहरमोविचसोबत झालेल्या जोरदार धडकेनंतर 'व्हीएआर' च्या हस्तक्षेपामुळे या स्ट्रायकरला 'रेड कार्ड' मिळाले आणि मैदानाबाहेर जावे लागले. तरीही, एका खेळाडूची कमतरता असतानाही अमेरिकेने आपला बचाव भक्कम राखला आणि मलिक टिलमनने एका अप्रतिम 'फ्री-किक'द्वारे संघाचा विजय निश्चित केला. बालोगुनने सामन्याची चांगली सुरुवात केली, पण त्याला दुर्दैवी 'रेड कार्ड' मिळाले

अमर डेडिकने केलेल्या ढोबळ टॅकलमुळे बालोगुनने पेनॉल्टीची मागणी केली होती, पण ती पंचांनी फेटाळून लावली. वेस्टन मॅकेनीच्या चपळ पासनंतर ती स्थिती 'ऑफसाइड' असल्याचे नंतर स्पष्ट झाले. तरीही, या स्ट्रायकरने नंतर ४५ व्या मिनिटाला गोल केला. ◂ (वृत्तसंस्था)



**सॅन फ्रान्सिस्को येथे बोस्नियाविरुद्धच्या सामन्यात फ्री-किकवर गोल केल्यानंतर आनंद साजरा करताना अमेरिकेचा मलिक टिलमन (१७) व जिओव्हानी रेना (उजवीकडे)**

# जपानच्या प्रशिक्षकांना भविष्याबद्दल निर्णय घेण्यासाठी वेळ हवा

**टोकियो, २ जुलै**

फिफा विश्वचषकातून बाहेर पडल्यानंतर जपान संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून भविष्याबद्दल निर्णय घेण्यासाठी वेळ हवा आहे, असे हाजिमे मोरियासू म्हणाले. भविष्याबद्दल निर्णय घेण्यापूर्वी त्यांना आराम करण्यासाठी आणि विश्वचषकाच्या निकालांचा आढावा घेण्यासाठी वेळ हवा आहे.

जपान फुटबॉल संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या पत्रकार परिषदेत मोरियासू म्हणाले की, मला वाटते की मी आता थोडी विश्रांती घेईन आणि त्यानंतर मला स्पर्धेवर योग्यरित्या विचार करावा लागेल. आतापर्यंत फक्त एवढेच ठरले आहे. तरीही, ते देशातील या खेळाच्या भविष्याबद्दल आशावादी होते. इतिहासात तयार झालेला जपानी फुटबॉल, जागतिक स्तरावर स्वतःचे स्थान टिकवून ठेवण्यास पूर्णपणे सक्षम आहे. मला खात्री आहे की जर आपण ही प्रगती सुरू ठेवली तर आपण निश्चितपणे विश्वविजेते बनू शकू. असे मोरियासू म्हणाले. मोरियासू यांनी आपल्या संघाला विश्वचषकात ३२ संघांच्या फेरीत पोहोचवले होते, परंतु या आठवड्यात पाच वेळच्या विजेत्या ब्राझीलकडून त्यांना २-१ ने पराभव पत्करावा लागला. गेल्या दोन दशकांत जपानने सातत्याने प्रगती केली आहे, परंतु विश्वचषकाच्या बाद फेरीतील एकही सामना त्यांना अद्याप जिंकता आलेला नाही.

रशियामध्ये झालेल्या २०१८ च्या विश्वचषकानंतर मोरियासू यांनी पदभार स्वीकारला. त्यांनी कतारमध्ये झालेल्या २०२२ च्या विश्वचषकात जपानला बाद फेरीपर्यंत पोहोचवले, जिथे त्यांना क्रोएशियाकडून पेनल्टी शूटआऊटमध्ये पराभव पत्करावा लागला. ◂ (वृत्तसंस्था)

## फैज कादरी, रामभाऊ देगावंकर संघाचा शानदार विजय

**सोलापूर, दि. २ जुलै-**



साहिल



अवनीश

लिटिल चॅम्प बारा वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत फैज कादरी व रामभाऊ देगावंकर संघाने शानदार विजय मिळविले. जुळे सोलापूर येथील भंडारी मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत गुरुवारी झालेल्या सामन्यात फैज कादरी संघाने डॉ. देशपांडे संघाचा ५ गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना डॉ. देशपांडे संघाने २५ षटकांत ७ बाद ९७ धावा केल्या. प्रत्युत्तरात फैज कादरी संघाने २२.१ षटकांत ५ गडी गमावत ९८ धावा करून विजय मिळवला. साहिल रजानी याच्या अष्टपैलू योगदानाबद्दल त्याला साम नावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. दुसऱ्या रोमहर्षक लढतीत रामभाऊ देगावंकर संघाने अंबादास पवार संघावर २ गडी राखून मात केली. प्रथम फलंदाजी करताना अंबादास पवार संघाने २१.२ षटकांत ९ बाद १०२ धावा केल्या. प्रत्युत्तरात रामभाऊ देगावंकर संघाने २०.१ षटकांत ८ गडी गमावत १०६ धावा करून विजय मिळवला. रामभाऊ देगावंकर संघाच्या अवनीश गारड याने ३ षटकांत ११ धावा देऊन ५ बळी घेत उत्कृष्ट गोलंदाजी केली. त्याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. या दोन्ही सामन्यासाठी पंच म्हणून चंदू मंजेली व अशोक डोंबाळे तर गुणलेखक म्हणून शुभम मुत्तूर यांनी काम पहिले.



## शस्त्रांग मार्शल आर्ट स्पर्धेत मेहता प्रशालेची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जुलै-**

पोद्दार शाळेजवळील चैत्राली हॉल येथे झालेल्या जिल्हा शस्त्रांग मार्शल आर्ट स्पर्धेत कै. वि. मो. मेहता माध्यमिक प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी विविध वजनी गटांत उल्लेखनीय कामगिरी केली.

यात साक्षी बिद्नुरे, अनुष्का देवकते, कादंबरी कुलकर्णी, हर्षाली साळुंखे, तन्वी ढंगापुरे, श्रेयस चव्हाण, अंबादास बिद्नुरे, यिज्ञेश कोरे, अवनीश भोगे व प्रणव लोभे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या यशाबद्दल मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी, शाळा समिती अध्यक्ष बरवे नियामक मंडळ सदस्य सुरेशबाबु मंकणी यांनी अभिनंदन केले. यशस्वी विद्यार्थ्यांना संदीप गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

# सोलापुरात आजपासून वरिष्ठांच्या जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जुलै-**

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना पुरस्कृत व अखिल भारतीय लॉन टेनीस संघटनेच्या अधिपत्याखाली वरिष्ठांच्या चौथ्या जागतिक मानांकन लॉन टेनिस (पुरुषांच्या, महिलांच्या एकेरी , दुहेरी व मिश्र दुहेरी) स्पर्धेचे आयोजन येथे करण्यात आले आहे. ही स्पर्धा ३ ते ९ जुलै या कालावधीत एम.एस. एल.टी.ए टेनिस सेंटर, जिल्हा क्रीडा संकुल व इलिझियम क्लबच्या मैदानावर सकाळी ९ ते रात्री १० पर्यंत खेळविल्या जाणार आहेत .

या स्पर्धेत ३० ते ७५ वर्षापुढील पुरुष तर ३० ते ५० वर्षापुढील महिला सहभागी होणार आहेत. या स्पर्धे त देशभरतातून १३४ खेळाडू सहभागी होणार आहेत .

स्पर्धेचे आयोजन सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेने (एस.डी.एल.टी.ए) केले आहे. या स्पर्धेत भाग घेणाऱ्या खेळाडूंच्या पिण्याच्या पाण्याची सोय स्पेनका कंपनीच्या वतीने करण्यात आली आहे.

या स्पर्धेचे उदघाटन शुक्रवार दिनांक ३ जुलै रोजी सकाळी ८.३० वाजता जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश मोहारे , यांच्या हस्ते होणार आहे. या स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय टेनिस फेडरेशनने पर्यवेक्षक म्हणून पुण्याच्या वैशाली शेकटकर यांची स्पर्धा संचालक म्हणून मुंबईच्या डोसा रामाराव यांची तर एम.एस.एल.टी.ए चे संयुक्त मानद सचिव राजीव देसाई यांच्यावर स्पर्धा व्यवस्थापनाची जबाबदारी सोपविली आहे.

स्पर्धेतील खेळाडूना आंतरराष्ट्रीय गुण मिळणार असून यामुळे त्यांना जागतिक क्रमवारीत आगेकूच करण्यासाठी मदत होणार आहे. या स्पर्धे त अनेक दिग्गज माजी भारतीय खेळाडू आपले कौशल्य पणाला लावणार आहेत. या स्पर्धेची लोकप्रियता देशभरात दिवसें दिवस वाढत चालली असून जानेवारी ते जुलै २०२६ या कालावधीत एकूण ११ जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येक वयोगटातील सर्वाधिक गुण प्राप्त केलेल्या प्रथम ४ खेळाडूंची पोर्तुगाल येथे जानेवारी २०२७ मधे होणाऱ्या जागतिक मास्टर्स स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड केली जाणार आहे.

# महाराष्ट्र ॲम्युचर नेटबॉल असोसिएशनच्या अस्तित्वावर गदा

### अन्यायाविरोधात कायदेशीर लढा उभारण्याचा निर्धार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ जुलै-**

महाराष्ट्रात नेटबॉल खेळाचा प्रचार व प्रसार अनेक वर्षांपासून सुव्यवस्थितपणे सुरू असताना, नेटबॉल फेडरेशन ऑफ इंडियाने महाराष्ट्र ॲम्युचर नेटबॉल असोसिएशनची संलग्नता कोणतीही न्याय्य प्रक्रिया न राबविता व कथितपणे नियमबाह्य पद्धतीने रद्द करून नव्याने स्थापन करण्यात आलेल्या राज्य संघटनेला संलग्नता दिल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र ॲम्युचर नेटबॉल असोसिएशनने केला आहे.

या निर्णयामुळे राज्यातील अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या संलग्न जिल्हा नेटबॉल संघटनांवर अन्याय झाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. अनेक जिल्हा संघटना १९९४ पासून सातत्याने नेटबॉल खेळाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी कार्यरत आहेत. या निर्णयामुळे अनुभवी पदाधिकारी, प्रशिक्षक, पंच, खेळाडू तसेच नेटबॉलच्या विकासासाठी योगदान देणाऱ्या सर्व घटकांच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, राज्यातील खेळाडूंच्या भवितव्यावरही विपरीत परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र ॲम्युचर नेटबॉल असोसिएशनच्या वतीने चंद्रपूर येथे राज्यातील सर्व संलग्न जिल्हा संघटनांची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत नेटबॉल फेडरेशन ऑफ इंडियाने केलेल्या कथित नियमबाह्य व बेकायदेशीर कारवाईवर चर्चा करण्यात आली. बैठकीत फेडरेशनच्या संविधानाचे उल्लंघन, नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचा भंग, क्रीडा प्रशासनातील पारदर्शकतेचा अभाव आणि एकतर्फी निर्णय प्रक्रियेविरोधात भारत सरकारचे युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, इंडियन ऑलिम्पिक असोसिएशन, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन, महाराष्ट्र राज्याचे क्रीडा आयुक्त, धर्मादाय आयुक्त तसेच अन्य सक्षम प्राधिकरणांकडे न्याय मागण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.

बैठकीस महाराष्ट्रातील २१ संलग्न जिल्हा नेटबॉल संघटनांचे पदाधिकारी, सचिव उपस्थित होते. तसेच, विविध कारणांमुळे उपस्थित राहू न शकलेल्या इतर संलग्न जिल्हा संघटनांनीही अप्रत्यक्षपणे आपला पाठिंबा व संमती दर्शविली. त्यामुळे बैठकीतील सर्व ठरावांना राज्यातील संलग्न जिल्हा संघटनांचा व्यापक पाठिंबा मिळाल्याचे स्पष्ट झाले. बैठकीस उपस्थित सर्व पदाधिकारी व प्रतिनिधींनी महाराष्ट्रातील नेटबॉल खेळाडू, प्रशिक्षक, पंच आणि संलग्न जिल्हा संघटनांचे हित जपण्यासाठी संविधानिक, कायदेशीर आणि लोकशाही मार्गाने लढा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

**नेटबॉल बचाव कोअर कमिटीत सोलापूरच्या जुबेर शेख यांचा समावेश**

आवश्यकतेनुसार न्यायालयात दाद मागण्याचाही ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. या संपूर्ण कायदेशीर लढ्याचे नियोजन व समन्वय करण्यासाठी महाराष्ट्र नेटबॉल बचाव कोअर कमिटी स्थापन करण्यात आली. समितीच्या अध्यक्षपदी डॉ. नारायण मूर्ती यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. समितीमध्ये डॉ. शालिनी आंबटकर (जयस्वाल) सचिव, संजय पाटील (नाशिक), मानसिंग वाबळे (पुणे), जयदीप सोनखासकर (अकोला), प्रवीण कुप्टीकर (नांदेड), सुनील कडू (अमरावती), जुबेर शेख (सोलापूर), नरेश



कळंबे (यवतमाळ) आणि समीर सिकेलकर (पुणे) यांची सदस्य म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. याच बैठकीत आगामी ४४ वी सिनियर नॅशनल नेटबॉल चॅम्पियनशिप (पुरुष) २०२६-२७, पलवल (हरियाणा) येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेबाबत ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. त्यानुसार, महाराष्ट्र ॲम्युचर नेटबॉल असोसिएशन, गोंदिया ही संघटना नियमांनुसार राज्यस्तरीय निवड अजिंक्यपद स्पर्धा आयोजित करून महाराष्ट्रातील गुणवंत खेळाडूंची निवड करेल आणि निवड झालेल्या महाराष्ट्र पुरुष संघाला ४४ व्या सिनियर नॅशनल नेटबॉल चॅम्पियनशिप (पुरुष) २०२६-२७ मध्ये सहभागी करून घेईल, असा निर्णय घेण्यात आला.



# वसुंधरा महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक डॉ. अशोक पाटील यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जुलै-**

जुळे सोलापूरः येथील वसुंधरा कला महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक डॉ. अशोक पाटील नियत वयोमानानुसार सेवेतून निवृत्त झाले आहेत. त्याबद्दल त्यांचा शाहू शिक्षण संस्था आणि वसुंधरा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार समारंभ करण्यात आला.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगंबर झोंबाडे, ज्ञानज्योती विद्यालयातील मुख्याध्यापक जनार्दन चव्हाण, स्वामी विवेकानंद प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य शिवाजी काशीद, अनुराधा विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या पिरजादे इत्यादीची प्रमुख उपस्थिती होती. यासाठी शाहू शिक्षण संस्थेचे सचिव अभिजीत ढोबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

सचिन कोलते मित्रपरिवार, विजापूर नाका परिसरातील मित्रमंडळी यांनी डॉ. अशोक पाटील यांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. तानाजी देशमुख, आभार डॉ. संगीता भोसले यांनी मानले.

# अतिक्रमण हटाव मोहिमेवरुन पंढरपुरात खडाजंगी

### नगराध्यक्षांसह सत्ताधारी व विरोधी नगरसेवक एकत्र; अधिकाऱ्यांसोबत वाद

### जेसीबीच्या सह्याने अतिक्रमण हटवल्याने राडा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२ जुलै -**

आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर नगरपालिकेकडून अतिक्रमण काढण्याची मोहिम सुरु आहे. दोन दिवसांपासून सुरु असलेल्या मोहिमेत आज गुरुवार दि. २ जुलै रोजी गालबोट लागले. जेसीबीच्या सह्याने अतिक्रमण हटवल्यानं नगराध्यक्ष, नगरसेवकांची अधिकाऱ्यांबरोबर खडाजंगी झाली.



नगरपालिका प्रशासन आणि पोलिसांकडून संयुक्तिकरित्या ही अतिक्रमण हटाव मोहीम राबवली जात आहे. मात्र जेसीबीने अतिक्रमण काढत असल्याने वाद झाला. अशाप्रकारे अतिक्रमण काढताना व्यापाऱ्यांचे नुकसान होत आहे, त्यांची नुकसान भरपाई कोण देणार? असा सवाल नगराध्यक्षा प्रणिता भालके यांनी केला आहे. प्रशासनाविरुद्ध नगराध्यक्षांसह सत्ताधारी व विरोधी नगरसेवक एकत्र आले आहेत. अतिक्रमण हटवलेल्या व्यापाऱ्यांना घेऊन अधिकाऱ्यांशी नगराध्यक्षांसह नगरसेवकांचा वाद सुरु आहे.

नगरपालिका व पोलिस प्रशासनाकडून शहरात आणि पालखी मार्गांवर धडक अतिक्रमण हटाव मोहीम सुरु आहे. मोहिमेंतर्गत रस्त्यांवरील अनधिकृत टपऱ्या, हातगाड्या, जाहिरात फलक आणि कायम स्वरूपी झालेले अनधिकृत बांधकाम हटवून वारकऱ्यांना आणि नागरिकांना रहदारीसाठी मोकळे मार्ग उपलब्ध करून दिले जात आहेत. पंढरपुरात येणारे मुख्य रस्ते, प्रदक्षिणा मार्ग, आणि विठ्ठल मंदिर परिसरातील अतिक्रमणे हटवून रस्ते मोकळे करण्याचे काम सुरु आहे. मात्र, जेसीबीच्या सहाय्याने अतिक्रमण हटाव मोहिम सुरु असल्याने व्यापाऱ्यांचे नुकसान होत आहे. त्यामुळे नगराध्यक्षा प्रणिता भालके यांच्यासह सत्ताधारी आणि विरोधी नगरसेवक देखील आज रस्त्यावर उतरले होते. त्यांच्यात आणि अधिकाऱ्यांमध्ये वाद झाल्याचे पहायला मिळाले.

#### विश्वासात न घेता कारवाई केल्याचा आरोप

जेसीबीच्या सह्याने अतिक्रमण हटवण्यात आल्यावर नगराध्यक्षांसह सत्ताधारी आणि विरोधी आघाडीचे सर्व नगरसेवक एकत्रित रस्त्यावर उतरले. अतिक्रमण हटवलेल्या व्यापाऱ्यांसोबत नगरसेवक व नगराध्यक्षांनी, व्यापाऱ्यांना अल्टिमेटमध्ये द्या मग अतिक्रमण काढा, अशी भूमिका घेतली आहे. तसेच नगरसेवकांना विश्वासात न घेता ही कारवाई केल्याचाही आरोप नगरसेवकांसह, नगराध्यक्षांनी केला आहे. त्यामुळे अतिक्रमण हटाव मोहिमेला अप्रत्यक्षरीत्या शहरातील नगराध्यक्षांसह नगरसेवक विरोध करत आहेत का? अशी चर्चा सुरु झाली आहे.

## महत्वाचे...




### लायन्स क्लब सांगोलातर्फे कृषी, सी.ए. व डॉक्टर्स दिन साजरा

**सांगोला,दि.२ जुलै -**

लायन्स क्लब ऑफ सांगोला यांच्या वतीने राष्ट्रीय कृषी दिनानिमित्त प्रगतशील बागायतदार बाबुराव गायकवाड, सी.ए दिनानिमित्त सी.ए.उत्तम बनकर व डॉक्टर्स दिनानिमित्त डॉ.शैलेश डोंबे यांचा पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रम आंतरराष्ट्रीय लायन्स क्लबचे प्रांतपाल प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांच्या अध्यक्षतेखाली नगर वाचनमंदिर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, सांगोला येथे झाला. बाबुराव गायकवाड यांनी शेतीविषयी अनुभव कथन केले. सी.ए उत्तम बनकर व डॉ.शैलेश डोंबे यांनी समाजसेवा व व्यावसायिक नैतिकतेचे महत्त्व अधोरेखित केले. याप्रसंगी प्रा.प्रसाद खडतरे, खजिनदार प्रा.निलेश नागणे, अमर गुळमिरे, मिलिंद फाळके, शुभांगी घोंगडे, प्रा.शिवशंकर तटाळे, प्रा.डी.के.पाटील, इसाक मुल्ला, तानसिंग माळी, प्रा.गणेश पैलवान उपस्थित होते. प्रास्ताविक सांगोला क्लबचे अध्यक्ष प्रशांत रायचुरे, सूत्रसंचालन प्रा.राजेंद्र कुंभार यांनी केले. आभार प्रा.नवनाथ बंडगर यांनी मानले.

### बोरोटी कन्नड शाळेत लोकसहभागातून वृक्षारोपण

**अक्कलकोट दि २ जुलै -**

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत बोरोटी खुर्द येथील कन्नड शाळेच्या आवारात लोकसहभागातून आणि गावातील युवकांच्या सक्रिय सहभागाने वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. शिक्षणप्रेमी केतन वसंत राठोड यांच्या सहकार्याने व मल्लिकार्जुन वाडी यांच्या मदतीने विविध प्रकारची वृक्षरोपे उपलब्ध करून देण्यात आली. उपक्रमात गावातील युवकांनी स्वतः खड्डे खोदले. केतन राठोड यांनी आपल्या गावाप्रती असलेले प्रेम जपत झापू तांडा रस्त्यावरही वृक्षारोपण करून ट्रीगार्ड बसविण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. त्यांच्या या कार्यामुळे झापू तांडा व बोरोटी परिसरातील नागरिकांकडून राठोड परिवाराचे सर्वत्र कौतुक होत आहे. बोरोटी खुर्द कन्नड शाळेला वृक्षरोपे उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य करणारे मल्लिकार्जुन वाडी, प्रभाकर सनगुंदी, सचिन कोळी, अजित पाटील, शरण चनगे, गुरु पाटील, चंद्रकांत पाटील, युवराज पाटील, आकाश मजगे तसेच सर्व युवकांचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांनी आभार मानले. शिक्षक शरणप्पा फुलारी यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. या प्रसंगी मुख्याध्यापिका राजश्री तांबे, शिक्षक अनंत बांगर व अंजली वाघमारे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सिद्धाराम बिराजदार, उपाध्यक्ष चिदानंद शिंगे, राजू हालोळ्ळी, गोपाल लोहार, काशिनाथ वाडी आदी उपस्थित होते.



### स्मार्ट वर्गखोल्यांसह पद्मश्री सुमतीबाई इंग्लिश मीडियम स्कूलची नवी वाटचाल

**सोलापूर, दि. २ जुलै-**

विद्यार्थ्यांना अधिक दर्जेदार, सुरक्षित आणि आधुनिक शिक्षणाचे वातावरण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पद्मश्री सुमतीबाई इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये पूर्व-प्राथमिक व प्राथमिक विभागातील नूतनीकरण केलेल्या वर्गखोल्यांचे उद्घाटन मंगळवार, ३० जून रोजी उत्साहात झाले. प्रारंभी विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांच्या हस्ते सरस्वती पूजन झाले. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा अनुभव अधिक आनंददायी व्हावा, यासाठी वर्गखोल्यांचे आकर्षक पद्धतीने नूतनीकरण केले आहे. रंगीत आणि विद्यार्थ्यांना आकर्षित करणारे फर्निचर, सुंदर अंतर्गत सजावट, स्मार्ट इंटरॲक्टिव्ह टीव्हींची सुविधा प्रत्येक वर्गात दिली आहे. या सुविधांमुळे अध्यापन अधिक संवादात्मक, रंजक आणि परिणामकारक होणार आहे. विद्यार्थ्यांमधील जिज्ञासा, सर्जनशीलता आणि आत्मविश्वास वाढणार आहे. उद्घाटन समारंभाला श्राविका संस्थेचे सचिव यतिन शहा, संस्थेचे विश्वस्त करण शहा, देवई शहा, मुख्याध्यापिका स्वाती कांबळे, अर्चना अक्कलकोटे, कल्पना रामावत, विभागप्रमुख, शिक्षक, पालक आदी उपस्थित होते.

मूल्याधिष्ठित शिक्षणाची परंपरा जपत आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी पद्मश्री सुमतीबाई इंग्लिश मीडियम स्कूल सातत्याने प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच उज्ज्वल भविष्यासाठी आवश्यक कौशल्ये मिळावीत, हा शाळेचा कायमचा प्रयत्न असल्याचे यावेळी शाळेतर्फे स्पष्ट करण्यात आले.

# अंतर्मुख करणारे साहित्य काळाची गरज

### माजी आमदार प्रशांत परिचारक; पंढरपुरात दोन लेखसंग्रहांचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२ जुलै -**

धावपळीच्या आणि भौतिकवादी युगात माणसाला अंतर्मुख व्हायला लावणारे साहित्य दुर्मिळ झाले आहे, असे प्रतिपादन माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी केले.

पंढरपुरात बुधवारी सी.ए. दिनाचे औचित्य साधून झालेल्या या सोहळ्यात सी.ए. पवनकुमार झंवर लिखित मनमंथन आणि मुख्याध्यापक वैभव मोरे लिखित प्रामाणिक कामातील अप्रामाणिकपणा या पुस्तकांचे प्रकाशन झाले. यावेळी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

प्रशांत परिचारक पुढे म्हणाले, ''मनमंथन हे पुस्तक माणसाच्या अंतर्गत संघर्षाला योग्य दिशा देणारे आहे, तर प्रामाणिक कामातील अप्रामाणिकपणा हा लेखसंग्रह दैनंदिन व्यवहारातील अप्रामाणिकपणा ओळखण्याचे सुंदर ज्ञान देतो.'' सोहळ्यास पालवी संस्थेच्या संस्थापिका मंगल शहा, भागवताचार्य बाळासाहेब बडवे, भारुडसम्राज्ञी चंदाताई तिवाडी, गुरुवर्य प्रदीप खर्डीकर, हंसकुमार कवठेकर आणि माजी उपमुख्याधिकारी सुनील वाळुंजकर आदी मान्यवर उपस्थित होते.




मंगल शहा यांनी वैभव मोरे यांच्या लेखनातील सामाजिक तळमळीचे तर पवन झंवर यांच्या पुस्तकातील मानसिक प्रगल्भतेचे कौतुक केले. सुनील वाळुंजकर यांनी पवनकुमार यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा गौरव केला. लेखक वैभव मोरे यांनी भावूक होत ब्लॉगर ते रायटर या प्रवासाचे श्रेय संपादक पवनकुमार झंवर यांना दिले.

पवनकुमार झंवर यांनी सी.ए. डे आणि लग्नाच्या वाढदिवसाला हा योग जुळून येणे हा दुग्धशर्करा योग असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती जोशी यांनी केले. आभार राजेश खिस्ते यांनी मानले. सोहळ्यास शहरातील साहित्यिक, पत्रकार व वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# दारूबंदीसाठी बोराळे गावच्या महिला आक्रमक

### आठ दिवसात दारू विक्रीवर कारवाई करा; अन्यथा घरात जाऊन बाटल्या फोडू

### पंचायत समिती सदस्या जयश्री कवचाळे यांचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. २ जुलै-**

श्री बसवेश्वराच्या पदस्पर्शाने पावन असलेल्या बोराळे नगरीत अवैद्य धंद्याचे प्रमाण वाढले आहे. त्याविरोधात महिलांनी आज पंचायत समिती सदस्या जयश्री कवचाळे यांच्या नेतृत्वात मोर्चा काढला. संबंधित प्रशासनाने आठ दिवसात बोराळे गावातून अवैध धंदे, दारू विक्री बंद करावा, अन्यथा महिलांचा मोर्चा थेट घरात घुसून बाटल्या फोडू असा खणखणीत इशारा कवचाळे यांनी दिला.

अवैध धंदे, दारू विक्रीमुळे गावातील अनेक युवक व्यसनाधीन झाले आहेत. अनेक संसार उघड्यावर आले, कर्जबाजारी झाले, तरीही अवैध व्यवसायाचा मुजोरपणा वाढतच आहे. बोरोळे पंचक्रोशीतील शेकडो महिलांच्या उपस्थितीत पंचायत समितीच्या सदस्या जयश्री संजीव कवचाळे यांच्या पुढाकारातून अवैध धंद्यांविरोधात गावातून भव्य रॅली काढली. पीडित महिलांचा आवाज प्रशासनापर्यंत पोहचावा, बोराळे गावातून अवैद्य धंदे कायमचे हद्दपार व्हावेत, असे निवेदन देऊन सरपंच व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत महिलांनी मागणी केली. पुढील काळात अवैध धंद्याला कोणी थारा देऊ नका, युवकांनी व्यसनाधीश होऊ नका, आपले कुटुंब सक्षम व मजबूत होण्यासाठी महिलांच्या या मागणीला सर्वांनी साथ द्यावी अशी मागणी कवचाळे यांनी केली.

आज बोराळा येथे उठलेला आवाज पाहून पोलिसांनी अवैध धंद्याविरोधात कठोर कारवाई करावी, अन्यथा बोराळे गावच्या मोर्चाचे पडसाद संपूर्ण तालुकाभर दिसतील, अशी चर्चा वाढत आहे.

# भाजपची मतदार यादी विशेष सखोल पुनरावलोकन कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२ जुलै -**

भाजप सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्याच्या वतीने मतदार यादी विशेष सखोल पुनरावलोकन अभियानाच्या अनुषंगाने कार्यकर्त्यांसाठी विशेष कार्यशाळा टेंभुर्णी येथे झाल्याचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी सांगितले.

कार्यशाळेत एसआयआर प्रभारी, महाराष्ट्र राज्य तसेच मध्यप्रदेश राज्याचे महामंत्री आ.भगवानदास सबनानी यांनी मतदार यादी विशेष सखोल पुनरावलोकन अभियानाचे महत्त्व, कार्यपद्धती, अंमलबजावणी आणि प्रत्येक बूथवर अचूक व अद्ययावत मतदार यादी तयार करण्यासाठी कार्यकर्त्यांनी घ्यावयाची काळजीविषयी मार्गदर्शन केले. तसेच पश्चिम महाराष्ट्र सहसंयोजक विक्रम देशमुख यांनी बूथ सक्षमीकरण, संघटनात्मक बांधणी आणि मतदार यादी पुनरावलोकन अभियान यशस्वी करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने जबाबदारीने कार्य करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी जिल्हा दूध उत्पादक संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे, जिल्हा सरचिटणीस सचिन शिंदे, गणेश चिवटे तसेच जिल्ह्यातील पदाधिकारी, मंडल अध्यक्ष, शक्तिकेंद्र प्रमुख, बूथ प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# डॉ. वळसंगकर आत्महत्या प्रकरणात न्यायवैद्यक अहवाल ठरला अनिर्णित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. दि. २ जुलै -**

शहरात खळबळ उडवून देणाऱ्या डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्या प्रकरणाच्या सुनावणीत महत्त्वाची घडामोड घडली. या प्रकरणाच्या तपासकामी न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळेत पाठवलेला पुराव्यांचा अहवाल बुधवारी न्यायालयात सादर केला. मात्र, यात रक्ताच्या नमुन्यांबाबतचे निष्कर्ष इनकन्क्लुझिव्ह म्हणजेच अनिर्णित असल्याचे नमूद केले आहे. आता या प्रकरणी पुढील सुनावणी २० जुलै रोजी होणार आहे.

डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्या प्रकरणाचा तपास करताना पोलिसांनी घटनास्थळावरून महत्त्वपूर्ण पुरावे जप्त केले होते. यामध्ये डॉ. वळसंगकर यांनी आत्महत्येच्या वेळी परिधान केलेले शर्ट आणि पॅन्ट, बाथरूममधील रक्ताने माखलेले टॉवेल, नॅपकिन, कपड्याचा तुकडा आणि सिगारेटची थोटके यांचा समावेश होता. या सर्व पुराव्यांवरील रक्ताचे नमुने तपासण्यासाठी मुंबई येथील न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळेकडे पाठवले होते.

प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सरकारी पक्षातर्फे हा अहवाल प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा यांच्या न्यायालयात दाखल करण्यात आला. मात्र, न्यायवैद्यक तज्ज्ञांनी सादर केलेल्या अहवालात निष्कर्षाबाबत स्पष्टता नसल्याने या प्रकरणाकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

सदर खटल्याची सुनावणी प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा यांच्या न्यायालयात सुरू आहे. या प्रकरणात सरकार पक्षातर्फे ॲड. प्रदीप राजपूत बाजू मांडत आहेत. आरोपी पक्षातर्फे ॲड. प्रशांत नवगिरे आणि मूळ फिर्यादीतर्फे ॲड. शशी कुलकर्णी काम पाहत आहेत.

# वृक्षारोपण काळाची गरज : डीवायएसपी टाकणे

### हैद्रा देवस्थान ट्रस्टतर्फे वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि. २ जुलै -**

पर्यावरणाच्या रक्षणासाठी प्रत्येकाने वृक्षारोपण करण्याची गरज आहे. हैद्रा देवस्थान व वसंत देडे मित्रपरिवाराने वृक्षारोपण कार्यक्रम घेऊन पर्यावरण रक्षणाकरिता मोलाचे कार्य करीत असल्याचे गोरवोद्गार विभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र टाकणे यांनी काढले.

हजरत ख्वाजा हाजी सैफुल मुल्क चिश्ती कादरी रह. हैद्रा देवस्थान ट्रस्ट व भारतीय लहुजी सेना जिल्हाध्यक्ष वसंत देडे यांच्या संयुक्त विद्यमाने हैद्रा देवस्थान ट्रस्ट येथे वृक्षारोपण केले. यावेळी टाकणे बोलत होते.



महापारेषण उपकार्यकारी अभियंता अक्कलकोट १ चे आर. एच. आडम, उपकार्यकारी अभियंता अक्कलकोट २ चे श्रीनिवास पाडाल, हैद्रा सरपंच नागव्वा तेली, माजी सरपंच मलकण्णा कोगनुर, दर्गा चेअरमन- रफीक मुजावर, व्हा. चेरममन- बंदानवाज मुजावर, भारतीय लहुजी सेना जिल्हाध्यक्ष वसंत देडे, तालुकाध्यक्ष लखन वाघमारे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती .

पर्यावरणाचा ऱ्हास व जमिनीची धुप होत आहे. वसुंधरा वाचवण्यासाठी वृक्ष लागवड ही चळवळ बनली पाहिजे, असे वसंत देडे म्हणाले. याप्रसंगी पोलिस पाटील श्रीशैल कोगनुर, विश्वनाथ कोगनुर, श्रीमंत रुग्गी, संगप्पा पाटील, विद्याधर पाटील, डॉ. मुजावर, जिलानी मुजावर, बुडन मुजावर उपस्थित होते. वृक्ष रोपणसाठी माहिती अधिकार कार्यकर्ता तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील, मनसे अक्कलकोट शहर संघटक बारकू शिंदे अनिल झंपले तालुका अध्यक्ष भारतीय लहुजी सेना, लखन वाघमारे हैद्रा देवस्थानचे विश्वस्त कर्मचारी ग्रामस्थ यांनी परिश्रम घेतले.

## निधन वृत्त...

### नारायणदास आनंदानी



**सोलापूर, दि. २ जुलै-**

गुरुनानक चौक येथील सिंधी समाजातील व्यावसायिक नारायणदास गनामल आनंदानी (वय ५७) यांचे दीर्घ आजाराने काल राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, भाऊ, बहीण, नातू असा परिवार आहे.

### सुजाता शाह



**सोलापूर, दि. २ जुलै-**

जुळे सोलापूर भागातील ओम गर्जना चौक येथील रहिवाशी श्रीमती सुजाता धवल शाह (गंजोटीकर) यांचे दि. १ जुलै २०२६ रोजी पहाटे उपचार घेत असताना अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६६ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते तेजस शाह यांच्या त्या मातोश्री होत.

# कारवाईस गेलेल्या महसूल पथकावर हल्ला; १३ जणांवर गुन्हा

### पंढरपूर तालुक्यातील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२ जुलै -**

पंढरपूर तालुक्यातील शेगावदुमाला परिसरात अवैध वाळू उपसाप्रकरणी कारवाईसाठी गेलेल्या महसूल पथकाच्या वाहनावर काही जणांनी दगडफेक केली. यात शासकीय वाहनाचे नुकसान झाले असून १३ जणांवर गुन्हे दाखल झाले आहेत.

ग्राम महसुल अधिकारी दिगंबर डोईफोडे यांनी याबाबत येथील तालुका पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. सध्या वाळू घाटांचे लिलाव बंद असल्याने बाजारात वाळूचा तुटवडा निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर भीमा नदीपात्रातून रात्रीच्या वेळी कथित अवैध वाळू उपसा होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. महसूल विभाग आणि पोलिस प्रशासनाकडून वेळोवेळी कारवाई होत असली, तरी अशा प्रकारांना पूर्णतः आळा बसलेला नाही.

महसल विभागाला १ जुलै रोजी तालुक्यातील शेगावदुमाला परिसरात रात्रीच्या वेळी अवैध वाळू उपसा सुरू असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर २ जुलै रोजी पहाटे साडेचारच्या सुमारास महसूल पथक घटनास्थळी रवाना झाले. मात्र तेथे पोहोचताच काही लोक शासकीय वाहनांचा पाठलाग करीत आले. त्यांनी शिवीगाळ करीत कोयत्याचा धाक दाखवित पथकाच्या वाहनावर दगडफेक केली. यामध्ये शासकीय वाहनाचे नुकसान झाले.

दरम्यान सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्याने पथकाला कारवाई न करताच माघारी परतावे लागले. त्यानंतर येथील तहसिलदार सचिन लंगोटे यांच्या कानावर हा सर्व प्रकार घातल्यावर ग्राम महसुल अधिकारी दिगंबर डोईफोडे यांनी येथील तालुका पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणी अक्षय अजिनाथ आटकळे, महादेव वैजिनाथ आटकळे, गोपाळ आटकळे, सचिन काटे, दिपक रामदास चव्हाण, मनोज आटकळे, बालाजी गाडेकर, बालाजी डिकरे, धनाजी आटकळे, वैभव आटकळे, सोमनाथ आटकळे, स्वप्नील कोरे, तुषार चव्हाण ( सर्व जण रा.शेगावदुमाला, ता.पंढरपूर) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. या घटनेनंतर अवैध वाळू उपशाविरोधातील कारवाईसाठी महसूल पथकाला पोस बंदोबस्त उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असल्याची चर्चा सुरू झाली आहे. तसेच संबंधित प्रकाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही व्यक्त होत आहे.

## महत्वाचे...



### नू.म.वि. शाळेत कै. वसंतराव नाईक यांची जयंती साजरी

**सोलापूर, दि. २ जुलै-**

येथील नू.म.वि. शाळेत कै. वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली.मुख्याध्यापिका स्मिता माळवदकर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रमिला निंबर्गी यांनी कै.वसंतराव नाईक यांच्या कार्याची माहिती करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व रेणुका हिरेमठ यांनी आभार मानलेफ



### पद्मश्री सुमतीबाई शाळेत नूतनीकरण केलेल्या वर्गखोल्यांचे उद्‌घाटन

**सोलापूर, दि.२ जुलै-**

पद्मश्री सुमतीबाई इंग्लिश मिडीयम शाळेतील पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागातील नूतनीकरण करण्यात आलेल्या वर्गखोल्यांचे उद्धाटन विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांच्या हस्ते सरस्वती पूजन करून करण्यात आले. यामध्ये रंगीबेरंगी बेंच, सुंदर रंगरंगोटी, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला पूरक शैक्षणिक वातावरण तसेच अध्यापन अधिक प्रभावी करण्यासाठी स्मार्ट इंटरॅक्टिव्ह टीव्हीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यावेळी संस्थेचे सचिव यतिन शहा, विश्वस्त करण शहा, प्रशासकीय अधिकारी देवई शहा, मुख्याध्यापिका स्वाती कांबळे, समन्वयिका अर्चना अक्कलकोटे, पर्यवेक्षिका कल्पना रामावत, स्वप्नील कोठारी उपस्थित होते.



### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामध्ये सायबर क्लबची स्थापना

**सोलापूर, दि.२ जुलै-**

सायबर गुन्ह्यांविषयी जनजागृती आणि विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या संगणकशास्त्र संकुलामध्ये 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमांतर्गत सायबर क्लबची स्थापना करण्यात आली. हा उपक्रम क्विक हील फाऊंडेशनसोबत झालेल्या सामंजस्य कराराच्या अंतर्गत राबविण्यात येणार आहे. सायबर क्लबचे नूतन पदाधिकारी याप्रमाणे; अध्यक्ष-विपाशना खराटे, सचिव-प्रणाली मासाळ, ॲक्टिव्हिटी डायरेक्टर-सौंदर्या कांबळे, मिडीया डायरेक्टर-सचिन धामणेकर. समन्वयक-डॉ. राजीवकुमार मेंते. गायत्री केसकर, दीपू सिंग, अनुपमा काटकर, अजय शिर्के यांनी सायबर सुरक्षेचे महत्त्व, डिजिटल सुरक्षितता, सायबर गुन्ह्यांपासून संरक्षण आणि जनजागृती उपक्रमांची अंमलबजावणी याविषयीची माहिती दिली.

# 'त्या' ३६ शाळा जिल्हा परिषदेच्याच!

## हस्तांतरणाच्या चर्चांना मिळाला पूर्णविराम

### 'यू-डायस' लॉगिनवरुन झाला होता संभ्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जुलै-**

सोलापूर जिल्ह्यातील उत्तर सोलापूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ३६ शाळांच्या यू-डायस पोर्टलवरील लॉगिनमध्ये झालेल्या बदलामुळे शाळा महापालिकेकडे हस्तांतरित झाल्याच्या चर्चांना गेल्या काही



दिवसांत मोठे उधाण आले होते. या चर्चेमुळे शिक्षक, पालक आणि शिक्षण क्षेत्रात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. मात्र हा संपूर्ण प्रकार केवळ तांत्रिक स्वरूपाचा असून जिल्हा परिषदेच्या एकाही शाळेची मालकी अथवा प्रशासन महापालिकेकडे हस्तांतरित झालेले नसल्याचे जिल्हा परिषद प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

उत्तर सोलापूर तालुक्यातील अनेक गावांचा समावेश मागील काही वर्षांत सोलापूर महापालिका हद्दीत करण्यात आला आहे. या गावांतील जिल्हा परिषद शाळा मात्र अद्याप जिल्हा परिषदेच्याच मालकीच्या असून त्यांचे शैक्षणिक आणि प्रशासकीय नियंत्रणही जिल्हा परिषदेकडेच आहे. विद्यार्थी, शिक्षक आणि शाळांची अद्ययावत माहिती यू-डायस प्रणालीमध्ये संकलित करण्यासाठी संबंधित शाळांचे तांत्रिक स्वरूपात महापालिकेच्या पोर्टलशी लॉगिन जोडण्यात आले. याच प्रक्रियेमुळे शाळा महापालिकेकडे गेल्याचा गैरसमज पसरला. जिल्हा परिषदेच्या शाळा महापालिकेकडे वर्ग करण्यासाठी शासनाची स्वतंत्र प्रक्रिया, परवानगी आणि प्रशासकीय निर्णय आवश्यक असतो. अशा कोणत्याही प्रकारची प्रक्रिया सध्या सुरू नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच पोर्टलवरील तांत्रिक अडचण काही दिवसांत दूर करण्यात येणार आहे, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

#### शाळांच्या मालकीशी कोणताही संबंध नाही

हा प्रकार केवळ तांत्रिक स्वरुपाचा आहे. माहिती संकलनासाठी यू-डायस प्रणालीमध्ये आवश्यक बदल करण्यात आले असून त्याचा शाळांच्या मालकीशी किंवा हस्तांतरणाशी कोणताही संबंध नाही, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी स्पष्ट केले.

#### सभागृहाची मंजुरी, कायदेशीर प्रक्रिया

जिल्हा परिषदेच्या सभागृहाची मंजुरी आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्याशिवाय कोणतीही शाळा महापालिकेकडे हस्तांतरित होऊ शकत नाही. त्यामुळे पालक, विद्यार्थी व शिक्षकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे जि.प.चे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी सांगितले.

#### महापालिका सदस्यांनी घेतला होता पुढाकार

महापालिका क्षेत्रातील जिल्हा परिषदेच्या शाळा महापालिका अधिकार क्षेत्रात घेण्यासंबंधी शासन निर्णय आहे. परंतु त्याची अंमलबजावणी झालेली नव्हती. ती अंमलबजावणी करण्यासंबंधी महापालिकेच्या सदस्यांनी पुढाकार घेतल्याचे दिसून येते. त्यामुळे ही प्रक्रिया झाली, असे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सांगितले.

#### मान्यतेशिवाय हस्तांतरण होऊ शकत नाही

शासनाच्या मान्यतेशिवाय किंवा जिल्हा परिषदेच्या संमतीशिवाय कोणत्याही शाळेचे हस्तांतरण होऊ शकत नाही. त्यामुळे अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हा परिषद शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांनी केले.

# आसरा रेल्वे उड्डाणपुलाला मिळाली अखेर गती

### आ. सुभाष देशमुख यांनी घेतली केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जुलै-**

गेल्या दोन वर्षांपासून विविध तांत्रिक अडचणींमुळे रखडलेल्या होटगी रोडवरील आसरा चौक रेल्वे उड्डाणपूल दुपदरीकरणाच्या कामाला अखेर गती मिळाली आहे. या प्रकल्पासंदर्भात आमदार सुभाष देशमुख यांनी गुरुवारी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन कामाचा आढावा घेतला. महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक राजेश कुमार जयस्वाल यांच्यासोबतही चर्चा करून सध्याच्या परिस्थितीची माहिती दिली.



होटगी रोड आणि जुळे सोलापूर परिसराला जोडणारा आसरा चौक उड्डाणपूल हा शहरातील सर्वाधिक वर्दळीच्या मार्गांपैकी एक आहे. त्यामुळे पुलाच्या दुपदरीकरणासाठी दोन वर्षांपूर्वी ३२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते या प्रकल्पाचे भूमिपूजनही करण्यात आले होते. मात्र, सोलापूर महापालिकेच्या मुख्य जलवाहिनीचा अडथळा दूर करण्याकामी सुमारे १२ कोटी रुपयांचा खर्च कोण उचलणार? यावरुन महापालिका आणि रेल्वे प्रशासनात एकमत होत नसल्याने प्रकल्प रखडला होता.

या पार्श्वभूमीवर आमदार सुभाष देशमुख यांनी रेल्वे, महापालिका, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि महारेलच्या अधिकाऱ्यांसोबत अनेक बैठका घेतल्या. अखेर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सूचनेनुसार जलवाहिनी न हलवता उड्डाणपूल उभारण्याचा पर्याय निश्चित करण्यात आला. याच अनुषंगाने झालेल्या बैठकीत प्रकल्पाच्या पुढील काम काजाचा आढावा घेण्यात आला. आता या महत्त्वाच्या प्रकल्पाला पुन्हा गती मिळणार असून शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मोठी मदत होणार आहे.

# जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांना पदोन्नती

### अहिल्यानगरच्या प्रादेशिक साखर सहसंचालकपदी नियुक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जुलै-**

सोलापूरचे जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांची पदोन्नतीने बदली करण्यात आली. अहिल्यानगर येथे प्रादेशिक साखर सहसंचालक म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. सहकार विभागाने केलेल्या पदोन्नतीच्या आदेशानुसार त्यांना ही जबाबदारी देण्यात आली आहे. किरण गायकवाड यांनी बेकायदा सावकारीविरोधातील कारवाई आणि प्रलंबित सावकारी प्रकरणे निकाली काढण्यात उल्लेखनीय कामगिरी केली. जिल्हा उपनिबंधक पदाच्या इतिहासात सर्वाधिक सावकारी प्रकरणे निकाली काढण्याची नोंद त्यांच्या नावावर असल्याचे सांगितले जाते.



सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूर जनता सहकारी बँकेच्या निवडणुकीत त्यांनी प्रभावी जबाबदारी सांभाळली होती. किरण गायकवाड यांच्या बदलीमुळे रिक्त झालेल्या सोलापूर जिल्हा उपनिबंधक पदावर कोणाची नियुक्ती होणार, याकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# आमच्या घराजवळ तक्रार करु नका म्हटल्याने मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जुलै-**

आमच्या घराजवळ तक्रार करू नका म्हटल्याच्या कारणावरून एका महिलेसह दोघा जणांना काठी व लाथाबुक्क्याने मारहाण करण्यात आल्याची घटना मुळेगाव रोडवरील क्षिरालिंग नगर येथे घडली. शशिकला अरविंद कांबळे (वय-५०), विकास तानाजी गायकवाड (वय-२७, दोघेही रा.क्षिरालिंग नगर, सोलापूर) असे मारहाण झालेल्यांची नावे आहेत. गुरुवारी पहाटे राहत्या घराजवळ तक्रार चालू असताना आमच्या घराजवळ तक्रार करु नका असे ते म्हणाले होते. तेव्हा तुम्हाला काय करायचे आहे? असे म्हणत अज्ञात पाच-सहा जणांनी मिळून मारहाण केली. त्यामुळे ते दोघे उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल झाले. दरम्यान, किरकोळ वादावादीतून हाणामारीपर्यंत प्रकार दिवसागणिक वाढत आहेत.

# 'स्मार्ट मीटर'मुळे येणाऱ्या वाढीव वीज बिलाकडे आ. देवेंद्र कोठे यांनी वेधले शासनाचे लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जुलै-**

सोलापूर शहरातील नागरिकांना वीज पुरवठ्यासाठी बसविण्यात येणाऱ्या स्मार्ट मीटरमुळे अनेकांचे वीज बील दुप्पट-तिप्पट येत आहे. याकडे आमदार देवेंद्र कोठे यांनी गुरुवारी सभागृहात शासनाचे लक्ष वेधत यातील तांत्रिक चुका दुरुस्त करण्याची मागणी केली. दरम्यान, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमधील कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासनाच्या सेवेत कायम करावे, अशी मागणीही त्यांनी केली.

अनेक ठिकाणी हे स्मार्ट मीटर सक्तीने



बसवण्यात येत असल्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. अनेक नागरिकांना घर भाड्याच्या दुपटीने, तिपटीने वीज बिल आले आहे. या सर्व संभ्रमाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य वीज वितरण महामंडळाने सविस्तर स्पष्टीकरण द्यावे. स्मार्ट मीटरमध्ये तांत्रिक चुका असल्यास सरकारने हे स्मार्ट मीटर सक्तीने बसविण्यास स्थगिती द्यावी, असेही ते म्हणाले.

मनपा रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टर्स, अंगणवाडी मदतनीसांचे प्रश्न, अतिरिक्त हृदयरोग रुग्णवाहिकेची मागणी, सार्वजनिक आरोग्य परिचारकांचा प्रश्न, सोलापूर शहराची १ हजार ४०० कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना, ई बस सेवा, सोलापूर महानगरपालिकेचा जलशुध्दीकरण प्रकल्प अशा अनेक प्रश्नांवरही त्यांनी आवाज उठवला आहे. यावरुन जनहिताच्या प्रश्नांविषयी आ.देवेंद्र कोठे यांची मागण्यांची मालिका दिसून येत आहे.

# अवंतीनगर पुलाजवळील नालेसफाई अर्धवट; परिसरातील नगरांमध्ये पाणी शिरण्याची भीती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जुलै-**

अवंतीनगर पुल परिसरातील नालेसफाईची कामे अपूर्ण असल्याचे समोर आले. नाल्याचे खोलीकरण, रुंदीकरण आणि झाडी-झुडपांची सफाई प्रभावीपणे न झाल्याने यंदाच्या पावसाळ्यात परिसरातील विविध नगरांत पाणी शिरण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीदरम्यान हिप्परगा तलाव ओव्हरफ्लो झाल्यानंतर सांडव्यातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात आले होते. त्यामुळे शेळगी नाल्यातील पाण्याचा प्रवाह वाढून कारंबा नाका, जुना पुणा नाका ते सहा व १४ कमानीपर्यंत नाल्याला पूर आला होता.

परिणामी मडकी वस्ती, गणेशनगर, वसंत विहार-३, आळळे नगर, आर्यनंदी नगर, यशनगर भाग-२ यांसह अनेक भागांमध्ये पाणी शिरले होते. रस्ते जलमय झाले होते, तर यशनगरातील काही घरांमध्येही पाणी घुसल्याने नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले होते.

अवंती पुलाच्या उजव्या बाजूला अवंतीनगरच्या समांतर असलेल्या नाल्याची सफाई, खोलीकरण आणि रुंदीकरण तुलनेने व्यवस्थित करण्यात आले आहे. मात्र पुलाच्या डाव्या बाजूला स्पर्श हॉस्पिटललगतच्या नाल्याचे खोलीकरण, रुंदीकरण आणि सफाई अपुरी राहिल्याचे दिसून येते.

याठिकाणी मोठ्या प्रमाणात झाडी-झुडपे वाढलेली असून, पुलाखाली केवळ सुमारे २५ टक्के जागेतूनच पाण्याचा प्रवाह होऊ शकतो. उर्वरित भाग



विविध अडथळ्यांनी व्यापलेला असल्याने पाण्याचा निचरा सुरळीत होत नाही.

मान्सूनपूर्व कामांच्या नावाखाली काही प्रमाणात गाळ काढण्यात आला असला, तरी तो नाल्याच्या कडेलाच टाकून ठेवण्यात आला आहे. नालेसफाईची कामे थातूरमातूर पद्धतीने झाल्याचे स्पष्ट होत असल्याची टीका नागरिकांकडून होत आहे.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर अवंतीनगर पुलाच्या दोन्ही बाजूंच्या नाल्यांची संपूर्ण सफाई, खोलीकरण, रुंदीकरण, झाडी-झुडपे हटविण्याची तातडीची आवश्यकता आहे. महापौर विनायक कोंड्याल आणि महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी याकडे तातडीने लक्ष देऊन संबंधित यंत्रणेला आवश्यक निर्देश द्यावेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# सभापती चेतनसिंह सावंत ॲक्शन मोडवर

### कासेगावात होणाऱ्या बैठकीकडे लागले लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जुलै-**

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर आरोग्य व्यवस्थेची तयारी तपासण्यासाठी सोलापूर जिल्हा परिषदेच्या शिक्षण व आरोग्य समितीने कंबर कसली असून, कासेगाव येथे होणारी आरोग्य विभागाच्या विषय समितीची बैठक यंदा विशेष महत्त्वाची ठरणार आहे. वारी काळात लाखो भाविकांच्या आरोग्य सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक नियोजन, औषधांचा पुरेसा साठा आणि ग्रामीण आरोग्य केंद्रांतील सुविधांचा सखोल आढावा या बैठकीत घेतला जाणार आहे.

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर प्रत्यक्ष परिस्थिती लक्षात घेऊन ही बैठक कासेगाव येथे आयोजित करण्यात आली आहे. बैठकीत औषध खरेदी प्रक्रिया, प्राथमिक आरोग्य केंद्रांना पुरविण्यात आलेल्या औषधांचा साठा, वैद्यकीय साहित्य, मनुष्यबळाची उपलब्धता तसेच मागील बैठकीतील निर्णयांच्या अंमलबजावणीचा तपशीलवार आढावा घेतला जाणार असल्याचे शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी सांगितले



सभापती सावंत यांनी आरोग्य विभागाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. आषाढी वारीसारखा मोठा धार्मिक सोहळा तोंडावर असतानाही आवश्यक औषध खरेदी वेळेत पूर्ण न होणे ही गंभीर बाब असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. टेंडर प्रक्रिया वेळेत पूर्ण न झाल्याने आरोग्य सेवांवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाल्याचीही त्यांनी खंत व्यक्त केली. आरोग्य यंत्रणेतील नियोजनातील त्रुटी, विलंब आणि निष्काळजीपणाबाबत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून समाधानकारक स्पष्टीकरण न मिळाल्यास कडक कारवाईची शिफारस करण्यात येईल, असे संकेतही सभापतींनी दिले आहेत. त्यामुळे बैठकीपुर्वीच आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

# विषय समित्यांमध्ये गुणवत्तेला प्राधान्य, नवख्या नगरसेवकांनाही संधी : सभागृह नेते काळे

### समान संधी देण्याची भूमिका : महापौर कोंड्याल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जुलै-**

सोलापूर महापालिकेच्या विषय समित्यांच्या सभापती उमेदवार निवडीची प्रक्रिया ही पक्षातील सर्व पदाधिकारी, महापौर, शहराध्यक्ष आणि कॅबिनेट सदस्यांना विश्वासात घेऊन सामूहिक निर्णयातून पार पडली आहे. गुणवत्तापूर्ण काम करणाऱ्यांना व नवख्या नगरसेवकांना संधी देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे, अशी माहिती महापालिका सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी दिली.

सभापती निवडीत मध्य आणि दक्षिण भागाला अधिक प्रतिनिधित्व मिळाल्यासंबंधी बोलताना ते म्हणाले, शहर उत्तर भागातील नगरसेवकांनाही प्रतिनिधित्व देण्यात आले. सातच विषय समित्या असल्याने मर्यादित संधी उपलब्ध असल्याचेही त्यांनी सांगितले. दरम्यान, सभागृह नेते म्हणून निवड प्रक्रियेत स्वतःचा प्रभाव असल्याचा होत असलेला आरोप त्यांनी फेटाळून लावला.

या निवडीविषयी बोलताना महापौर विनायक कोंड्याल यांनी सांगितले की, सर्व सदस्यांना समान संधी देण्याच्या भूमिकेतून उमेदवारांची निवड करण्यात आली. अपर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सात समित्यांच्या सभापतीपदाची निवडणूक होणार असून, त्यानंतर अधिकृतपणे सभापतींची घोषणा करण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

# जि.प.च्या वतीने सोशल मीडिया कंटेंट क्रिएटर स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ जुलै-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या विकासकामांची, नाविन्यपूर्ण उपक्रमांची आणि यशोगाथांची प्रभावी मांडणी समाजमाध्यमांद्वारे व्यापक जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्हा परिषदेने 'सोशल मीडिया कंटेंट क्रिएटर स्पर्धा' आयोजित केली आहे, अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी दिली.

या स्पर्धेत प्रथम क्रमांकासाठी १० हजार, द्वितीय क्रमांकासाठी ७ हजार आणि तृतीय क्रमांकासाठी ५ हजार अशी आकर्षक रोख पारितोषिके दिली जाणार आहेत. इच्छुकांनी १० जुलै पर्यंत नोंदणी करावी. नोंदणी करताना आपली रिल किंवा व्हिडिओ ऑनलाइन अपलोड करणे




आवश्यक आहे. सुदृढ माता-सुदृढ बालक : प्राथमिक आरोग्य केंद्रे, अंगणवाडी, लसीकरण आणि पोषण विषयक यशोगाथा. प्रेरणादायी शासकीय शाळा: उपक्रम, स्मार्ट वर्गखोल्या आणि विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी. बचत गटांमधून महिलांचे नेतृत्व:महिला उद्योजकता, स्वयंसहाय्यता बचत गट आणि यशोगाथा. स्वच्छ, हरित व सहभागी गाव:स्वच्छता, वृक्षारोपण, जलसंधारण आणि ग्रामविकास उपक्रम असे विषय राहणार आहेत, असेही त्यांनी सांगितले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## दिव्यांगासाठी पंडीत दीनदयाल उपाध्याय विशेष रोजगार मेळावा

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २ जुलै : लातूर येथील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर आणि हरंगुळ (बु.) येथील संवेदना दिव्यांग औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग उमेदवारांसाठी पंडित दीनदयाल उपाध्याय विशेष रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा ४ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता लक्ष्मी नगर, बरड वस्ती, हरंगुळ (बु.), ता. जि. लातूर येथील संवेदना दिव्यांग औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत होणार आहे. या रोजगार मेळाव्यात लातूर येथील साईबाबा जनता सहकारी बँक लि., ऑटोमोटिव्ह मॅन्युफॅक्चर प्रा. लि., सुजया एंटरप्रायझेस (जया ह्युंदाई), अजय फार्म मेकॅनायझेशन, राजयोग बजाज, राजयोग ऑटो प्रा. लि., राजयोग मोटर्स एलएलपी, राजर्षी फाउंडेशन, जबिल सर्किट इंडिया प्रा. लि. आणि बधिरा गारमेंट या नामांकित आस्थापना प्रामुख्याने सहभागी होणार आहेत. या विविध आस्थापनांमध्ये १८ ते ३५ वर्षे वयोगटातील दिव्यांग उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध असणार आहेत. यासाठी उमेदवारांची शैक्षणिक पात्रता १२ वी, कोणतीही पदवी, डिप्लोमा तसेच आय.टी.आय.च्या इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक, इलेक्ट्रिशियन, ड्रेस मेकिंग आणि कॉम्प्युटर ऑपरेटर अँड प्रोग्रामिंग असिस्टंट या ट्रेड्सची असणे आवश्यक आहे. इच्छुक आणि पात्र दिव्यांग उमेदवारांनी ४ जुलै रोजी सकाळी १०:०० वाजता थेट मुलाखतीसाठी आवश्यक शैक्षणिक पात्रतेचे गुणपत्रक, प्रमाणपत्र, दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र, शैक्षणिक बायोडाटा आणि पासपोर्ट साईज फोटो यांच्या प्रत्येकी पाच प्रती (झेरॉक्स) सोबत घेऊन मेळाव्याच्या ठिकाणी उपस्थित राहावे.



## विविध वृत्त...

### माऊली संगीत विद्यालयास विशारद अभ्यासक्रमाची मान्यता



तभा वृत्तसेवा

औसा दि.२ जुलै : अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ मुंबईशी सलग्न असलेल्या औसा येथील माऊली संगीत विद्यालयास२०२६ या शैक्षणिक वर्षापासून गांधर्व महाविद्यालय मंडळ मुंबईच्या वतीने संगीत विशारद पूर्ण अभ्यासक्रमाची मान्यता मिळाली आहे.यामुळे औसा परिसरातल्या संगीत विशारद परीक्षेसाठी प्रवेश घेणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांची सोय झाली आहे.

गेल्या वीस वर्षापासून औसा येथे माऊली संगीत विद्यालय कार्यरत असून शिवचरण स्वामी, चैतन्य पांचाळ आणि शिवरुद्र स्वामी त्यांच्या शिकवणीतून प्रारंभिक ते विशारद वर्गापर्यंत दर वर्षी शेकडो विद्यार्थी शास्त्रीय गायन, वादनाची कला अवगत करीत आहेत.

माऊली संगीत विद्यालयाच्या वतीने पं. भातखंडे संगीत समारोहासह वर्षभर विविध प्रकारचे चार संगीत कार्यक्रम आयोजित केले जातात असे माऊली प्रतिष्ठानचे अध्यक्ष पं. शिवरुद्र स्वामी यांनी सांगितले.

## १ लाख ९८ हजार वाहनांवर होणार कारवाई



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २ जुलै : १ एप्रिल २०१९ पूर्वीच्या वाहनांना एचएसआरपी म्हणजेच हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसवण्याची मुदत दि. ३० जून २०२६ रोजी संपली. मात्र जिल्ह्यातील अद्यापही १ लाख ९८ हजार ४३३ वाहनधारकांनी एचएसआरपी नंबर प्लेट नाही. ही वाहने आरटीओंच्या रडारवर आली असून एचएसआरपी नंबर प्लेट न बसवलेल्या वाहनांवर कारवाई होणार आहे. एचएसआरपी म्हणजेच हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसवण्याची मुदत संपल्याने थेट दंडात्मक कारवाईला सुरुवात झाली आहे. लातूर प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या आकडेवारीनुसार, क्षेत्रात १ एप्रिल २०१९ पूर्वीची एकूण ३ लाख ३८ हजार २१९ वाहने आहेत. यापैकी फक्त १ लाख ३९ हजार ८६६ वाहनांनीच प्रत्यक्षात ही हाय सिक्युरिटी प्लेट बसवली आहे, तर २२ हजार ३ वाहनधारकांनी केवळ बुकिंग केले आहे. पण धक्कादायक बाब म्हणजे, तब्बल १ लाख ९८ हजार ४३३ वाहनधारकांनी अजूनही कोणतीही प्रक्रिया केलेली नाही. या सर्व वाहनांवर आता आरटीओचा दंडाचा बडगा उगारला जाणार आहे.

दंडात्मक कारवाई करण्यासाठी आरटीओ विभागाच्या वतीने विशेष पथकेदेखील तयार केली आहेत.

## लातूर शहर मनपाचा कारभार रामभरोसे !

### नागरी दलितेतर वस्ती सुधार योजनेची संचिकाच बेपत्ता?



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २ जुलै : लातूर शहर महानगरपालिके तसध्याचाकारभार जणू ' रामभरोसे' चालू आहे. सामान्य नागरिकांनीएखादी माहिती विचारल्यास त्याला वेळेत उत्तर न देणे आपण समजू शकतो. मात्र, विद्यमान नगरसेवकांनी माहिती विचारल्यास चक्क त्यांना ' संचिकाच' उपलब्ध नसल्याचे उत्तर दिले जाते, ही बाब अतिशय गंभीर नव्हे काय ?

सन २०२४-२५ अंतर्गत राबविण्यात आलेल्यानागरी दलितेतर वस्ती सुधार योजनाअंतर्गत झालेल्या विकास कामांची संपूर्ण संचिका (फाईल) उपलब्ध करून देण्याची मागणी नगरसेवक गणेश गवारे यांनी महापालिका आयुक्तांकडे केली होती. मात्र, संबंधित संचिका मिळून येत नाही असे लेखी उत्तर महापालिका प्रशासनाने दिल्याने प्रशासनाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सार्वजनिक निधीतून कोट्यवधी रुपयांची विकासकामे होत असताना त्यासंबंधीची मूळ संचिकाच उपलब्ध नसल्याचे उत्तर देणे धक्कादायक असल्याची प्रतिक्रिया नगरसेवक गणेश गवारे यांनी व्यक्त केली आहे. संबंधित संचिकेमध्ये प्रशासकीय मंजुरी, अंदाजपत्रके, कार्यादेश, मोजमाप पुस्तिका, देयकांची माहिती आणि इतर महत्त्वाची कागदपत्रे असणे अपेक्षित असते. अशा परिस्थितीत संचिकाच उपलब्ध नसल्याने विकास कामांच्या पारदर्शकतेबाबत संशय निर्माण होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.महापालिकेच्या दप्तर व्यवस्थापनातील हा गंभीर प्रकार असल्याची चर्चा शहरात सुरू असून, सार्वजनिक निधीशी संबंधित महत्त्वाच्या नोंदीच उपलब्ध नसल्याने नागरिकांमध्येही नाराजी व्यक्त होत आहे. या प्रकरणावर महापालिका प्रशासन काय भूमिका घेते आणि संचिका शोधून काढण्यासाठी कोणती पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.या प्रकाराची सखोल चौकशी करून संचिका नेमकी कोठे आणि कशी गायब झाली, याची जबाबदारी निश्र्चित करावी. तसेच दोषींवर कठोर कारवाई करून संबंधित संचिका तातडीने उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी गणेश गवारे यांनी केली आहे. लातूर शहर मनपा प्रशासनाचा कारभार किती ढिसाळ आहे, हे एकंदर या प्रकारावरून लक्षात येते. केवळ एका विषायची माहिती विचारली असती संचिका उपलब्ध नसल्याचे सांगितले जाते. मनपा कार्यालयातून अशा किती संचिका गायब झाल्या आहेत ? याचाही नजीकच्या काळात एक लोकप्रतिनिधी म्हणून आपण चौकशी करणार असल्याचे गवारे यांनी सांगितले. सदर संचिका गायब प्रकरण तात्काळ निकाली नाही नकाढले गेल्यास आपण तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशाराही गणेश गवारे यांनी दिला आहे.

## हरितक्रांतीमुळे देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण

### आता विषमुक्त अन्ननिर्मितीला प्राधान्य द्या : डॉ. अनिल भिकाणे



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २ जुलै : हरितक्रांतीमुळे भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला असून आता सुरक्षित व विषमुक्त अन्ननिर्मितीला सर्वोच्च प्राधान्य देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध पशुवैद्यकीय तज्ज्ञ, शास्त्रज्ञ तथा महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरचे माजी विस्तार शिक्षण संचालक डॉ. अनिल भिकाणे यांनी केले. ते श्री छत्रपती शाहू महाराज सैनिकी विद्यालयात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरितक्रांतीचे शिल्पकार वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कृषी दिन कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य वसंत कुलकर्णी होते. व्यासपीठावर विभागप्रमुख संतोष चामले, विलास शिंदे, प्रा. प्रदीप कोठारे तसेच एनसीसी प्रमुख डॉ. बालाजी मुस्कावाड उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात रोजगार हमी योजना व पंचायत राज व्यवस्थेचे जनक, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

मार्गदर्शन करताना डॉ. भिकाणे म्हणाले की, सुधारित बियाण्यांचा वापर, रासायनिक खतांचा समतोल वापर, जलसंधारणाच्या सुविधांची निर्मिती तसेच विज्ञान व आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार यामुळे देशात हरितक्रांती घडून आली. परिणामी कृषी उत्पादनात मोठी वाढ होऊन भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनला आणि देशाला अन्नसुरक्षा प्राप्त झाली.

ते पुढे म्हणाले की, वाढत्या रासायनिक खतांच्या वापरामुळे जमिनीचा पोत व सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी शेणखतासह सेंद्रिय खतांचा वापर वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी शेतीबरोबर पशुसंगोपन हा अविभाज्य घटक असून शेती व पशुपालन यांचा समन्वय साधणे ही काळाची गरज आहे. भविष्यात सुरक्षित व विषमुक्त अन्ननिर्मितीसाठी सेंद्रिय शेतीला अधिक प्राधान्य द्यावे लागेल, असेही त्यांनी सांगितले.

कमी मनुष्यबळ, कमी श्रम आणि कमी खर्चात अधिक उत्पादन मिळविण्यासाठी शेती व पशुसंगोपन क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान, यांत्रिकीकरण, अचूक कृषी पद्धती तसेच डिजिटल तंत्रज्ञानाचा व्यापक वापर करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

कृषी दिनानिमित्त विद्यालय परिसरात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमाची तयारी मैनोद्दीन सय्यद यांनी केली.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य वसंत कुलकर्णी यांनी वसंतराव नाईक यांच्या कृषी विकासातील दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाचा गौरव करताना शेतीबरोबरच दुग्ध व्यवसायाला चालना देऊन ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिल्याचे सांगितले.

प्रमुख पाहुण्यांचा परिचय व सूत्रसंचालन डॉ. बालाजी मुस्कावाड यांनी केले, तर आभार प्रल्हाद येवरीकर यांनी मानले.

## शाळा गुणवत्तापुर्ण व्हाव्यात : धर्मराज काळमाते




तभा वृत्तसेवा

औसा दि.२ जुलै : कोणत्याही स्तरातील प्रश्न कार्यालयात शिल्लक राहणार नसून शिक्षकांना कामासाठी कार्यालयात येण्याची गरज पडणार नाही.शाळा गुणवत्तापूर्ण व्हाव्यात यासाठी शिक्षकांनी अधिक मेहनत घ्यावी.असे आवाहन गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळ्याचे यांनी केले.

औसा पंचायत समितीचे नुतन गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते यांचा औसा शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.त्यावेळी ते बोलत होते. चेअरमन महादेव खिचडे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. कळंब शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन तथा महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष बाळकृष्ण तांबारे, कळंब पं. स.चे माजी प्र.ग.शि.अ. तथा शिक्षण विस्तार अधिकारी भारती, कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुभाष मस्के, राष्ट्रीय मूलनिवासी शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष जे. जे. गायकवाड, जिल्हा सचिव रविकांत शिरसाठ, औसा शिक्षक संघाचे नेते निळकंठ हेंबाडे, तालुकाध्यक्ष व्यंकट काकडे आदी उपस्थित होते.

जि.प.लातूरचे शिक्षणाधिकारी (प्रा.) प्रमोद पवार, पं.स.औसाचे गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते, तसेच केंद्रप्रमुख श्याम क्षीरसागर (केंद्र-भेटा), नितीन गंभीरे (केंद्र-सेलू), मुरलीधर शिंदे (केंद्र-किल्लारी), रामकृष्ण घोडके (केंद्र-खरोसा), दत्तात्रय बेद्रे (केंद्र-शिवली), प्रल्हाद सूर्यवंशी (केंद्र-लोदगा), राहुल तिडके (पं.स.लातूर), दत्तात्रय यादव (पं.स.निलंगा), नागेश लोहारे (पं.स.रेणापुर) व उपस्थित मान्यवरांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

संस्थेचे सचिव संजय जगताप यांनी संस्थेचा आर्थिक लेखाजोखा, गेल्या काही वर्षांत राबविण्यात आलेले विविध नाविन्यपूर्ण उपक्रम, सभासदांसाठी उपलब्ध करून दिलेल्या सेवा-सुविधा यांची सविस्तर माहिती देवून म. रा. प्रा. शिक्षक संघ औसाच्या वतीने गटशिक्षणाधिकारी यांना तालुक्यातील शिक्षकांचे प्रश्न व समस्या मांडून संक्षिप्तपणे प्रास्ताविकातून स्मरण करून दिले.तर अध्यक्षीय भाषणात चेअरमन तथा शिक्षक संघाचे तालुकाध्यक्ष महादेव खिचडे यांनी तालुका व जिल्हास्तरावरील अनेक प्रलंबित प्रश्न, समायोजन, चटोपाध्याय वरिष्ठ वेतनश्रेणी, निवडश्रेणी याबाबतीत यावेळी चर्चा घडवून आणली व संघटनेच्या अपेक्षा माननीय गटशिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी यांच्या समोर व्यक्त केल्या.

संजय रोडगे यांनी सुत्रसंचालन केले, तर व्हाईस चेअरमन हरीश आयतनबोने यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास पतसंस्थेचे सभासद, शिक्षक व शिक्षणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे संचालक युसुफ पिरजादे, रमेश जाधव, धीरजकुमार रुकमे, महेश कांबळे, दीपक डोंगरे तसेच सर्व संचालक मंडळ व कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला होता.

## लातूर पोलिसांकडून १७१ मोबाईल नागरिकांना परत

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २ जुलै : लातूर जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस ठाण्याने हरवलेल्या मोबाईलचा तांत्रिक पद्धतीने शोध घेऊन ते शक्य तितक्या लवकर मूळ मालकांच्या ताब्यात द्यावेत, अशा स्पष्ट सूचना पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी जिल्हा सायबर सेल, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली

जिल्हा सायबर सेल व सर्व पोलीस ठाण्यांनी अत्याधुनिक तांत्रिक प्रणाली, सीईआयआर पोर्टल तसेच विविध तांत्रिक साधनांचा प्रभावी वापर करून हरवलेल्या मोबाईलचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम राबविली. या मोहिमे अंतर्गत लातूरसहित इतर जिल्ह्यातून एकूण १७१ हरवलेले मोबाईल शोधण्यात लातूर पोलिसांना यश आले. त्यानंतर आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून दि. ३० जून रोजी पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या हस्ते मुळ मालकांना परत करण्यात आले.

लातूरसहित इतर जिल्ह्यातून एकूण १७१ हरवलेले मोबाईल शोधण्यात येऊन ते मुळ मालकांना परत करण्यात आले.

## महाराष्ट्र कृषी दीन,वसंतराव नाईक जयंती आनंदवाडी येथे साजरी



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २ जुलै : ग्रामपंचायत कार्यालय आनंदवाडी येथे महाराष्ट्र कृषी दिन व हरीत क्रांतीचे प्रणेते महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती प्रतिमेचे पूजन करून साजरी करण्यात आली. आपला अन्नदाता शेतकरी हाच देशाचा खरा भाग्यविधाता आहे अशा सर्व शेतकरी व महिला शेतकरी बंधु भगिनींना महाराष्ट्र कृषी दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

कृषी दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद शाळेत वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी सरपंच भागवत वंगे, कृषि विभागाच्या सहाय्यक कृषी अधिकारी वर्षा भोग मॅडम, ग्रामविकास अधिकारी संजय रोडेवाड, अन्नदाता शेतकरी गटाचे अध्यक्ष हरिश्र्चंद्र कोले, वि.वि.का.सोसायटीचे संचालक मुरलीधर दिवेकर, जि. प. शाळेचे मुख्याध्यापक बालाजी शिंदे सर, सहशिक्षक दत्तात्र्यय घटकार सर, शालेय समितीचे अध्यक्ष दत्तात्रय आर्धे ,महिला बचत गटाच्या प्रमुख अनूसया शिरूरे, रंजित मरे, राम बनसोडे, मधूकर शिरूरे, संगिता कोले, लता कोले, नंदा वेंजने, सुवर्णा आर्धे , अनिता कोरेवाड, विद्याबाई शिरूरे , शाळेतील विद्यार्थी व गावातील नागरिक महिला उपस्थित होते.

## परिवहन सभापतींकडून मनपा सिटी बस सुरक्षिततेची पाहणी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २ जुलै : लातूर शहर महानगरपालिकेच्या परिवहन विभागाच्या वतीने शहरात सिटीबस चालवली जाते. परिवहन समितीचे सभापती फैसलखान कायमखानी यांनी दि. १ जुलै रोजी शहरात फे रफटका मारुन अचानक सीटी बसच्या सुरक्षिततेची पाहणी केली.

या पाहणी दरम्यान सीटी बसमध्ये गंभीर तांत्रिक बाबी आढळून आल्या आहेत. आपत्कालीन दरवाजा उघडत नाही, सिटी बसमध्ये प्राथमिक उपचार पेटी उपलब्ध नाही, फायर सिस्टीम उपलब्ध नाही, तसेच चालक आणि वाहकासाठी ड्रेस कोड नाही, अशा अनेक गंभीर बाबी समोर आल्या असून प्रवाश्यांची सुरक्षा वाऱ्यावर असल्याचे समोर आले आले आ-हे. त्यामुळे संबंधित कंपनीवर कारवाईचे आदेश परिवहन सभापती फैजलखान कायमखानी यांनी दिले आहेत.

## रुग्णसेवेचा वसा जपणाऱ्या डॉक्टरांचा डॉक्टर दिनी गौरव

### वलांडीत सामाजिक बांधिलकीचा उपक्रम; सेवाभावी वैद्यकीय अधिकाऱ्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान



तभा वृत्तसेवा

वलांडी दि. २ जुलै : राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त वलांडी येथे अविरत रुग्णसेवा करणाऱ्या डॉक्टरांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते अरुण भगवानराव पाटील व मोहसीन पटेल यांच्या पुढाकारातून विशेष सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील डॉक्टरांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

आरोग्यसेवा ही समाजासाठी सर्वांत महत्त्वाची सेवा मानली जाते. दिवस-रात्र रुग्णांच्या सेवेसाठी तत्पर असलेल्या डॉक्टरांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमात डॉ. उमाकांत शिंदे, डॉ. विलास गरड, डॉ. प्रल्हाद भारती, डॉ. पंडित गुंजर्गे, डॉ. विद्यासागर बिरादार, डॉ. जावेद सय्यद, डॉ. खंडू होणाळे, डॉ. डी. जी. बिरादार , डॉ.बंटी बनसोडे तसेच वलांडी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. आरती गुरुडे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉक्टरांनी समाजासाठी दिलेले योगदान अमूल्य असल्याचे सांगत त्यांच्या निस्वार्थ सेवाभावाचे कौतुक केले. भविष्यातही अशीच निरंतर व समर्पित रुग्णसेवा सुरू राहावी, अशा शुभेच्छाही व्यक्त करण्यात आल्या.

राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त आयोजित या उपक्रमातून आरोग्यसेवेत योगदान देणाऱ्या डॉक्टरांप्रती समाजाची कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. सेवाभावी डॉक्टरांचा सन्मान करून त्यांच्या कार्याला सलाम करण्यात आला. या कार्यक्रमाला अरुण भगवानराव पाटील, मोहसीन पटेल, सुशांत साबणे, गणेश चवाळे, बबलू सय्यद, निलेश गायकवाड आणि असलम तांबोळी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पुढाकार घेतला.

# सिडको नवनगर प्रकल्पाची रखडलेली भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करुन तातडीने प्रकल्पाचे काम हाती घ्या

## अ.अर्जुनराव खोतकर यांची विधानसभेत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे आग्रही मागणी

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरासाठी प्रस्तावित असलेल्या खरपुडी येथील सिडको नवनगर प्रकल्पाची रखडलेली भूसंपादन प्रक्रिया तातडीने पूर्ण करून प्रकल्पाला गती द्यावी, अशी आग्रही मागणी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी गुरुवारी विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली.

सभागृहात बोलताना आमदार खोतकर यांनी सांगितले की, जालना शहरातील सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने खरपुडी येथे सुमारे २८७ हेक्टर क्षेत्रावर सिडको नवनगर प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला होता. याबाबत ७ फेब्रुवारी २०२३ रोजी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली असून त्यानंतर काही जमिनींचे संपादनही करण्यात आले आहे.

या प्रकल्पासाठी १२० हेक्टर जमिनीचा अवॉर्ड मंजूर झाला असून त्यापैकी ७३.६५ हेक्टर जमिनीची संपादन प्रक्रिया पूर्ण झाली आहे. मात्र उर्वरित ४७.९० हेक्टर जमिनीची संपादन प्रक्रिया अद्याप प्रलंबित आहे. तसेच सुमारे १२६ हेक्टर क्षेत्रासाठी मूल्यांकन व अवॉर्डची प्रक्रिया देखील रखडलेली असल्याने संपूर्ण प्रकल्प विलंबित झाला आहे, असे त्यांनी निदर्शनास आणून दिले.गेल्या तीन ते चार वर्षांपासून प्रकल्प रखडल्यामुळे संबंधित परिसरातील शेतकरी मोठ्या मानसिक तणावाखाली असून त्यांच्या जमिनींवर कोणतेही विकासकाम,व उत्पन्न करता येत नाही. त्यामुळे उर्वरित भूसंपादन, मूल्यांकन व अवॉर्डची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून पात्र शेतकऱ्यांना मोबदला त्वरित वितरित करावा, अशी मागणी आमदार खोतकर यांनी केली. तसेच प्रकल्पाच्या कामाला तातडीने सुरुवात करण्याचीही त्यांनी आग्रही मागणी केली.



» यावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे यांनी जालना शहराच्या विकासासाठी खरपुडी सिडको नवनगर प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगितले. सध्या सिडको प्रशासनाकडून सुरू असलेली प्रक्रिया अत्यंत संथ गतीने होत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली असून प्रकल्पाला गती देण्यासाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना देण्यात येतील. भूसंपादनाची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून सिडको नवनगर प्रकल्पाचे काम तातडीने सुरू करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी सभागृहात दिले.



## कालिका स्टील अलॉयज ठरले मराठवाड्यातील अग्रणी करदाते; जीएसटी विभागाकडून गौरव

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

केंद्रीय वस्तू व सेवा कर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने ९व्या ऋद्ध वर्धापन दिना निमित्त आयोजित कार्यक्रमात मराठवाडा विभागातील अग्रणी करदाता म्हणून मे. कालिका स्टील अलॉयज प्रा. लि. या कंपनीचा गौरव करण्यात आला.

आर्थिक वर्ष सन २०२५–२६ मध्ये उत्कृष्ट कर अनुपालन व योगदानाबद्दल कंपनीचे संचालक श्री. घनश्यामदासजी गोयल यांचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. हा सन्मान विभागीय आयुक्त मा. श्री. प्रदीप गुरुमूर्थी, अतिरिक्त आयुक्त मा. श्री. राजकुमार केंद्रे तसेच सह आयुक्त मा. श्री. रोहित निगवेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी कालिका स्टील अलॉयजच्या पारदर्शक व्यवहारांचे व वेळेवर कर भरण्याच्या शिस्तीचे कौतुक केले. श्री. गोयल यांनी ऋद्ध विभागाच्या सहकार्याबद्दल आभार मानले व भविष्यातही कर अनुपालनात अग्रेसर राहण्याची ग्वाही दिली.

## संक्षिप्त

### जिल्हाधिकारी कार्यालयात वसंतराव नाईक यांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

यावेळी उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, तुषार निकम, सतीश तायडे, दिपाली राऊत (वानखडे), शिल्पा मगरे,संपदा कुलकर्णी, प्रिती चौधरी, रीना नगरकर, ज्योती वाघ, स्वाती राठोड,अतुल केदार, डी.गोरे, आर.बी.कलगुंडे, एस के सहाने, सुनिल काळुंके व इतर तसेच प्रशासकीय इमारतीमधील विविध कार्यालयाचे अधिकारी–कर्मचारी यांची उपस्थिती होती.

### महानगरपालिका ते नीलम टॉकीज दरम्यान पुलाचे काम तातडीने करा

**शरद पवार गट राष्ट्रवादी युवक शहराध्यक्ष राजेंद्र जाधव यांची मागणी**



**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील महानगरपालिका ते नीलम टॉकीज, म्हसोबा मंदिरासमोरील पुलाची तातडीने दुरुस्ती व पुनर्बांधणी करण्यात यावी, तसेच लगतच्या नाल्याची साफसफाई करावी, अशी मागणी शरद पवार गट राष्ट्रवादी युवक शहराध्यक्ष राजेंद्र जाधव यांनी केली आहे.

मागील वर्षी झालेल्या मुसळधार पावसामुळे या परिसरातील अनेक दुकाने व व्यावसायिकांच्या आस्थापनांमध्ये पावसाचे पाणी शिरून मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले होते. मात्र, त्यानंतरही पुलाच्या दुरुस्तीचे काम रखडले असून संबंधित प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप राजेंद्र जाधव यांनी केला आहे. याशिवाय, पुलालगतच्या नाल्याची नियमित साफसफाई होत नसल्याने आगामी पावसाळ्यात पुन्हा पाणी तुंबून दुकानदारांना मोठ्या नुकसानाला सामोरे जावे लागू शकते. मागील वर्षी झालेल्या नुकसानीची भरपाईही अनेक दुकानदारांना अद्याप मिळालेली नसल्याचे त्यांनी नमूद केले. या संदर्भात अनेक वेळा महानगरपालिकेला निवेदने देऊनही कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रशासनाने तातडीने पुलाच्या दुरुस्तीचे काम हाती घेऊन नाल्याची साफसफाई करावी, अन्यथा नागरिकांच्या व व्यापाऱ्यांच्या हितासाठी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही राजेंद्र जाधव यांनी दिला आहे.

**लोकमत सरपंच अवॉर्ड २०२६ (विजव्यवस्थापन) ने**

## सरपंच गजानन सुनीलराव लोणीकर व ग्रामपंचायत लोणीचा राज्यस्तरीय गौरव

**तभा वृत्तसेवा**
**परतुर । प्रतिनिधी**

येथील यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रतिष्ठित लोकमत सरपंच अवॉर्ड २०२६ सोहळ्यात ग्रामपंचायत लोणीचे सरपंच श्री. गजानन सुनीलराव लोणीकर यांना 'विजव्यवस्थापन' या विभागातील राज्यस्तरीय लोकमत सरपंच अवॉर्ड प्रदान करून गौरविण्यात आले.

हा मानाचा पुरस्कार महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सौ. सुनेत्रा अजितदादा पवार, ग्रामविकास मंत्री श्री. जयकुमार गोरे, कृषी मंत्री श्री. दत्तामामा भरणे, गृह राज्यमंत्री श्री. योगेश कदम तसेच लोकमत परिवाराचे सर्वेसर्वा पद्मश्री श्री. विजयजी दर्डा आणि श्री. राजेंद्रजी दर्डा यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. ग्रामविकास, पारदर्शक प्रशासन, लोकसहभाग, स्वच्छता, विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी तसेच विकासकामांमध्ये केलेल्या उल्लेखनीय कार्याची राज्यस्तरावर दखल घेत ग्रामपंचायत लोणीला हा प्रतिष्ठेचा पुरस्कार बहाल करण्यात आला. यावेळी पुरस्कार स्वीकारल्यानंतर बोलताना सरपंच श्री. गजानन सुनीलराव लोणीकर म्हणाले, गावाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी माजी मंत्री तथा परतूर–मंठा मतदारसंघाचे आमदार श्री. बबनराव लोणीकर साहेब तसेच भाजप



प्रदेश सचिव मा. श्री. राहुल भैया लोणीकर साहेब यांचे सातत्याने मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या माध्यमातून ग्रामपंचायत लोणीसाठी भरीव विकासनिधी उपलब्ध झाला. त्यांच्या प्रेरणा, सहकार्य आणि ग्रामस्थांच्या विश्वासामुळेच मला हा प्रतिष्ठेचा 'लोकमत सरपंच अवॉर्ड २०२६' प्राप्त झाला असून, हा पुरस्कार माझा नसून संपूर्ण ग्रामपंचायत लोणी, ग्रामस्थ, ग्रामपंचायत सदस्य, अधिकारी व कर्मचाऱ्यांचा आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले. या राज्यस्तरीय सन्मानामुळे ग्रामपंचायत लोणीच्या कार्याचा गौरव संपूर्ण महाराष्ट्रात झाला असून, ग्रामस्थ, लोकप्रतिनिधी, अधिकारी तसेच विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी सरपंच श्री. गजानन सुनीलराव लोणीकर यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## काही लाडक्या बहिणी आनंदात, काही केवायसीच्या कचाट्यात! केवायसी त्रुटींमुळे लाडकी बहीण योजनेत हजारो महिला अडकल्या

**तभा वृत्तसेवा**
**पारध। प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत सुरुवातीला नियमित अनुदान मिळालेल्या अनेक महिलांचे हप्ते अचानक बंद झाल्याने राज्यभरात नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. महाराष्ट्रातील सुमारे ९८ लाख महिला विविध कारणांमुळे योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्याची चर्चा असून, भोकरदन तालुक्यातील पारध येथील अनेक महिलांनाही याचा फटका बसला आहे.

लाभार्थी महिलांच्या म्हणण्यानुसार, योजनेचे सुरुवातीचे पाच ते सहा हप्ते नियमितपणे त्यांच्या खात्यावर जमा झाले. मात्र त्यानंतर अचानक अनुदान येणे बंद झाले. चौकशी केली असता केवायसी अपूर्ण असल्याचे किंवा कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्याचे कारण सांगण्यात आले. यामुळे अनेक महिलांना वारंवार सीएससी केंद्र, सेतू सुविधा केंद्र आणि संबंधित कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. विशेष म्हणजे काही कुटुंबांमध्ये एकाच रेशनकार्डवर दोन महिलांना लाभ मिळत असताना, इतर अनेक महिलांचे लाभ विविध तांत्रिक कारणांमुळे बंद करण्यात आल्याची तक्रार आहे. त्यामुळे योजनेच्या निकषांबाबत संभ्रम आणि असंतोष वाढत आहे. सुरुवातीला सर्व पात्र महिलांना लाभ देण्याचा उद्देश असलेल्या योजनेत आता अटी–शर्ती अधिक कठोर होत असल्याची भावना महिलांमध्ये निर्माण झाली आहे. अनुदान बंद झालेल्या महिलांनी शासनाकडे तीव्र नाराजी व्यक्त करत, केवायसी प्रक्रिया पुन्हा सुरू करून प्रलंबित त्रुटी तत्काळ दूर करण्याची मागणी केली आहे. तसेच पात्र असूनही लाभापासून वंचित राहिलेल्या महिलांचे अर्ज पुन्हा तपासून त्यांचे थकीत व नियमित हप्ते त्वरित सुरू करण्यात यावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. भाग्यश्री तबडे यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले की,मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे सुरुवातीचे काही हप्ते मला नियमितपणे मिळाले होते. मात्र अचानक माझे अनुदान बंद झाले. चौकशी केल्यानंतर केवायसीमध्ये त्रुटी असल्याचे सांगण्यात आले. त्यासाठी मी अनेक वेळा घधउ आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली, तरीही आजपर्यंत अनुदान पुन्हा सुरू झालेले नाही. आमच्यासारख्या अनेक महिलांना या योजनेचा मोठा आधार होता. त्यामुळे शासनाने केवायसीतील त्रुटी तातडीने दूर करून बंद झालेल्या सर्व पात्र महिलांचे हप्ते पुन्हा सुरू करावेत. तसेच थकीत अनुदानही एकरकमी देण्यात यावे. शासनाने आमच्या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन न्याय द्यावा. राज्यातील लाखो महिलांसाठी आर्थिक आधार ठरलेली ही योजना अधिक पारदर्शक व सुलभ पद्धतीने राबवून कोणतीही पात्र महिला लाभापासून वंचित राहणार नाही याची काळजी शासनाने घ्यावी, अशी मागणी भोकरदन तालुक्यासह राज्यभरातील महिलांकडून होत आहे. शासनाने केवायसीसंदर्भातील अडचणी तातडीने दूर करून लाभार्थींना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील केवायसीची प्रक्रिया ज्या पात्र महिलांची प्रलंबित आहे, त्यांच्यासाठी बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय, पंचायत समिती यांनी तातडीने विशेष मोहीम राबवून सर्व त्रुटी दूर कराव्यात. केवळ तांत्रिक कारणांमुळे एकही पात्र महिला योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये. केवायसी पूर्ण करून बंद झालेले तसेच थकीत सर्व हप्ते त्वरित लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा करण्यात यावेत अशी मागणी सागर देशमुख यांनी केली आहे.

## मंठा तहसीलदारांच्या बदलीच्या मागणीला वेग!

### » उपविभागीय अधिकारी व विभागीय आयुक्तांनी मागविला अहवाल!

**तभा वृत्तसेवा**
**मंठा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना, जालना जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके यांनी मंठा तहसीलदार सौ. सुमन मोरे यांच्या बदलीची मागणी करत केलेल्या तक्रारीची गंभीर दखल प्रशासनाने घेतली आहे. या संदर्भात विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालय, परतूर यांनी संबंधित तक्रारीवर चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. मनसे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके यांनी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी जालना यांच्याकडे दिलेल्या निवेदनात मंठा तहसीलदार सौ. सुमन मोरे यांच्यावर यापूर्वी बदनापूर येथे तहसीलदार म्हणून कार्यरत असताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) सापळा रचून कारवाई केल्याचा उल्लेख केला होता. अशा परिस्थितीत त्यांना मंठा येथे नियमित तहसीलदार म्हणून नियुक्ती न देता जिल्हाधिकारी कार्यालयात साईड पोस्टिंग देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती.

या तक्रारीची दखल घेत विभागीय आयुक्त कार्यालयाने जिल्हाधिकारी जालना यांना तक्रार अर्जातील मुद्यांची चौकशी करून नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच उपविभागीय अधिकारी, परतूर यांनी मंठा तहसीलदार यांना नोटीस बजावत तक्रारीतील आरोपांबाबत आपली बाजू मांडून तात्काळ खुलासा सादर करण्यास सांगितले आहे. मात्र, प्रशासनाने चौकशीची प्रक्रिया सुरू केली असली तरी अद्याप तहसीलदारांची बदली करण्यात आलेली नाही. त्यामुळे संबंधित प्रकरणात प्रशासन कोणता निर्णय घेते, याकडे मंठा तालुक्यासह जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## रोटरी क्लब रेनबोची जालन्याची नूतन कार्यकारणी जाहिर

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**



मधुलता भक्कड – अध्यक्ष | डॉ. अतुल जिंतूरकर – सचिव | केतन शाह – कोषाध्यक्ष

रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोची नूतन कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून, अध्यक्षपदी मधुलता भक्कड, सचिवपदी डॉ. अतुल जिंतूरकर तर कोषाध्यक्षपदी केतन शाह यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. या नवनियुक्त कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा रविवार, दि. ५ जुलै रोजी सायंकाळी ६:३० वाजता हॉटेल सॅफ्रनमध्ये अत्यंत आयोजित करण्यात आला आहे.

या सोहळ्याला मुख्य अतिथी वक्ते म्हणून ठाण्याचे प्रख्यात बालरोग तज्ज्ञ डॉ. लक्ष्मीकांत कासट हे उपस्थित राहणार आहेत. प्रमुख अतिथी रोटरीचे सहाय्यक प्रांतपाल प्रतीक नानावटी हे नूतन पदाधिकाऱ्यांना पदभार सोपवतील. याप्रसंगी रोटरी परिवारातील सदस्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मावळत्या अध्यक्षा डॉ. प्रतिभा श्रीपत आणि मावळते सचिव पंकज लड्डा यांनी केले आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासा

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त जिल्ह्यांपैकी एक असलेल्या जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय म्हणून 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' कडे पाहिले जात आहे. सततची नापिकी, वाढता उत्पादन खर्च, अनियमित पाऊस, अवकाळी पावसाचे संकट आणि शेतीमालाच्या अस्थिर बाजारभावामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना या योजनेमुळे नवसंजीवनी मिळण्याची अपेक्षा आहे.

जालना जिल्ह्याची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवर आधारित आहे. जिल्ह्यात सोयाबीन, कापूस, मका, तूर, ज्वारी आदी प्रमुख पिकांची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. मात्र गेल्या काही वर्षांपासून बदलत्या हवामानाचा सर्वाधिक फटका या पिकांना बसत आहे. कधी दुष्काळ, तर कधी अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे उत्पादनात घट होत आहे. त्यातच बियाणे, खते, औषधे, मजुरी आणि सिंचनाचा वाढलेला खर्च यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले. परिणामी अनेक शेतकरी पीककर्जाची नियमित परतफेड करू शकले नाहीत. याच पार्श्वभूमीवर राज्य शासनाने जाहीर केलेली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ ही आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी महत्त्वाची संधी मानली जात आहे. या योजनेअंतर्गत शासनाने निश्चित केलेल्या निकषांनुसार पात्र शेतकऱ्यांच्या पीककर्जाची माफी अथवा कर्जातून दिलासा देण्यात येणार आहे. त्यामुळे थकीत कर्जाचा बोजा कमी होऊन शेतकऱ्यांना नव्या हंगामासाठी पुन्हा बँकांकडून कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

### जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना लाभाची अपेक्षा

जालना जिल्ह्यातील हजारो शेतकरी सहकारी तसेच राष्ट्रीयीकृत बँकांकडून पीककर्ज घेतात. गेल्या काही वर्षांत प्रतिकूल परिस्थितीमुळे अनेकांची कर्जे थकीत झाली आहेत. शासनाच्या या निर्णयामुळे मोठ्या संख्येने शेतकरी कर्जमुक्तीच्या कक्षेत येणार आहे. त्यामुळे शेतीतील गुंतवणूक वाढण्याबरोबरच ग्रामीण अर्थ व्यवस्थेलाही चालना मिळू शकेल.

### कागदपत्रे अद्ययावत ठेवण्याचे आवाहन

योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी आधार कार्ड, सातबारा उतारा, बँक खाते, पीककर्जाची माहिती आणि इतर आवश्यक कागदपत्रे अद्ययावत ठेवावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. पात्र लाभार्थ्यांची पडताळणी बँका, सहकारी संस्था आणि महसूल विभागाच्या नोंदींच्या आधारे केली जाणार असल्याने नोंदी अचूक असणे आवश्यक ठरणार आहे.

### बँका आणि कृषी विभागाकडे वाढली चौकशी

योजनेची घोषणा झाल्यानंतर जालना जिल्ह्यातील कृषी विभाग, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तसेच विविध राष्ट्रीयकृत बँकांच्या शाखांमध्ये शेतकऱ्यांची चौकशी वाढली आहे. अनेक शेतकरी पात्रतेचे निकष, लाभाची मर्यादा आणि अर्ज प्रक्रियेबाबत माहिती घेत आहेत. शासनाकडून अधिकृत मार्गदर्शक सूचना जाहीर झाल्यानंतर प्रत्यक्ष अंमलबजावणीला वेग येणार आहे.

### अफवांपासून दूर राहण्याचे प्रशासनाचे आवाहन

दरम्यान, योजनेबाबत सोशल मीडियावर विविध प्रकारची माहिती प्रसारित होत असल्याने शेतकऱ्यांनी कोणत्याही अप्रमाणित संदेशांवर विश्वास ठेवू नये, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. योजनेची पात्रता, लाभ, अर्ज प्रक्रिया आणि इतर बाबींबाबतची माहिती केवळ शासनाच्या अधिकृत आदेश, संबंधित बँका, कृषी विभाग किंवा जिल्हा प्रशासनाकडूनच घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांसाठी आशेचा किरण

मराठवाड्यातील शेती सातत्याने नैसर्गिक संकटांना सामोरे जात असताना 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' ही जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा ठरू शकते. प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणी झाल्यास ही योजना केवळ कर्जमुक्तीपुरती मर्यादित न राहता शेतकऱ्यांना नव्याने उभारी देणारी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारी ठरेल.

# मतदार पडताळणी मोहीमेची प्रभावी अंमलबजावणी करा- जिल्हाधिकारी

## एसआयआर कामाच्या जबाबदारीत कसूर केल्यास होणार कार्यवाही




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जुलै**

विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत ३० जून २०२६ पासून जिल्ह्यात प्रत्यक्ष मतदार पडताळणी मोहिमेला सुरुवात झाली आहे. या मोहिमेअंतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी जाऊन मतदारांची पडताळणी करून आवश्यक अर्जांचे वितरण करीत आहेत. या मतदार पडताळणी मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी याप्रसंगी दिले.

भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या प्रत्यक्ष मतदार पडताळणी मोहिमेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल गुप्ता यांनी आज (दि. १) जिल्हाधिकारी कार्यालयात मतदार नोंदणी अधिकारी व सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली.

यावेळी उपजिल्हाधिकारी (निवडणूक) प्रगती चोंडेकर, मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी विकास माने, श्रीमती प्रतिक्षा भुते, समाधान घुटुकडे तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत ३० जून २०२६ पासून जिल्ह्यात प्रत्यक्ष मतदार पडताळणी मोहिमेला सुरुवात झाली आहे. या मोहिमेअंतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी जाऊन मतदारांची पडताळणी करून आवश्यक अर्जांचे वितरण करीत आहेत. नागरिकांनी बीएलओंना आवश्यक माहिती व कागदपत्रे उपलब्ध करून देत या मोहिमेस सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले.

जिल्ह्यातील सर्व बीएलओंना या मोहिमेसंदर्भात प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले असून, मतदार पडताळणीचे काम अचूक, पारदर्शक व वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमात दि. ३० जून ते २९ जुलै या कालावधीत घरोघरी जाऊन अर्जांचे वितरण, ५ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करणे, ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत हरकती व सूचना स्वीकारणे, ५ ऑगस्ट ते ३ ऑक्टोबरदरम्यान हरकतींवरील सुनावणी घेणे आणि ७ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या कामकाजासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अतिरिक्त सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी आपल्या जबाबदाऱ्या काटेकोरपणे पार पाडाव्यात. या महत्त्वाच्या कामात कोणत्याही प्रकारची दिरंगाई अथवा टाळाटाळ केल्यास संबंधितांविरुद्ध कठोर कार्यवाही करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी बैठकीत दिला.

# वनाच्छादीत क्षेत्र वाढीसाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे- गुप्ता

## जिल्ह्यात ७.९८ लाख वृक्षलागवडीचे उद्दीष्ट

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जुलै**

जिल्ह्यात वनाच्छादित व वृक्षाच्छादित क्षेत्र वाढविण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले. येत्या पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीस उपजिल्हाधिकारी (रोहयो) राजेश सरोदे, विभागीय वन अधिकारी पुष्पा पवार तसेच विविध विभागांचे कार्यालय प्रमुख उपस्थित होते.

राज्य शासनाने ३०० कोटी वृक्षारोपण मोहिम तसेच इतर हरित उपक्रमांचे नियोजन, अंमलबजावणी व संनियंत्रण करण्यासाठी 'हरित महाराष्ट्र आयोग' स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. सन २०२६ ते २०४७ या कालावधीत राज्यातील हरित आच्छादन वाढविण्याचा शासनाचा निर्धार असून, त्याअनुषंगाने आवश्यक नियोजन, जागेची उपलब्धता, रोपे, मनुष्यबळ तसेच विभागनिहाय कृती आराखडा तयार करण्यात येत आहे.

ही मोहीम परिणामाधारित अंमलबजावणी आराखड्यानुसार राबविण्यात येणार असून, लागवड केलेल्या वृक्षांच्या दहा वर्षांच्या जतन व संवर्धनाची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे वृक्षांचे दीर्घकालीन अस्तित्व व वाढ सुनिश्चित होण्यास मदत होणार असून, राज्यातील हरित आच्छादनाची गुणवत्ता, शाश्वतता आणि पर्यावरणीय मूल्य वाढविण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे.

हिंगोली जिल्ह्यास ७ लाख ९८ हजार वृक्षलागवडीचे उद्दिष्ट देण्यात आले असून, सर्व विभागांनी आपापल्या वाट्याचे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करून वृक्षलागवडीचा अहवाल सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी दिले.

ते पुढे म्हणाले की, जिल्ह्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी ३३ टक्के क्षेत्र वनाच्छादित व वृक्षाच्छादित असणे अपेक्षित आहे. हे प्रमाण वाढविण्यासाठी जिल्ह्यातील ५ हजार ८१५ हेक्टर पोटखराब जमिनीवर वृक्षलागवडीचे नियोजन करण्यात यावे.

सध्या विविध यंत्रणांकडे सुमारे ११ लाख रोपे उपलब्ध असून, त्यापैकी जास्तीत जास्त रोपे प्राधान्याने ग्रामपंचायतींना उपलब्ध करून द्यावीत. त्यानंतर जिल्हा परिषद बांधकाम विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि कृषी विभागास आवश्यकतेनुसार रोपांचे वितरण करण्यात यावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. नदीकाठच्या पूरप्रवण गावांमध्ये पूरनियंत्रणाच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवडीचे नियोजन करण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित विभागांना दिले. प्रत्येक शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याच्या नावाने एक झाड लावून त्या झाडाच्या संगोपनाची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यावर सोपविण्याचे नियोजन करावे. तसेच 'एक पेड माँ के नाम' अभियानांतर्गतही मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करून जनसहभाग वाढविण्यात यावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी गुप्ता यांनी यावेळी केले.

# वसमत पालिकेत लोकप्रतिनिधी, बीएओ यांची महत्वपूर्ण बैठक

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २ जुलै**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या ९२-वसमत विधानसभा मतदारसंघाच्या विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षण मोहिमेच्या पार्श्वभूमीवर गुरुवार (दि. २ जुलै २०२६) रोजी वसमत नगरपरिषद कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले. ही बैठक उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

बैठकीत नगरपरिषदेच्या सर्व सदस्यांना डखठ मोहिमेचे उद्दिष्ट, कार्यपद्धती आणि नागरिकांची भूमिका याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. प्रत्येक नगरसेवकाने आपल्या प्रभागातील प्रत्येक पात्र मतदारापर्यंत ही माहिती पोहोचवून बीएलओ मार्फत देण्यात आलेले ईएफ फॉर्म भरून वेळेत जमा करण्यासाठी जनजागृती करावी, अशा सूचना देण्यात आल्या. यावेळी नगरसेवकांनी उपस्थित केलेल्या विविध शंकांचे निरसन करत मतदार नोंदणी, नाव समाविष्ट करणे, दुरुस्ती व आवश्यक कागदपत्रांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

बैठकीला उपस्थित असलेल्या सर्व बीएलओ व पर्यवेक्षकांनाही विशेष प्रशिक्षण देण्यात आले. एसआयआर प्रक्रिया अचूक, पारदर्शक आणि निर्धारित मुदतीत पूर्ण करण्यासाठी हे काम सर्वोच्च प्राधान्याने करण्याचे निर्देश उपविभागीय अधिकाऱ्यांनी दिले.

बैठकीनंतर भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राबविण्यात येत असलेल्या हर घर संविधान अभियानांतर्गत समाज कल्याण विभाग, हिंगोली यांच्याकडून प्राप्त झालेल्या संविधान उद्देशिकेच्या प्रती उपविभागीय अधिकारी व नगरपरिषद अध्यक्षा सौ. सुनिता मनमोहन बाहेती यांच्या हस्ते नगरपरिषदेच्या सदस्यांना वितरित करण्यात आल्या.

या बैठकीस नगरपरिषदेच्या अध्यक्षा सौ. सुनिता मनमोहन बाहेती, मुख्याधिकारी आशुतोष चिंचाळकर, सय्यद इम्रान अली नासेर अली, राजेश पवार, काशीनाथ भोसले, डॉ. रेणुकाताई पंतगे, सचिन दगडु, संकेत नामपल्ली, राजकुमार एंगडे, प्रभाकर क्षीरसागर, नय्युम पाशा, स्नेहा मनोहरे, ज्योती वाहुळे, शेख हारुण शेख जाहिराबी जिलानी यांचे प्रतिनिधी जावेद खुरेशी तसेच नगरपरिषदेचे शहर अभियंता नागनाथ देशमुख, अरविंद शिकारी, दाजीबा भोसले, ज्ञानेश्वर जाधव, बालाजी सोनवणे यांच्यासह इडज, पर्यवेक्षक व इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**हिंगोली- वसमत नगर पालिकेत विशेष सखोल मतदार यांदी पुनरिक्षण संदर्भात पालिकेच्या नगराध्यक्षा सुनीता बाहेती, मुख्याधिकारी चिंचाळकर यांच्यासह लोकप्रतिनिधी व बीएलओ यांची महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. छाया- श्रीधर वाळवंटे**

## संक्षिप्त वृत्त

### कृषी दिनी खोंडे दाम्पत्याचा गौरव



हिंगोली- शहरातील तिरुपती नगर भागात जल पुनर्भरण रेन वॉटर हार्वेस्टिंग बाबत स्व. लक्ष्मणराव पाटील सेवाभावी संस्थेच्या वतीने कृषी दिनानिमित्त भास्कर खोंडे व अश्विनी खोंडे यांचा सन्मान चिन्ह व वृक्ष रोप देऊन गौरव करण्यात आला. दि ०१ जुलै २०२६ रोजी कृषी दिनाचे औचित्य साधून तिरुपती नगरवाशी व स्व. लक्ष्मण पाटील सेवाभावी संस्थेच्या वतीने जल पुनर्भरण व रेनवॉटर हार्वेस्टिंग यावर काम करणाऱ्या कुटुंबांचा गौरव व सन्मान सोहळ्याचे ओमप्रकाश देवडा को-ऑपरेटिव्ह बँक लि.हिंगोली येथे आयोजन केले होते. या कार्यक्रमांमध्ये जिल्हयाचे उपजिल्हाधिकारी श्री कांबळे साहेब यांच्या हस्ते भास्कर खोंडे व सौ आश्विनी खोंडे त्यांनी जल पुनर्भरण बाबत केलेल्या कार्याचा गौरव म्हणून सन्मान चिन्ह व वृक्ष भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बँकेचे अध्यक्ष प्रकाशचंद्र सोनी, माजी नगराध्यक्ष दिलीपराव चव्हाण,विभागीय वनाधिकारी पवार मॅडम, संस्था अध्यक्ष गजाननराव सावके,यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गजानन सावके यांनी केले तर गवळी यांनी आभार मानले. कार्यक्रमाला तिरुपती नगर मधील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

### मागील २४ तासांत सरासरी २६ मिमी पाऊस

हिंगोली-जिल्ह्यात गेल्या २४ तासात सरासरी २६.३ मिलीमीटर पावसाची नोंद झाली असून, औंढा नागनाथ तालुक्यात सर्वात जास्त ४१.७ मि.मी. पाऊस झाला आहे. तर सेनगाव तालुक्यात सर्वात कमी ४.३ मि.मी. पाऊस पडला आहे. जिल्ह्यात आज सकाळपर्यंत नोंदला गेलेला तालुकानिहाय सरासरी पाऊस पुढीलप्रमाणे असून कंसातील आकडेवारी १ जूनपासून आजपर्यंत झालेल्या पावसाची आहे. हिंगोली ३२.४ (२०५.८), कळमनुरी २९ (१४५.९), वसमत २८ (११८.३), औंढा नागनाथ ४१.७ (१३६) आणि सेनगाव तालुक्यात ४.३ (१०४.६) मि. मी. पाऊस पडला आहे. सर्व आकडेवारी मिलीमीटर परिमाणात आहे. हिंगोली जिल्ह्यात दिनांक १ जून २०२६ ते ०१ जुलै, २०२६ पर्यंत सरासरी १४३.६ मिलीमीटर पाऊस पडला आहे. त्याची टक्केवारी १८.१ अशी आहे. हिंगोली तालुक्यातील नरसी (७७.८ मिमी) व वसमत तालुक्यातील आंबा (६५ मिमी)या दोन मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे.

### हिंगोलीत दुपारी पावसाच्या सरी

हिंगोली- शहरासह परिसरात गुरूवारी दुपारनंतर हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडला. मागील आठवडाभरापासून हिंगोली शहरासह परिसरात पावसाने दमदार आगमन केल्यामुळे शेतकरी पेरणीच्या कामाला लागला असून शेतीसाठी लागणारे बी बियाणे व खते तसेच औषधी करण्यासाठी कृषी केंद्रावर शेतकऱ्यांची गर्दी पहायला मिळत आहे.

# औंढा तालुक्यातील फुलदाभा परिसरात भूकंपाचे धक्के

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जुलै**

औंढा नागनाथ तालुक्यातील फुलदाभा परिसरात बुधवारी मध्यरात्री १.२० वाजता भूकंपाचे धक्के जाणवले असून भूकंप मापकावर ३.६ रिश्टर स्केलची नोंद झाली आहे. या भूकंपामुळे परिसरातील ग्रामस्थांनी रात्र जागून काढली. कोठेही वित्त किंवा जीवीत हानी झाली नाही. मात्र वारंवार होणाऱ्या भूकंपामुळे नागरिकांच्या मनात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

औंढा नागनाथ तालुक्यातील फुलदाभा व जलालदाभा या परिसरात भूकंपाचे धक्के जाणवले. बुधवारी मध्यरात्री भूगर्भातून मोठा आवाज झाला. त्यानंतर घराची तावदाने तसेच टीनपत्रे हालू लागली होती. त्यामुळे भूकंप होत असल्याचे ग्रामस्थांच्या लक्षात आले. ग्रामस्थांनी सुरक्षित स्थळी आसरा घेतला. या भूकंपाची ३.६ रिश्टर स्केल नोंद झाली असून खोली ५ किमी नोंदविण्यात आली आहे. या भूकंपाचे धक्के वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे, कुपटी, वापटी, कुरूंदा, गिरगाव, औंढा नागनाथ तालुक्यातील फुलदाभा, जलालदाभा, राजदरी, पिंपळदरी, सोनवाडी, निशाणा, असोंदा, काकडदाभा, पांगरा, मेथा, जडगाव, राजापूर, जांब भागात जाणवले आहेत. या भूकंपामुळे परिसरातील ग्रामस्थांनी रात्र जागून काढली.

दरम्यान या भागात वारंवार भूकंपाचे धक्के का बसू लागले आहेत. याची नेमकी कारणे शोधली जात नसल्याने ग्रामस्थांमधून भितीचे वातावरण कायम आहे. भूकंप झाल्यानंतर प्रशासनाकडून भेटीचे सोपस्कार पूर्ण केले जात असून ग्रामस्थांमधून जनजागृती करून काय करावे अन काय करू नये असे सांगितले जाजे मात्र नेमके कारण काय आहे याचा शोध का घेतला जात नाही असा सवाल या परिसरातील नागरिक करीत आहेत. या भूकंपामुळे कुठलीही वित्त अथवा जीवीत हानी झाली नसली तरीही भूकंपाची तीव्रता वाढत आहे.

वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे व कळमनुरी तालुक्यातील रामेश्वरतांडा परिसरातील केंद्रबिंदू असलेल्या भागात मागील काही दिवसांत वारंवार भूकंप होत आहेत.

# अनिल जाधव यांना राज्यस्तरीय वसंतराव नाईक पुरस्कार प्रदान



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जुलै**

हिंगोली तालुक्यातील मौजे माळहिवरा येथील प्रगतिशील शेतकरी अनिल गंगाराम जाधव यांना कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल सन २०२३-२४ या वर्षासाठीचा 'वसंतराव नाईक शेतीनिष्ठ पुरस्कार-२०२४' (सर्वसाधारण गट) आज प्रदान करण्यात आला.

आज मुंबई येथील डोम, सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम, वरळी येथे आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभात महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार तथा कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते जाधव यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

अनिल जाधव यांनी आधुनिक, शाश्वत व नाविन्यपूर्ण शेती पद्धतींचा अवलंब करून कृषी क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

या यशाबद्दल जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रदीप कच्छवे, तालुका कृषी अधिकारी शिवसंदीप रणखांब, मंडळ कृषी अधिकारी गणेश पवार तसेच कृषी विभाग, हिंगोलीच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अनिल जाधव यांचे अभिनंदन केले.

# माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जुलै**

हरित क्रांतीचे प्रणेते तसेच माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त अभिवादन करीत कृषी दिन साजरा करण्यात आला. यावेळी विविध कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले होते.









सांदीपनी पब्लिक स्कूल तरोडा (बु) नांदेड येथील शाळेत एक जुलै रोजी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा कृषी दिन म्हणून उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर काही चिमुकल्या मुलांनी आपल्या भाषणाच्या माध्यमातून वसंतराव नाईक यांचे महत्त्व पटवून दिले. तसेच शाळेतील सहशिक्षक संग्राम पवार सर यांनी वसंतराव नाईक यांनी तत्कालीन परिस्थितीमध्ये केलेले परिवर्तन, शेती शिक्षण व मागासवर्गीय लोकांच्या विकासात्मक धोरणासाठी कोणकोणते उपाययोजना केल्या याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, सौ. माहेश्वरी मुकुल राठोड, मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका हरप्रीत कौर, प्रशासक मारुती मखाले यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जोगदंड खंडू यांनी केले.

हिंगोली तालुक्यातील डिग्रस क-हाळे येथील स्वामी विवेकानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात बुधवार १ जुलै रोजी हरितक्रांतीचे जनक,माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची ११३ वी जयंती. महाराष्ट्र कृषी दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी ज्ञानोबाराव क-हाळे, मुख्याध्यापक एस.ए.जगताप, क-हाळे ए डी, कवी शिवाजी क-हाळे, पर्यवेक्षक पाटील पी आर, लोणकर बि ए,राठोड एस यू, चव्हाण वा एम, क-हाळे आर एस, लोंढे एस पी, खिल्लारी आर एन, जुमडे एस बी, सुर्यवंशी पी एस, क्षिरसागर एम एम, क-हाळे एस जी, पटवे एस टी, क-हाळे एम एम, हलगे टी एम इ.सह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हरित क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक जयंती व महाराष्ट्र कृषी दिनानिमित्त हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यात असलेल्या बालाजी विद्यालय वाई या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल सोळंके यांच्यासह केंद्रप्रमुख पांडुरंग शिंदे व शाळेचे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

हरित क्रांतिचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांना जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस अपर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपजिल्हाधिकारी (सामान्य) अनिल माचेवाड, नायब तहसीलदार सचिन जोशी, संतोष बोथीकर, सी.आर.गोळेगावकर यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## खेड येथे घरफोडी; चांदीचे दागिने व रोख रक्कम लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ जुलै -**

तालुक्यातील खेड येथे अज्ञात चोरट्याने घरफोडी करून चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ३३ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी शंकर बळीराम कापसे (वय ५८, रा. खेड, ता. लोहारा, जि. धाराशिव) यांच्या घराचा कडी-कोंडा अज्ञात व्यक्तीने ३० जून २०२६ रोजी पहाटे सुमारे १ वाजण्याच्या दरम्यान कापून घरात प्रवेश केला.



त्यानंतर घरातील चांदीचे दागिने तसेच रोख ३० हजार रुपयांची रक्कम असा एकूण ३३ हजार रुपयांचा माल चोरून नेला.

या प्रकरणी शंकर कापसे यांनी १ जुलै रोजी दिलेल्या फिर्यादीवरून लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## संक्षिप्त वृत्त...



### प्रतिभा काळे यांना ‘जिजामाता कृषी भूषण पुरस्कार’

**धाराशिव, दि. २ जुलै -**

कृषी दिनानिमित्त मुंबई येथे झालेल्या राज्यस्तरीय कृषी पुरस्कार वितरण सोहळ्यात फनेपूर (ता. धाराशिव) येथील प्रतिभा रामराव काळे यांना कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल ‘जिजामाता कृषी भूषण पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. या सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली. धाराशिवच्या लेकीला मिळालेला हा राज्यस्तरीय सन्मान जिल्ह्यासाठी अभिमानास्पद मानला जात असून महिला शेतकऱ्यांसाठी तो प्रेरणादायी ठरत आहे. विशेष म्हणजे, पुरस्कारप्राप्त प्रतिभा रामराव काळे या भाजपचे मराठवाडा संयोजक नितीन काळे यांच्या मातोश्री आहेत.



### प्रभाकर डोंबाळे यांचा भाजपमध्ये जाहीर प्रवेश

**भूम, दि. २ जुलै -**

काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष (ओबीसी विभाग) तथा वंजारवाडीचे उपसरपंच प्रभाकर डोंबाळे यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. यानिमित्त भाजपचे सरचिटणीस सुनील राणे, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### तुळजाभवानी महाविद्यालयात वसंतराव नाईक जयंती साजरी

**तुळजापूर, दि. २ जुलै -**

तुळजाभवानी महाविद्यालयात स्व. वसंतराव नाईक यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्त प्रतिमापूजन व अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्र. प्राचार्य डॉ. बापूराव पवार यांनी वसंतराव नाईक यांच्या राजकीय, कृषी व सामाजिक कार्याचा आढावा घेत मार्गदर्शन केले. कार्यक्रमास शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ११ वर्षाच्या बालिकेवर घरात घुसून अत्याचार

**कळंब तालुक्यातील संतापजनक प्रकार**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ जुलै -**

कळंब पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात माणुसकीला काळीमा फासणारी अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. एका अवघ्या ११ वर्षे ८ महिने वयाच्या चिमुरडीवर घरात घुसून लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी गावातीलच एका नराधम तरूणाविरूद्ध पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या नराधमाने पीडित मुलीला ‘हा प्रकार कोणाला सांगितल्यास जीवे ठार मारीन’ अशी धमकीही दिली होती.

याबाबत पोलीसांकडून मिळालेली माहिती अशी की, पीडित अल्पवयीन मुलगी ही २९ जून २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजेच्या सुमारास आपल्या घरी होती. पीडित घरी एकटीच असल्याचे पाहून गावातीलच एका संशयित नराधम तरूणाने तिच्या घराच्या पाठीमागच्या बाजूने छुप्या मार्गाने घरात प्रवेश केला.

त्यानंतर त्याने बळजबरी करत या निष्पाप बालिकेवर वासनेच्या भरात लैंगिक अत्याचार केला. नंतर याचाच गैरफायदा घेत आरोपीने ‘जर या प्रकरणाबाबत कोणाला काहीही सांगितलेस तर तुला जीवे ठार मारीन’, अशी धमकी देत तिथून पळ काढला.

हा सर्व प्रकार समोर आल्यानंतर पीडित चिमुरडीच्या आईने तात्काळ आपल्या मुलीला धीर देत १ जुलै रोजी



कळंब पोलिस ठाण्यात धाव घेवून आरोपीविरूद्ध तक्रार नोंदविली असून याप्रकरणी पोलीसांनी आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद केला आहे. सदरील आरोपी फरार असून आरोपीच्या अटकेसाठी पोलिसांचे विशेष पथक रवाना झाले आहे.

या प्रकारामुळे कळंब परिसरातून तीव्र संताप व्यक्त होत आहे. आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कळंबच्या तहसीलदारांचा दणका

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२ जुलै -**

कळंब तहसील कार्यालयातील काही कर्मचारी कार्यालयीन वेळेनंतर उशिरा येऊन हजेरी नोंदवत असल्याचा प्रकार समोर आल्यानंतर तहसील प्रशासनाने याची गंभीर दखल घेतली आहे. यापुढे उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांविरोधात कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला असून तीन वेळा लेट रजिस्टरमध्ये नोंद झाल्यास संबंधित कर्मचाऱ्याचा एक दिवसाचा पगार कपात करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

कळंब येथील सामाजिक कार्यकर्ते राहुल मुळे यांच्या निदर्शनास २३ जून रोजी तहसील कार्यालयातील अनेक कर्मचारी सकाळी साडेदहानंतर कार्यालयात येऊन हजेरी नोंदवहीवर स्वाक्षरी करत असल्याचे आले होते. शासनाने निश्चित केलेल्या वेळेचे पालन न करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा अर्धा दिवसाचा पगार कपात करण्यात यावा, अशी तक्रार त्यांनी तहसीलदारांकडे दाखल केली होती.

**तीन वेळा नोंद झाल्यास एक दिवसाचा पगार कपात**

या तक्रारीची गंभीर दखल घेत तहसीलदार हेमंत ढोकले यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी परिपत्रक जारी केले आहे. परिपत्रकात शासन निर्णयानुसार कार्यालयीन कामकाजाची वेळ सकाळी ९.४५ वाजता निश्चित करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच जेवणासाठी दुपारी १ ते २ या वेळेत जास्तीत जास्त अर्धा तास वेळ निश्चित असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेचे काटेकोर पालन करावे, अन्यथा संबंधितांविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशाराही परिपत्रकाद्वारे देण्यात आला आहे. यापुढे उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांची लेट रजिस्टरमध्ये नोंद करण्यात येणार असून तीन वेळा नोंद झाल्यास एका दिवसाचा पगार कपात करण्यात येणार आहे.

## फार्मर आयडीतील तांत्रिक त्रुटी तातडीने दुरुस्त करा; शेतकऱ्यांना योजनांचा लाभ द्या : डॉ. प्रतापसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ जुलै -**

धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या फार्मर आयडीमधील तांत्रिक त्रुटी तातडीने दूर करून त्यांना महाडीबीटीसह विविध शासकीय कृषी योजनांचा लाभ मिळावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) चे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांच्या फार्मर आयडीमध्ये नाव, आधार क्रमांक, सातबारा, पीक नोंद, मोबाईल क्रमांक आदींच्या माहितीमध्ये तांत्रिक त्रुटी असल्यामुळे पात्र शेतकरी विविध कृषी योजना व अनुदानापासून वंचित राहत आहेत. परिणामी शेतकऱ्यांना शासनाच्या लाभापासून दूर राहावे लागत असून, या त्रुटींची तातडीने दुरुस्ती होणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.



फार्मर आयडीची महाडीबीटी तसेच इतर शासकीय योजनांशी प्रभावी जोडणी करण्यासाठी जिल्हास्तरावर विशेष मोहीम राबविण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच तालुका आणि मंडळ स्तरावर शेतकऱ्यांच्या तक्रारी स्वीकारण्यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करून द्याव्यात आणि पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळेल याची खात्री करावी, असेही निवेदनात म्हटले आहे.

याशिवाय कृषी विभागातील संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देऊन फार्मर आयडी दुरुस्तीची प्रक्रिया निश्चित कालावधीत पूर्ण करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून प्रशासनाने या मागणीवर तातडीने सकारात्मक कार्यवाही करावी, अशी अपेक्षा डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी व्यक्त केली आहे.

## मिशन वात्सल्य समिती बैठकीत बालसंगोपन योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२ जुलै -**

परंडा तालुका मिशन वात्सल्य समितीची तालुकास्तरीय बैठक तहसील कार्यालयात तहसीलदार निलेश काकडे व महिला व बालसंगोपन अधिकारी गणेश कुकडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत बालसंगोपन योजना अधिक प्रभावीपणे राबवून जास्तीत जास्त पात्र बालकांपर्यंत तिचा लाभ पोहोचविण्यावर भर देण्यात आला.



बैठकीत बालसंगोपन योजनेचा लाभ अधिकाधिक बालकांना मिळवून देणे, एकल महिलांना घरकुल योजनेत प्राधान्य देणे, पात्र लाभार्थ्यांना पेन्शन व रेशन योजनांचा लाभ उपलब्ध करून देणे यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच पुढील महिन्यात तालुकास्तरावर विशेष कॅम्प आयोजित करून क्रांतीज्योती बालसंगोपन योजनेचा लाभ बालकांना मिळवून देण्याचा निर्णय घेण्यात आला.

याशिवाय कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजनांचा लाभ जास्तीत जास्त एकल महिलांना मिळवून देण्याबाबतही बैठकीत सकारात्मक चर्चा झाली.

यावेळी परंड्यातील आधार सामाजिक संस्था एकल महिला व अनाथ बालकांसाठी करत असलेल्या सामाजिक कार्याचे तहसीलदार निलेश काकडे व महिला व बालसंगोपन अधिकारी गणेश कुकडे यांनी कौतुक केले.

एकल महिला व अनाथ बालकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आधार सामाजिक संस्था सातत्याने कार्यरत असल्याचे संस्थेचे अध्यक्ष जुल्फीकार काझी यांनी सांगितले. तसेच योजनांविषयी माहिती देणारे फलक संस्थेच्या वतीने लावण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. त्यांच्या या उपक्रमास उपस्थित मान्यवरांनी प्रोत्साहन दिले.

या बैठकीस मिशन वात्सल्य समितीचे सदस्य, आधार सामाजिक संस्थेचे अध्यक्ष जुल्फीकार काझी, पोलीस विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गजानन मुळे तसेच शिक्षण, आरोग्य, विधी व न्यायालय, बाल संरक्षण व बालविकास विभागाचे प्रतिनिधी संतोष जाधव यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## गर्दीचा फायदा ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ जुलै -**

शहरातील बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेत अज्ञात व्यक्तीने ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी गंगाबाई मारुती संकपाळ (वय ६७, रा. झरेगाव, पोस्ट चिलवडी, ता. जि. धाराशिव) या दि.३० जून २०२६ रोजी दुपारी सुमारे १ वाजण्याच्या दरम्यान धाराशिव बसस्थानक येथे धाराशिव-वैराग बसमध्ये चढत



होत्या.

यावेळी बसमधील गर्दीचा फायदा घेत अज्ञात व्यक्तीने त्यांच्या गळ्यातील सुमारे ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, अंदाजे २५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याचा प्रकार घडला.

या प्रकरणी गंगाबाई संकपाळ यांनी दि.१ जुलै रोजी दिलेल्या फिर्यादीवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## तेरखेडा शिवारात चोरट्यांचा धुमाकूळ

**शेतकऱ्यांच्या सौर ऊर्जा संचांना लक्ष्य**

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२ जुलै -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा शिवारात अज्ञात चोरट्यांनी धुमाकूळ घालत शेतकऱ्यांच्या सौर ऊर्जा संचांना लक्ष्य केल्याची घटना समोर आली आहे. या चोरीमुळे अनेक शेतकऱ्यांचे हजारो रुपयांचे नुकसान झाले असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्राथमिक माहितीनुसार, दोन दिवसांपूर्वी तेरखेडा शिवारातील शेतकरी बशीर शेख यांच्या शेतातील सौर प्लेट अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली. तसेच रामलिंग शिंदे यांच्यासह अन्य काही शेतकऱ्यांच्या विहीर आणि बोअरवेलवरील सौर ऊर्जा संचांच्या वायरीही चोरीस गेल्याची माहिती समोर आली आहे.

या प्रकारामुळे संबंधित शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. सौर ऊर्जा संचाच्या माध्यमातून शेतीसाठी पाणीपुरवठा केला जात असल्याने या चोरीचा थेट परिणाम शेतीच्या कामांवर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्या खरीप हंगामाची लगबग सुरू असताना घडलेल्या या प्रकारामुळे शेतकरी चिंतेत पडले आहेत.

या घटनेबाबत संबंधित शेतकऱ्यांनी येरमाळा पोलीस ठाण्यात माहिती दिली असून चोरीस गेलेल्या सौर प्लेट व वायरींचा शोध घेऊन संबंधित चोरट्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## ‘सदाफुली रंगीत झाली’ने जिंकले महाराष्ट्राचे मन; बालकलाकारांचा राज्यस्तरीय सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ जुलै -**

सांस्कृतिक मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने आयोजित विभागीय बाल नाट्य पारितोषिक वितरण समारंभात यशराज पब्लिक स्कूल, धाराशिवच्या विद्या सरस्वती बाल नाट्य ग्रुपने उल्लेखनीय यश संपादन करत इतिहास रचला आहे. पुणे येथील भरत नाट्य मंदिरात सादर करण्यात आलेल्या ‘सदाफुली रंगीत झाली’ या हृदयस्पर्शी नाटकाने राज्यस्तरावर आपली वेगळी छाप पाडत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

या नाटकाच्या माध्यमातून सहभागी बालकलाकारांनी अवघ्या महाराष्ट्राची मने जिंकली आहेत. राज्य नाट्य स्पर्धा सोलापूर येथे पार पडली होती. त्या स्पर्धेत उत्कृष्ट कलाविष्कार सादर केल्याबद्दल बालकलाकारांचा नुकताच पुणे येथे गौरव करण्यात आला.

धाराशिवसारख्या ग्रामीण भागातील चिमुकल्यांनी आपल्या अभिनयाच्या बळावर मुंबई-पुण्यातील नाट्यकर्मींना आव्हान देत पारितोषिक पटकावल्याने संपूर्ण जिल्ह्यासाठी ही अभिमानाची बाब ठरली आहे. शासनाकडून मिळालेला हा सन्मान इतर शाळांसाठीही प्रेरणादायी ठरणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

या नाटकातील प्रमुख बालकलाकार विरसिंह मनोजसिंग ठाकूर याला महाराष्ट्र शासनाकडून ‘विजेता बाल कलाकार’



म्हणून प्रमाणपत्र आणि रौप्यपदक प्रदान करण्यात आले. तर नाटकाच्या दिग्दर्शिका रेखा जेवळीकर यांना विशेष सन्मान म्हणून पारितोषिक, सन्मानपत्र आणि रौप्यपदक देऊन गौरविण्यात आले.

विरसिंहच्या सहजसुंदर अभिनयाने परीक्षकांनाही भावविभोर केले. त्याच्या प्रभावी अभिनयामुळे प्रेक्षकांच्या डोळ्यांत अश्रू दाटल्याचे सांगितले जात असून, तेव्हाच या कलाकृतीचे यश अधोरेखित झाले होते.

रेखा जेवळीकर या केवळ दिग्दर्शिका नसून यशराज पब्लिक स्कूल संचलित विद्या सरस्वती बाल नाट्य ग्रुपच्या संस्थापकाही आहेत.

शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना योग्य दिशा देण्यासाठी त्यांनी घेतलेल्या सातत्यपूर्ण परिश्रमांना या यशाच्या माध्यमातून मोठे फळ मिळाले आहे.

## तुळजाभवानी महाविद्यालयात बीएस्सी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांना मान्यता

**विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचे नवे दालन खुले**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२ जुलै -**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित तुळजाभवानी महाविद्यालय, तुळजापूर येथे बी.एस्सी. विज्ञान शाखेसह एम.ए. (मराठी) आणि एम.ए. (अर्थशास्त्र) हे नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी महाराष्ट्र शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. या मान्यतेमुळे तुळजापूर



आणि परिसरातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

या नवीन अभ्यासक्रमांमुळे विशेषतः ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मोठ्या शहरांकडे जावे लागणार नाही. तसेच महाविद्यालय बसस्थानकाजवळ असल्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थिनींनाही विज्ञान शाखा आणि पदव्युत्तर शिक्षण आपल्या आवडीच्या विषयात घेण्याची सोय उपलब्ध होणार आहे.

महाविद्यालयाच्या या यशामागे संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे आणि संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाची महत्त्वाची भूमिका असल्याचे सांगण्यात आले. तसेच हा प्रस्ताव मंजूर करण्यासाठी तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी शासन स्तरावर विशेष सहकार्य केल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

**छोटी जाहिरात**

**टी.सी. हरवला आहे**

**रागिणी सुधीर शिंदे रा. भूम ता. भूम जि. धाराशिव** यांचा **१० पास चा टिसी** भूम ते बार्शी **११ वी चे डमिशन** करण्यासाठी जात असताना प्रवासात (गहाळ) हरवला आहे.

तरी ज्यांना तो मिळेल त्यांनी खालील दिलेल्या नंबरवर संपर्क साधावा हि विनंती

**संपर्क**
**सुधीर दिलीप शिंदे**
**९१९७६३६३८७५५**

**जाहिर प्रगटन**

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, आमच्या पक्षकाराने मौजे ईट, ता.भूम, जि. धाराशिव, येथील शेतजमीन **गट क्रं. १९७/ब, मधील काळखैर महेंद्र भाबूजी** यांच्या मालकी व ताब्यातील एकंदर क्षेत्रफळ **१ हेक्टर १३ आर पैकी** 0: ५0 **आर** शेतजमीन, ज्याची चतुः सिमा **पुर्वेस** : ईट पाथरुड रस्ता, **पश्चिमेस** : शाहू त्रिंबक हुंबे, **दक्षीणेस** : शेत रस्ता व अविनाश चव्हाण यांची जमीन, **उत्तरेस** :- भारत अण्णासाहेब हुंबे येणेप्रमाणे चतुः सिमेच्या आतील मिळकत यांच्याकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचा लेखी करार केलेला आहे.

तरी सदरील जमीनीमध्ये कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हीतसंबंध असतील किंवा सदरील व्यवहारास कोणालाही कोणत्याही कारणाने आक्षेप असतील, तर संबधीतांनी आपले हीतसंबंध किंवा आक्षेप सदरील प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ७ (सात) दिवसांच्या आत आम्हांस खालील पत्यावर संबधीत कागदपत्राच्या मुळ नकलासह लेखी स्वरुपात कळवावे. मुदतीच्या आत कोणाचेही आक्षेप न आल्यास सदरील मिळकत संपुर्णपणे दोषमुक्त आहे, असे समजुन आमचे पक्षकार वर उल्लेखीत व्यक्तीकडून रजिष्टर खरेदीखत करून घेतील. त्यानंतर कोणाचेही आक्षेप आमच्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही.

**करिता हे जाहीर प्रगटन.**
दि. २/७/२०२६

**मार्फत**
**ॲड. दत्तात्रय व्ही. भोसले**
**मोबाईल नंबर : ९४२१०५१६७१**